CC0. In Public Domain. Digitization by eGangotri

एकनाथी भारूड भाग १ ला

सरस्वती ग्रंथ भांडार, पुणे
Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

एकनाथी भारूड

भाग १ ला

किंमत २० रुपये

मे. शारदा साहित्य, पुणे २.

मे. सरस्वती ग्रंथ भांडार
अप्पा बळवंत चौक, पुणे २.

मे. सरस्वती बुक डेपो
नवी पेठ, सोलापूर ७.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

✦ प्रकाशक ✦
प्रकाश य. कुंदूर
मे. शारदा साहित्य,
६८१ ब, विनयाक टॉवर,
अप्पा बळवंत चौक, पुणे २.
☎ ऑफिस ४४६७७९८,
निवास ४२५०९३७.

© सर्व हक्क प्रकाशकाधीन

मुद्रक :
आनंद अं. कुंदूर
मे. श्रीराम ऑफसेट
१४/२३ अ, गायत्री, धायरी,
पुणे ४१.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अणुक्रमणिका

विषय	पृष्ठ	विषय	पृष्ठ	विषय	पृष्ठ
महालक्ष्मी	५	बहिरव	३४	वासना	४४
बाळसंतोष १ ला	७	गोंधळ १ला	३४	थट्टा	४५
वाळछंद २ रा	८	गोंधळ २रा	३४	रहाट	४५
अर्जदास्त	९	गोंधळ ३रा	३५	लेक	४६
ताकीदपत्र	१०	आंधळा १ ला	३५	दरवेश १ ला	४६
पत्र	११	आंधळा २ रा	३६	दरवेश २ रा	४६
हुषारी	११	पांगुळा १ ला	३६	दरवेश ३ रा	४७
अभयदान	१२	पांगुळा २ रा	३७	नानकाशा १ ला	४७
जमाखर्च	१३	वहिरा	३८	नानकशा २ रा	४८
नीति	१४	मुका	३८	नानकशा ३ रा	४८
छापा	१४	वासुदेव १ ला	३८	हपसी सिद्धा	४८
गस्त	१५	वासुदेव २ रा	३९	भांड	४९
प्रारब्ध	१५	बाळसंतोष १ ला	३९	मुंडा	५०
नक्कल	१६	बाळसंतोष २ रा	३९	जागल्या	५०
वाजेगारी	१६	बाळसंतोष ३ रा	४०	कापडी	५०
गारुडी १ ला	२०	मानभाव १ ला	४०	खेळया १ ला	५१
गारुडी २ रा	२१	मानभाव २ रा	४०	खेळया २ रा	५१
गारुडी ३ रा	२३	फकीर	४१	खेळया ३ रा	५१
दिवटा	२३	सफेत कलंदर फकीर	४१	पोर	५२
डौर (पंचनाद)	२४	मंगल फकीर १ ला	४१	डोईफोड्या	५३
डुगडुग्या	२५	मंगल फकीर २ रा	४१	गावगुंड	५३
वैदू	२६	जोगी	४२	वाघ्या	५३
जोशी १ ला	२७	चोपदार	४२	कावडी	५४
जोशी २ रा	२९	छडीदार	४२	महार	५४
जोशी ३ रा	२९	भालदार	४२	महारीण	५५
शकुन	३०	कांडण	४३	महारीण २ री	५५
सरोदा १ ला	३१	दळण	४३	महारीण ३ री	५६
सरोदा २ रा	३३	वैद्यगोळी	४३	कंजारीण	५६
डांका	३३	यात्रा	४४	कोल्हाटीण	५६

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

वषय	पृष्ठ	विषय	पृष्ठ	विषय	पृष्ठ
बैरागीण	५७	विंचू	७१	जोहार ५ वा	८६
भटीण	५७	येडका	७२	जोहार ६ वा	८६
पंचभाषेची गौळण	५८	भूत	७२	जोहार ७ वा	८७
गौळण पंचरंगी १ ली	५९	विटीदांडू	७२	जोहार ८ वा	८७
गौळण बोबडी	५९	विटीदांडू २ रा	७३	जोहार ९ वा	८७
गौळण ४ थी	६०	चेंडूफळी १ ली	७३	मांग	८७
गौळण ५ वी	६०	चेंडूफळी २ री	७३	कृष्णावाई व रमावाई	८८
गौळण ६ वी	६०	मृदंगपाटी	७३	दसरा	८८
गौळण ७ वी	६१	हुतुतु १ ला	७४	शिमगा	८८
गौळण ८ वी	६१	हुतुतु २ रा	७४	मोगरा	८९
गौळण ९ वी	६२	भोंवरा	७५	चौघडा	८९
सौरी १ ली	६२	टिपरी	७५	कृष्णाचा छंद	८९
सौरी २ री	६३	एकीबेकी	७५	बागुल	९०
सौरी ३ री	६३	हमामा १ ला	७६	जंगम	९०
सौरी ४ थी	६३	पिंगा	७६	विवेक वैराग्य	९०
अंबाबाई	६४	घोंगडें	७७	दादला	९१
मरी आई	६५	फुगडी १ ली	७८	माळी	९१
ठकडी	६६	फुगडी २ री	७८	कुंटीण	९१
मुलगी	६६	फुगडी ३ री	७८	कृष्णपेंद्याचा संवाद	९२
वऱ्हाडणी	६६	फुगडी ४ थी	७८	वायला	९२
लग्न	६७	हमामा २ रा	७९	घोंगडी	९३
टिटवी	६७	हुंवरी	७९	जातें	९३
पिंगळा	६७	लखोटा	७९	कानोबा	९३
बुलबुल	६८	कोडें	८०	गौळण १० वी	९४
वटवाघुळ	६८	जगझोडी	८०	पांखरूं २ रें	९४
काऊ	६८	झोंप	८०	बाहुलें	९४
मैना	६९	कृष्णाई कान्हाई	८१	धांवा	९५
पोपट	६९	मोतीं	८१	आरती श्रीविठ्ठलाची	९५
पांखरू	७०	जोहार १ ला	८१	आरती श्रीज्ञानदेवाची	९६
कुत्रें	७०	जोहार २ रा	८४	आरती एकनाथाची	९६
गाई	७०	जोहार ३ रा	८४	आरती तुकारामाची	९६
सर्प	७१	जोहार ४ था	८५		

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

॥ श्रीविठ्ठलरखुमाई ॥

एकनाथी भारूडसंग्रह

भाग १ ला

१ महालक्ष्मी

नमो आदिमाया भगवती ॥ अनादिसिद्ध मूळप्रकृती ॥ महालक्ष्मी त्रिजगती ॥ बया दार उघड दार उघड ॥१॥ हरिहर तुझें ध्यान करिती ॥ चंद्र सूर्य कानीं तळपती ॥ गगनीं तें तारांगणें रुळती ॥ तेंवीं भांगीं भरिलें मोतीं ॥ बया० ॥२॥ बया नवखंड पृथ्वी तुझी चोळी ॥ सप्तपाताळीं पाउलें गेलीं ॥ एकविसस्वर्ग मुकुटीं झळाळीं ॥ बया० ॥३॥ अलक्षपूर भवानी दार उघड बया ॥ माहूरकर लक्ष्मी दार उघड बया ॥ कोल्हापूर लक्ष्मी दार उघड बया ॥ तैलंगलक्ष्मी दार उघड बया ॥ तुळजापुर लक्ष्मी दार उघड बया ॥ पाताळलक्ष्मी दार उघड बया ॥ कानाड लक्ष्मी दार उघड बया ॥ अष्टभुजा लक्ष्मी दार उघड बया ॥ पंढरपूरनिवासिनी दार उघड बया ॥ दार उघड बया, दार उघड बया ॥४॥ चारी पुरुषार्थ गोंधळी ॥ सनकादिक तेथें संबळी ॥ तेहतीस कोटी भुतावळी ॥ दिवट्या पाजळोनि तिष्ठती ॥ बया० ॥५॥ वेताळ, फेताळ, खंकाळ ॥ मारको, मेसको, मैराळ ॥ जागाई, जोखाई, क्षेत्रपाळ ॥ म्हैषासुर दैत्य मातला सबळ ॥ अबबब ॥ पीडा केली अंबे बया दार उघड ॥६॥ मच्छाई बया दार उघड ॥ कच्छाई बया दार उघड ॥ वऱ्हाई बया दार उघड ॥ नरसाई बया

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

दार उघड ।। रामाई बया दार० ।। कृष्णाई बया दार० ।। बोधाई बया दार० ।। कलंकाई बया दार० ।। महालक्ष्मी बया दार० ।। उदो उदो ऐसा शब्द गाजतो ।। कामक्रोधदैत्यावर कोरडा कडाडा माजतो ।। ज्ञान-पोत पाजळतो ।। बोधपरडी हातीं घेतो ।। प्रेमाचा पाऊल पुढें ठेवितो ।। अहं शंखासुर दैत्य बळी देतो ।। बया दार उ० ।।७।। हिरण्याक्ष हिरण्यकश्यपु कोंबडे पिळी ।। बळीसी घालुनी पाताळीं ।। सहस्र अठ्यायशी ऋषिमंडळी ।। हनुमंत दिवटा महाबळी ।। अठरा पद्म येउनी रणकल्लोळीं ।। सागर बांधोनियां शिळीं ।। करी लंकेची होळी ।। रावण कुंभकर्णा घेसी बळी ।। खेळसी शिरांची चेंडूफळी ।। बया दार० ।।८।। शरण आला तुज बिभीषण ।। तयासी राज्यीं अक्षई स्थापून ।। प्रल्हाद उपमन्यु ध्रुवासी भातुकें देऊन ।। बुजाविसी कवतुकें ।। बया दार० ।।९।। आणिक एक अंबे नवल परी ।। तुझी यात्रा द्वापारयुगामाझारी ।। परोपरी निंब नारळ घेऊन करीं ।। हळदी कुंकमें अर्पिती ।। बया दार० ।।१०।। वाहन तुझे सिंहकेसरी ।। मोकळे केंस त्रिशुळ शंख करीं ।। शिशुपाळ वक्रदंत दोन्ही बकरीं ।। आहुती घेसी जगदंबे ।। बया दार० ।।११।। तेथून पुढें दसरा आला ।। अठरा दिवस घट मांडिला ।। कौरव पांडव सैन्याभर मिळाला ।। तेथें शोभसी विराजमान हो दुर्गे ।। बया दार० ।।१२।। जयजयाजी मूळपीठेंद्रभवानी ।। पांडवकुळींची कुळस्वामिनी ।। अर्जुन रथीं स्वार होऊनी ।। वागूदोर हातीं धरूनी ।। रथ फिरविसी कवतुकें ।। बया दार० ।।१३।। द्रौपदी बहिणीचेनी कैवारेंसी ।। होम करूनी कुरुक्षेत्रासी ।। तुझें साहित्यें पूर्णाहुतासी ।। तें तुजप्रती अर्पिलें ।। बया दार० ।।१४।। रणवाद्य भम् भम् भम् दन् कड् कड् तोची गोंधळ अंबे तुजप्रती ।। प्रथम धूप घटाप्रती भीमसुत ।। बभ्रु अर्पिला बया दार० ।।१५।। ऐसा उत्सव मांडिला ।। उदो उदो ऐसा शब्द झाला ।। तेव्हां अर्जुन झडपिला ।। संशयभूतें ते काळीं ।। महाशक्ति कृष्णाबाई ।। बया० ।।१६।। ते

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

संशयभूतें असें कठीण ।। हरिहर ब्रह्मयासी नाटोपे जाण ।। चारी वेद सहा शास्त्रें अठरा पुराणें ।। अठ्यायशी सहस्र ऋषि शिणले दारुण ।। मग त्यां बोधखंडा हातीं घेऊन ।। शीर छेदिलें भूताचें ।। बया दार० ।।१७।। बया त्यां रणकुंड जबडा पसरिला ।। आहुती घेसी दोन दळां ।। रथ घोडे कुंजर तुला ।। नारळ बया अर्पिले ।।१८।। भीष्म द्रोण कहुळे ।। तीळ तांदुळ पायदळें ।। आणिकही वीर भले भले ।। निंबें कापुनी टाकिलीं ।। बया दार० ।।१९।। रक्त वाहे भडाभडां ।। तेंची तेल घृत जळे धडाधडां ।। कौरव पतंग पडती गाढा ।। दुर्योधन हा लक्ष्मी तुझा रेडा ।। शेवटीं आहुती घेसी याचीच ।। बया दार० ।।२०।। शिलंगण खेळसी नानापरी ।। कौरवकुळाची करून बोहरी ।। द्वारका लपवोनी समुद्रीं ।। यादवकुळ पाठविसी माहेरी ।। निजधामा कारणें ।। बया दार० ।।२१।। पुढें जंबुद्वीपाभीतरी ।। अंबे तुझी न वर्णवे थोरी ।। खेळ खेळसी वैष्णवां-माझारी ।। पुंडलिक दिवटा महा भारी ।। ओंवाळीसी महामाया ।। बया दार०।।२२।। जगदंबा प्रसन्न झाली ।। भक्तिकवाडे उघडली ।। शंखचक्रांकित शोभली ।। कोटीचंद्रसूर्य प्रभावें बाळी ।। एका जनार्दनीं माउली ।। करी कृपेची साउली ।। भक्त जयकारणें संपूर्ण झाली ।। बया दार० ।। बया दार० ।।२३।।

२ बाळसंतोष १ ला

आलक्ष लक्षुनी लक्षी ।। तेथें दिसती दोन्ही पक्षी ।। वेदशास्त्र हे साक्षी ।। चंद्रसूर्यासहित ।।१।। बाळछंदो बाबा बाळछंदो ।।धृ०।। मागें स्वानुभव अंगले ।। पंचतत्त्वांचें सानुलें ।। व्यर्थ इंद्रियें भोगलें ।। नाहीं रंगले संतांचरणीं ।।२।। रामकृष्ण नित्य उदो ।। हृदयकळिके भावोभेदो ।। वृत्तिसहित शरीरीं नांदो ।। नित्य उदो तुझाची ।।३।। क्षीरासिंधु दुहिला ।। चतुर्दशरत्नीं भरिला ।। नेघे तेथील साउला ।। मज अबोला प्रपंचासी ।।४।। दान देना उदारश्रेष्ठा ।। परब्रह्म तूं वैकुंठा ।। मुक्तिमार्गीचा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

चोहटा ॥ फुकटा न घे तयां ॥५॥ पृथ्वीतळ राज्यमय ॥ नेघे नेघे हेंहि पद ॥ रामकृष्ण वाचे गोविंद ॥ हाची छंद तुझ्या पंथें ॥६॥ मंत्र तीर्थ यज्ञयाग ॥ भोग न करी भोग भोग ॥ तूंचि होउनी सर्वांग ॥ सर्वसंग मज देई ॥७॥ वृत्तिसहित मज लपवीं ॥ माझे मन चरणी ठेवीं ॥ निवृत्ति पदोपदीं गोवीं ॥ तूं गोसावी दीनोद्धारण ॥८॥ सात पांच तीन मेळा ॥ नेघे या तत्त्वांचा सोहळा ॥ रजतमाचा कंटाळा ॥ हृदयी जिव्हाळा हरी वसो ॥९॥ श्वेत पीता नेघे वस्त्र ॥ स्वर्ग मृत्यु पाताळ पात्र ॥ ज्ञान विद्वान नेघे शास्त्र ॥ नित्य हरीवक्र हरी देई ॥१०॥ चंद्र सूर्य महेंद्र पदें ॥ ध्रुवादिकांचें आनंदें ॥ तेथें मी गा आल्हादें ॥ तुझ्या नादें करीन घोष ॥११॥ करचरणेंसीं इंद्रियावृत्ति ॥ तुझ्या ठांई तूंचि होती ॥ माझी भिन्न उरूं नेदी तें कीर्ति ॥ हें दान श्रीपती मज द्यावें ॥१२॥ शांति दया क्षमा सिद्धि ॥ हेहि पाहतां मज उपाधी ॥ तुझिया नामाची समाधी ॥ कृपानिधी मज द्यावी ॥१३॥ बाप रखुमादेविवर तुष्टला ॥ दान घे घे म्हणोनि बोलिला ॥ अज्ञानवृक्ष पान्हाइला ॥ मग बोलिला विठ्ठल हरी ॥१४॥ पुंडलिकें केलें कोंडे ॥ तें त्वां मानितळें निधाडें ॥ मी तुज हृदयीं सांपडे ॥ हें त्वां दिलें ज्ञानदेवा ॥१५॥ ज्ञानदेवें घेतलें ज्ञान ॥ हृदयीं धरूनियां ध्यान ॥ कथा कीर्तन करी तूं ॥१६॥ बाळछंदो बावीस जन्में ॥ तोडिलीं भवाब्धीचीं येणें ॥ चंद्रार्क तारांगणें ॥ रश्मीं दान घेतला ही ॥१७॥

३ बाळछंद २ रा

बाळछंदो प्रेम देई मन ॥ जाहलें मनाचें उन्मन ॥ उपरति धरिलें ध्यान ॥ जाहलें ज्ञान परब्रह्मीं ॥धृ० ॥ निमिषा निमिष छंद माझा ॥ बाळछंद हा तुझा ॥ वेगीं येई गरुडध्वजा ॥ पसरुनि भुजा देई क्षेम ॥१॥ तुटली आशेची सांगडी ॥ ध्यानें नेलें पैलथडी । सुटली संसाराची बेडी ॥ क्षण घडी रिती नाहीं ॥२॥ नाठवे द्वैताची भावना ॥ अद्वैतीं बैसे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ध्याना ।। दिननिशींची रचना ।। हाचि मनीं आठव ।।३।। जप तप वृत्तिसहित ।। निवृत्ति होईन निश्चित । समाधी बैसेन एक तत्त्व ।। न मुखी मात नामाची ।।४।। ज्ञानदेवी छंद ऐसा ।। बाळछंद जाहला पिसा ।। दान मागतसे महेशा ।। दश दिशां न घालीं मन ।।५।।

४ अर्जदास्त

अर्जदास्त अर्जदार ।। बंदगी बंदे नवाज ।। आलेकुम्सलाम ।। साहेबांचे शेवेशीं ।। बंदे शरीराकार ।। जिवाजी शेखदार ।। बुधाजी कारकून ।। परगणे शरीराबाद ।। किल्ले कायापुरी ।। सरकार साहेबांची आज्ञा घेऊन स्वार झालों ।। तों परगणे मजकुरचे जमेदार ।। दंभाजीशेट व लोभाजी महाजन व मनीराम देशमुख व ममताई देशपांडीण व क्रोधाजी नाइकवाडी ।। ऐसे हरामजादे फार आहेत ।। ते सरकार कामाचा कयासा चालूं देत नाहींत ।। दंभाजी शेट्या कचेरीस येऊन जोम धरून बसतो ।। मनीराम देशमुख आपलें काम परभारें करून घेतो ।। ममताई देशपांडीण इणें तमाम परगणा जेरदस्त केला ।। क्रोधाजी नाइकवाडी यानें तमाम तफरका केला ।। तों साहेबांपासून जरासंध चोपदार झाला ।। त्याणें खबर केली कीं ।। मागून यमाजीपंतांची तलब होणार ।। त्यास त्या धास्तीनें तमाम परगणा बोस झाला ।। बितपशील कलम ।। डोळसवाडी मात्र कांही रुई झुई वस्ती राहिली ।। कानगांव तो बंद झालें ।। दोन्ही वेशीचीं कवाडे लागलीं ।। नाकापुरास वहाव सुटले ।। तोंडापुर तो तफरका झालें ।। दंताळवाडी वोस पडली ।। दिवेलागणी देखील राहिली नाहीं ।। केंस गांवची पांढर झाली ।। शिरापुरचे लोक दरोबस्त थरथरां कापूं लागले ।। हातगांव कसल्यानें जर्जर झालें ।। त्यांच्यानें आतां कांहीं लावणी होत नाहीं ।। पायगांवचीं मेटें बसलीं ।। ढोंपरीपूरची राहिलीं ।। चरणगांव चाली सरली ।। गांडापूर वाहूं लागलें ।। लिंगस्थान भ्रष्ट जाहलें ।। उठूं पळूं लागलें ।। धीर धीरवेना ।। ऐसी परगण्यांत कीर्ति बुडाली ।। यावर सरकार

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

काम सुरू करीत होतों ।। तों यमाजीपंताची परवानगी आली कीं हुजूर येणें ।। आपणास साहेबांचा आश्रय आहे ।। एका जनार्दनका बंदा ।। बंदा बंदगी रोशन होय ।। हे अर्जदास्त ।।१।।

५ ताकीदपत्र

ताकीदपत्र समस्त राजकार्य धुरंधर परगणे शरीराबाद ।। सुमातैन लोळी प्रवाहे ।। ताकीदपत्र दिलें कीं, कायापुरास जिवाजी नामें गृहस्थ कऊल देऊन देहगांवची वस्ती रक्षावयानिमित्त पाठविले आहेत ।। हरएकविर्शी साहित्य करावें ।। मनाजीराव सुभेदार, बुधाजीपंत फडणीस व चिमाजीपंत चिटणीस, हे पदरी थोर मनुष्य असतां ।। अहंकारपंत सबनीस याचे हवालीं सर्व देहगांवचा कारभार केला ।। त्याचे धन्याचे घरचे मुत्सद्दी घरीं बसवून ।। नवीन मुत्सद्दी व कामगार उभे केले ।। तें हें चांगले नव्हे ।। विकल्पाजी महाजन व मोहाजी शेटे व कामाजी कोतवाल व क्रोधाजी नायकवाडी व द्वेषाजी जमेदार, अधिकार जासूद, लोभाजी पोतनीस, विकारपंत जकातदार, मत्सरजी मेहेत्र्या, कुतर्काजी गस्तवान, उन्मत्ताजी पाटील, कुबुद्धिपंत कुळकर्णी, भ्रमाजी शिवाई, मदाजी देशपांड्या, दंभाजी देशमुख, प्रपंचपंत मुजुमदार, मूर्खाजी हुजरे, स्वार्थाजी खिजमतगार, अविवेक पुराणिक, अज्ञान मशालजी हे नवीन कारगार उभे केले ।। व घरांतील पहिल्या दासी उभ्या केल्या ।। त्या आशा, मनशा, तृष्णा, कल्पना, ममता, कायाप्रीति, भुली, भ्रांति, इच्छा, वासना, भ्रमणा, कुबुद्धि, निंदा अहंता, चिंता, निद्रा, मोहिनी ह्या कर्म कर्त्यावादी ।। अहंकारापंत सबनीस यानें उभ्या केल्या ।। त्यांनीं दरोबस्त परगणा बुडविला ।। आणि यमाजीपंत कमाविसदार यांचें घरीं एकांत स्थळ स्थापन केलें ।। त्यावरून हें ताकीदपत्र सादर केलें ।। ते मुत्सद्दी व कामगार त्यागावें ।। आणि सरकार हुजूरचे मुत्सद्दी कामगार आहेत, तर त्यांचे हातें काम घ्यावें ।। मुसद्दी तपशील ।। शुद्धसत्त्वभाव, वैराग्य,

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

विवेक, बोध, परमार्थ, आनंद, समाधान, निर्वैर, स्वानुभव, धैर्य, सत्य, भजन, पूजन, हे कारभारी ॥ आणि कार्यकर्त्या सुशीला, सुबुद्धि, उन्मनी, प्रतिष्ठा, नवविधा मर्यादा, शांति, क्षमा, दया, नम्रता, ह्या कार्यकर्त्या, हे मुत्सद्दी यांचे हातीं काय द्यावें ॥ याजविषयीं सरकारांतून ताकीद झाली आहे ॥ तर लिहिल्याप्रमाणें वहिवाट करावी ॥ सबनीस मजकूर याचे कामगार मुत्सद्दी ॥ दरम्यान या कामांत आल्यास पारिपत्य केलें जाईल ॥ हें स्पष्ट समजावें ॥ सरकार कामगार उभे करावे, याप्रमाणे वहिवाट करावी ॥ एका जनार्दनीं शरण ॥ हे आशीर्वाद ॥ हें ताकीदपत्र ॥

६ पत्र

माझें पत्र धन्याला ॥ वैकुंठवासी नांदतो त्याला ॥ असा धनी माझी भला ॥ माझ्या पूर्वजांचा उद्धार केला ॥१॥ भक्त संकटीं रक्षिला ॥ मजवर फार उपकार केला ॥ तडी तांतडी धांऊन आला ॥ पत्राचा मजकुर त्यानें पाहिला ॥२॥ संकट पाहुनी भला बोध केला ॥ चार खाणी नऊ दरवाजे ॥ दश इंद्रिये हाच बोध केला ॥३॥ शक्ति मुक्ति भक्ती मजपाशीं ठेविल्या ॥ ऐसे चार वेद वर्णी ॥ तुका गर्जतो पुराणीं ॥४॥

७ हुषारी

हुशियार बंदे हुषियार ॥ तेरा तन खबरदार ॥ तुझें खिलाबन एक नार ॥ बनादेव सतरावी ॥ घर पाई है ॥१॥ बडे बडे साधुसंत उनसे कर ले एकांत ॥ बतादेव सिद्धांत ॥ आदिअंत उनोंका ॥२॥ बडी तो सबसी बडी ॥ जाडी तो धरतरीसे जाडी ॥ एकवीस खन्नकी माडी ॥ गगन बीचमें खडी है ॥३॥ दसवे द्वार बुरोंका ॥ देख ले दिदार उनोंका ॥ नैन दीन लगावे ॥४॥ ब्रह्मा विष्णु बडे देव ॥ अजब गुरु ग्यानी महादेव ॥ पाहिये उनोंकी ठेव ॥ बैठके जम झुलाई है ॥५॥ अलख पुरुषको

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

धुनी ॥ तुर्या चेत रही उन्मनी ॥ नही आहि अंत पुराणीं ॥ पन्नी महा कारण रूप है ॥६॥ अहनाद निःशब्दमों ॥ सोस लगाइये चष्ममों ॥ चुनक है मसूरमों ॥ झकझक झकाकत है ॥७॥ लखलखाट हिरेकी खान ॥ चकचकाट कोटि भान ॥ निशिदिन करत ना ध्यान ॥ ग्यान बहोत आयेंगे ॥८॥ दिल रिझे तो कर ले धंदा ॥ भटगोपाल उनोंका बंदा ॥ चुप सोनेसो बताई है ॥९॥

८ अभयदान

चिरंजीव जिवाजीपंत ठाणेदार ॥ यांशीं आत्मरामपंत कामावीसदार ॥ कसबे ब्रह्मपुरी आशीर्वाद उपरी ॥ तुम्हांसी देहगांवचें ताणें दिलें ॥ तर ठाण्यांत सावधपणें वर्तणूक करणें ॥ तेथें ममताई पाटलीण ॥ तिनें लटकेंच दंभ केलें आहे ॥ काम क्रोधादि षड्वैरी चाकर ठेवून ॥ लोभ मोहाचे फांसे सिद्ध करून ठेविले आहेंत ॥ म्हणून तुम्हांस सूचना मात्र लिहिली आहे ॥ विषयाचा लोभ न धरणें ॥ निजहितासी अंतर न करणें ॥ सत्य मिथ्या जाणून विचाराची वाट धरणें ॥ अविचारपणा सोडून देणें ॥ विवेक सद्भावांसी मित्रत्व विशेष असों देणें ॥ त्यांचें बुद्धीनें गांवची लावणी करणें ॥ उत्तम चारी वर्णासी कऊल देऊन, धैर्याचा नांगर धरून शेतांतील मदे खडे काढून, वासनेच्या पालव्या तोडून, संशयाचा गाशा गोळा करून, भूमिका शुद्ध करून, मग भक्ति, ज्ञान, वैराग्य तिफणी करून सद्गुरुमुखें निजबीज पेरणें ॥ जेथें शुद्ध सत्त्वाचा मेघ वर्षला ॥ तेथें सत्याची माळा घालून, कुतर्क पांखरू उडवून देणें ॥ जागोजागीं विश्वास रक्षण ठेवून, शेतांतील माल अवघाचि गोळा करून, षड्गुणऐश्वर्य बैल जुंपून, अवघाच माल खळ्यांस आणून, आणून कस मळ काढून, स्वानंदाची रास करणें ॥ तेथें सिद्ध साधक मागते घेतली ॥ त्याला भक्तीचे पायलींत अवघाचि माल मोजून देऊन, सह हुजूरब्रह्मपुरीस येणें ॥ सांगितल्या गोष्टींत बाकी ठेवाल तर चौऱ्यांयशी लक्ष योनी फिरणें लागेल ॥ मग पुनरपि तुम्हांवर दहस्त लादेल ॥ खरें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

चालावें, जन्ममरणाची वाट खंडेल ॥ जनार्दन सद्गुरुकृपेचा सागर ॥ तेणें एका जनार्दनी आनंदमय समाधान झालें द्वैताचा लेश उरला नाहीं ॥ सच्चिदानंदरूप प्रत्ययास येऊन, समाधान पावेल ॥

९ जमाखर्च

ऐका जमाखर्चाची खंडणी ॥ नरदेही जमेसी धरुनी ॥ बाकीसाल हल्ली उगवणी ॥ शून्य घालीं संसारा ॥१॥ संसार लक्ष चौऱ्यायशी योनी ॥ बाकी व व्याज तेरीज मिळुनी ॥ सावधान गुरुचरणीं ॥ वसूल केला नरदेह ॥२॥ नरदेह साल मजकुर ॥ रुजू सालगुदस्त पूर्वसंसार सद्गुरुकृपा निर्विकार ॥ सालें भरलीं उगवलीं जी ॥३॥ संचित क्रीयमाण विचार ॥ पुण्य पाप स्वर्ग नरकद्वार ॥ वेदशास्त्र पुराण निर्धार ॥ स्वहितासार देखिलें जी ॥४॥ अहंभाव बाकी ठेविली ॥ ती गुरुबुद्धीनें नाहींशी केली ॥ विवेक विचारानें पाहिली ॥ वसूल केला नरदेह ॥५॥ मुखमुश्रीफ व्यवहार ॥ हा तव वस्तीचा शृंगार ॥ प्रेम हुजूर सुंदराक्षर ॥ सरस्वती वर झाला कीं जी ॥६॥ चातक जन्म मूर्ख ते केले ॥ सुख दुःख इच्छा एकलेनि नेलें ॥ तें गुह्य मुखीं मुश्रिफी आलें ॥ शिल्लक सुटली ब्रह्मादिकांची ॥७॥ स्वधर्म खर्च केला ॥ तो फल रुजू पाहिला ॥ ब्रह्मार्पण मजुरा केला ॥ फाडा ओढिला शून्याचा ॥ चार सुर नित्य नेमाचें ॥ सावधान एकचित्ताचें ॥ वर्म मुखें केलें सद्गुरुचें ॥ नांव अविद्येचें त्यजिलें जी ॥९॥ विवेक आत्मवर्ग स्वामीचा ॥ वडील बंधू सत्वाजीचा ॥ झाला पहिला प्रवृत्तीचा ॥ अंतर्यामीं हरी हरी ॥१०॥ ज्ञान चक्षूनें अति सुरेख ॥ नित्य स्वरूप पाहिलें आलेख ॥ देखोनि नरदेह देखणा देख ॥ नरदेह जन्मासी आला जी ॥११॥ अज्ञान बाकी झाडा झाला ॥ पुढें शिलकेसी चुकवीला ॥ जमाखर्च स्वानंदाचा झाला ॥ जमाखर्च संसार वाहो जी ॥१२॥ नाहीं बंधन मोक्षसंदेहो ॥ गुरुकृपा स्वानुभावो ॥ देखोनि नरदेहीं संदेही ॥ अनुभव जमाखर्च जनार्दनीं ॥१३॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitization by eGangotri

१० नीति

नीति सांगतों ऐका एक ॥ दास सभेचा सेवक ॥ मन टाळूं नका येक ॥ कोणी एक कोणी एक ॥धृ०॥ सांडावरून जाऊं नये ॥ कदा लांच खाऊं नये ॥ चौहट्यांत राहूं नये ॥ कोणी एक ० ॥१॥ अक्रीत घेऊं नये ॥ इमान सोडूं नये ॥ बेमान होऊं नये ॥ कोणी एक० ॥२॥ सज्जनांसीं विटूं नये ॥ नीचासवें वाटूं नये ॥ तस्करासी पुसूं नये ॥ कोणी एक० ॥३॥ भक्तिमार्ग खडूं नये कुभांड्यासी तंडूं नये ॥ खळासंगें भांडूं नये ॥ कोणी एक० ॥४॥ सत्पुरुषाशीं छळूं नये ॥ शिवेचा गुंडा ढाळूं नये ॥ केला नेम टाळूं नये ॥ कोणी एक०॥५॥ सद्गुरुसेवा सोडूं नये ॥ कुळधर्मासी मोडूं नये ॥ परद्रव्य जोडूं नये ॥ कोणी एक० ॥६॥ संपत्ति आलिया मोजूं नये ॥ अभिमानें फुगूं नये ॥ सभा देखून लाजूं नये ॥ कोणी एक० ॥७॥ अत्यस वाद करूं नये ॥ खोटा संग धरूं नये ॥ भोचक्रासी मैत्री करूं नये ॥ कोणी एक० ॥८॥ भलते भरी पडूं नये ॥ अनाचार करूं नये ॥ कपट मनीं धरूं नये ॥ कोणी एक० ॥९॥ जन्मा आलिया स्वभावें ॥ कांहीं सार्थक करावें ॥ ऐसें मनीं विचारावें ॥ कोणी एक० ॥१०॥ एकाजनार्दनीं भावें ॥ संतचरणीं लीन व्हावें ॥ सदा हरिनाम उच्चारावें ॥ कोणी एक कोणी एक ॥११॥

११ छापा

अजब है त्रिकूटका घाट ॥ जोत लगी घनदाट ॥ ढूंढ लेना ओही बात ॥ पलख जोत लगी ॥१॥ उडवत चवरंग गुलाल झमक ॥ रहे जोतही लाल ॥ महाकारण महाल ॥ बीचमें लाल चमकत है ॥२॥ चमक लगी दिनरात ॥ नहीं कुछ आदि अंत ॥ समझा लेना ओहीं बात ॥ सहजसंग बतावे ॥३॥ खीजमत कर ले कछु काम ॥ आज मत पावोगे राम ॥ भ्रमर गुंफामें राम ॥ रामनाम सुमर ले ॥४॥ सुमर लेना नहीं

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मंत्र ॥ छांड ले सब तंत्र ॥ अनुहात जंत्र ॥ धिमक मृदंग बजावे ॥५॥ बजावे धन् धन् स्वरका बीन ॥ भजन कर ले संगीन ॥ नयन जागे रातदीन ॥ ब्रह्म ताल लगावे ॥६॥ लगाने तो है तैयार ॥ कर ले दिलमों करार ॥ हो जा भवजलपार ॥ मेरे सद्गुरु साहेबकी ॥७॥ साहेब सद्गुरु गोपाळ के प्रतिपाळ ॥ गोपालभट तुम्हारे ॥ फकिरोंमें रहता है ॥८॥

१२ गस्त

विठोवा चला चला मंदिरांत ॥ गस्त हिंडती बाजारांत विठो० ॥धृ०॥ रांगोळी घातली गुलालाची ॥ शेज म्यां केली पुष्पांची ॥१॥ समय जळती अर्धरात्रीं ॥ गस्त हिंडती हकीमाची ॥ गळ्यांमधी माळा, माळा मोत्याची ॥ गस्त हिंडती हकीमाची ॥२॥ नामदेवाला सांपडलें माणिक ॥ घेतलें जनीनें हातांत ॥ घेऊन गेली, गेली राउळांत ॥ गस्त हिंडती बाजारांत ॥३॥

१३ प्रारब्ध

ऐका प्रारब्धाची ठेव ॥ भिक्षुक झाले पांडव ॥ धन दौलत भाग्य सर्व ॥ सांडिला ठाव प्रारब्धें ॥१॥ शरीर संचिताधीन ॥ धर्मराज हिंडे वनोवन ॥ कर्मे बुडाला रावण ॥ दुर्योधन प्रारब्धें ॥२॥ अभिमानी शिशुपाळ ॥ ईश्वरहातीं झाला काळ ॥ यादव बुडाले सकळ ॥ त्यांसी दुःख प्रारब्धें ॥३॥ कर्म बुद्धीचें तें सुख ॥ अति मानिताती मूर्ख ॥ चंद्रासी लावला कलंक ॥ त्यासी दुःख प्रारब्धें ॥४॥ कर्मरेषा रे टळेना ॥ बाण लागला जगज्जीवना ॥ कृष्णें सांडिल्या गोपांगना ॥ नारायणें प्रारब्धें ॥५॥ हरिश्चंद्र तारामती ॥ घोर जन्मांतर भोगिती ॥ नळ राजा तो पुरुषार्थी ॥ त्यासी दुःख प्रारब्धें ॥६॥ पतिव्रता सुशील ॥ दमयंती पायपोळ ॥ असे अनिवार कपाळ ॥ तिसी दुःख प्रारब्धें ॥७॥ राज्य सोडिलें रघुवीरें ॥ सर्व मिळुनियां वानरें ॥ फिरेदेश देशांतरें ॥ त्यांसी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

दुःख प्रारब्धें ॥८॥ ते फिरतां काय झालें ॥ पुढें प्रारब्ध ओढवले ॥ जानकीसी राक्षसें नेलें ॥ तिसी दुःख प्रारब्धें ॥९॥ कर्माधीन शरीर ॥ परब्रह्म रामचंद्र ॥ रघुपति विष्णुचा अवतार ॥ जन्मांतर म्हणे नामा ॥१०॥

१४ नक्कल

कांट्याच्या अणीवर वसति तीन गांव ॥ दोन ओसाड एक वसेचिना ॥१॥ वसेचि ना तेथें आले तीन कुंभार ॥ दोन थोटे एक घडेच ना ॥२॥ घडेच ना त्यानें घडलीं तीन मडकीं ॥ दोन कच्ची एक भाजेचि ना ॥३॥ भाजेचि ना त्यांत रांधले तीन मुगे ॥ दोन हिरवे एक शिजेचि ना ॥४॥ शिजेचि ना तेथें आलें तीन पाहुणे ॥ दोन रुसले एक जेवीच ना ॥५॥ जेवीच ना त्याला दिल्या तीन म्हशी ॥ दोन वांझ्या एक फळेचि ना ॥६॥ फळेचि ना तिला झाले तीन टोणगे ॥ दोन मेले एक वांचेचि ना ॥७॥ वांचेचि ना त्याचे आले तीन रुपये ॥ दोन खोटे एक चालेचि ना ॥८॥ चालेचि ना तेथें आले तीन पारखी ॥ दोन आंधळे एका दिसेच ना ॥९॥ दिसेच ना त्याला मारल्या तीन बुक्क्या ॥ दोन हुकल्या एक लागेचि ना ॥१०॥ ज्ञानदेव म्हणे याचा तो अनुभव ॥ सद्गुरुवांचूनि कळेचि ना ॥११॥

१५ बाजेगारी

संसार बाजेगारी लेख ॥ दुरलग अंदेशा कर देख ॥ जो कुच होना सो कदा न चुके ॥ वल्ले वस्तादकी पदनामी ॥ आखर जमानी ॥ या दिनके बुरे हाल होवेंगें ॥ दुनयामें बडा बडा तमासा ॥ बडे बडे हुन्नेर लगे ॥ विन्ना अविद्या बोलना एक ॥ वल्ले वर्णूके अनेक ॥ इस काममें बडे बाजी ॥ जिसकू अंत न पाया ॥१॥ अरे देख देख देख ॥ परी पैगंबर आवलिया ॥ सैदसादात विषया ॥ कुसटे वासना उठना हाटे ॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अरे देख देख देख ।। दौड दौड दौड ।। जबलग उजाला तबलग दौड ।। अधेरा पडेगा पीछे कछुना चले ।। आपसु आप बाजी नदे ।। बुरे सददेना धंदे ।। हरिदासके प्यारे ।। रघुनाथके बंदे ।। कह्या न भावे ।। फाड फाड खावे बांदरासे रान हुवे ।।२।। तमासा देख आलम खुष हुवे ।। दिल बांदरारजापाले ।। तो मुकेचंना बाहेर मेले ।। नाना विषयवासना बाहेर मेले उठे ।। उठे बैठे लेटे लेटे ।। कहुतो चुकाची लेटे ।। दिलबांद राज्या तलब बाजेगारी ।। येही खेल तो मेरा नामकी हाहै ।। अजब बाता ।। अव्वल मुजे नामकी नया ।। दरम्यान मैं पैदा हुवा ।। सलखन सुखाद बैठा ।। वाह मुथी उठा नाठा ।।३।। उसथे बैठा निरखण कामार ।। चैलाया सलखन उस देखती सलखन ।। बडे महाजन द्वारीं ।। कहने लगे सलखनका तमासा देख ।। वसे ले मुजे नील खनका तमासा देखना ।। जहा हाहा हौ अलेबेबेबे ।। अलेलेल अतततत ।। वोही हा वोही हा हो जोर है जोर है ।। ढलेगा ढलेगा ढलेगा ।। ढलेगा सो पडेगा ।। पडेगा सो चढेगा ।। हुशार भाई हुशार भीतरथी हुशार तो सुखी ।। बाहेरथी हुशारी तो बहु हुशारी ।।४।। गुरु बडा क्या चेला बडा ।। बाप बडा क्या बेटा बडा ।। बुढा बडा क्या जवान बडा ।। जवान बडा कु तितका वाचा ।। बढी चढी उद भोकु भोकाने ।। गुरु, बडा क्या चेला बडा ।। चेला बडा तो चेला वडा ।। तो चेलाभी बडेपनामें पढा ।। गुरुके बढाईसे चेला बडा ।। बाप बडा क्या बेटा बडा ।। तो बाप नाम बेटा धरे ।। बेटीकी चाकरी बाप करे ।। बापके शिरपर बेटा चढे ।। उसबदल भडेपणा घडे ।। जवान बडा या बुढा बडा ।। बुढा जागे है मरे जाय ।। जिवना बहुत तवाना होय ।। बुढा बडे जवान चढे ।। इसबदल बडेपनामें पढे ।।५।। नजरकर नजरकर नजरकर ।। यार हो नजरकर नजरकर ।। नजर करेगा सो जितेगा ।। नजर न करेगा सो हरेगा ।। हार ना देना जिता लेना ।। हुशार भाई हुशार ।। हुशार होकर संभाल ।। मैं कैसी चौंधी ल्याउंगा ।। मैंने भल्या भल्याकूं

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

चौंधी दिया ।। मैंने बडे बडेकू बेड लगाया ।। देख देख तमासा मेरा ।। मैंबी भांडीकू चौंधी दिया ।। वो मृगीके चौंधीनें ल्याया ।। ऋषीशृंगीकूं चौंधी दिया ।। वो नाचनीको दुमाल ल्याया ।।६।। वोपाराशग्कूं चौंधी दिया ।। वो दुर्गंधाके ख्याल ल्याया ।। यक घडीनें तप गमाया ।। दुर्गंधाकों सुगंध किया ।। उसके जगामें व्यास निपजीया ।। वो महादेवकूबी चौंधी दिया ।। वो मोहनीके दुमाल ल्याया ।। ब्रह्माकूंभी चौंधी दिया ।। वो अपने बेटीकूं ख्याल ल्याया ।। मना करता याद न पाया ।। सारस्वतकूं है लहवा ।। तुमारों विष्णूकूभी चौंधी दिया ।। वो वृंदाके मस्तानमें लीठाया ।। वो नारदकूंबी चौंधी दिया ।। वो पलखम्यानें नारदी किया ।। अंधुलकरते पेट बढाया ।। साठ बेटेका हुकुम जनाया ।। वो तुमारे असल देवजीसी नामरूप नहीं उसे वडे देवकूं चौंधी दिया ।। आधी औरत आधा मरद किया ।। आप आपसो बतलाला ।।७।। रहे रहे रहे चिपरिके रहे जा ।। अपने जगोमें रहेजा ।। जगा छोडकर जा ।। न जावेगा तो झेता मारमारूं ।। मारते मारते मारते डांगोरा ।। उपरा पिळकुटेगा ।। दात निकसकर पसरेगा ।। डगा तुमके पेटकुं जावेगा ।। इस बदल गुमरपना दुरकर ।। मौंजदकू याद धर ।। धरेगा सो ऐसी धर ।। विजयाकं मुसम वीसर ।। देख देख देख ।। लढूं नको लढूं नको ।। चौंधीकी जगा लढूं नको ।। बाहा लीज्य पडूं नको ।। उस जगा लीड पडेगा ।।८।। तो मरगतकी शीर चढेगा ।। तो कालका फांसा पडेगा ।। वो तुजे कैचिपछोडेगा ।। इस विषयाकुं लढूं नको ।। हमारा दाता कुच देता नहीं ।। इस बदल हमकुं विषयाकुं लढत है ।। वाहा बडे बडे जन राजद्वारीं बैठे है ।। कछु देना सो आज देनका दीन है ।। हिल वाहा सो देवो ।। कुचमथी नाम बोले ।। दिलकी गांठ खोलो ।। अखबतकूं काम आवेगा ।। उस खैरातपर हात चले चीप बैठे मुडी हालवे कुछ काम नहीं ।। जाहासो दिल देवेंगे ।। तो निजभोजकूं पावेगें ।।९।। सुखशांति सुखेच्छावेगें ।।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

भीरतिकेति मेव खावेगे बड्या बड्याकी बोले बढाई ।। ऐसा कुच देवो ना ।। चीप बैठे मुंडी हलावे कुछ काम नहीं ।। ऐसा कुच देवो जो खाते पीते भरे ।। भरे यासों कभहुनारसे ।। पोगडयाटीकुं खातापुरे ।। सबलिया जमकूं बसकर ।। ऐसा कुछे देवो ना ये क्या देवेंगें बिचारें ।। इतला दिया भीक मंगनेकूं गया ।। उसकी दौलत कहांकी है लेठीने लिया ।। इगानपर दुगानी दुगानीपर तिगानी ।। जिसके तिसरे घर दुगानी ।। परती रुका येक देवेंगे बिचारे ।। तोमेरे दाते कैसे हैं ।। हमारा तमाशा देख ना ।। तो हमारा कुछलेना ।। हमकूं कुछ दिल देता ।। ये तो बहुत मुस्कल है हमणा ।। देना नहीं भोजराजा दे सके नहीं ।। विक्रम दे सका नहीं ।। इंद्र दे सका नहीं ।। कुबेर दे सका ।। इतना देवतो पेट भरभर लेवें ।। वे क्या देवेंगे बिचारी ।।१०।। तो मरे दाता कैसा है ।। दिदलर्यावमोव्हजुद भर्याव ।। उने आपना कर धर्याव ।। उनके संतकथमें मेरा जीत खचलता ।। उन्हथें में राजें नावाक उस खेलता उन्हेथी मेरा जीव जीवता ।। उनकूं मंगता क्या बनाता ।। काट सक्या नजर करो नजर करो ।। भाइ हो नजर करो ।। भाइ हो नजर करो ।। नजर करेगा तो जीतेगा ।। नजर न करेगा तो हारेगा ।। हार ना देना जीता लेना ।। अव्वल एक एक के दो दो के तीन के पांच पांचके पचीस ।। गाफल कहते दस बारा पंधराबीस ।। बल्ले सही जान पांचके पचीस ।। बादीका साप किया भल्या भल्याकूं बडे बडेकूं उन्हे ल्याई मयाया ।। बिन लढे उने जगत्र भुलाया ।।११।। गाफळ कहते मेरी माया ।। गुरुका बोध ऐसा पाया ।। ऐसी हमारी छाती गाये ।। वो क्रोध बाग कुरवाये ।। अहंकार सापल देना चढे ।। मुवा जैसा जिपकाचि पढे ।। परका खबुतरकामी पर ।। वो बात सबहि दुरकर पंखबीन एक हंस कीया ।। उढै चढै बिन सत्य लोककुं गया ।। सनकादिककी काढी माया ।। मुख्य मूळ ब्रह्मा हुशार किया ।। उन्हे हंसने बडा तमासा किया ।। ब्रह्मासनथी मुंड मुंडाया ।।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitization by eGangotri

आपे भी वाहवा छपी खाया ॥ हुशार देख तो नजीकचि पाया ॥ एकमो अनेक अनेकमो एक ॥ येही देखनाबे हुशारीमें देख ॥ वाहा नहीं देखना दुःख ॥ येही खेल खेलते समाधी सुख ॥ एकाजनार्दनीं जग समस्तं ॥ इस बाजीमें भिस्तदस्त ॥ देखे फिर तो अजब बात पैगंबर कहै ॥ सदर हामत येही तमाशा सिद्ध देखे ॥ जो देखे सो जुदा नहीं देखे ॥ एकाजनार्दनी बैसका बाजेगार एन हलक ॥१२॥

१६ गारुडी १ ला

आदि पुरुष निर्गुण निराकारकी याद कर ॥ मेरे गुरुपरवर दिगारकी याद कर ॥ जिन माया अजब बनाई उस वस्तादकी याद कर ॥ गैंबी खजीना हमकूं दिया ॥ उसकूं साहेबकी याद कर ॥ संतमहंतकी याद कर ॥ गुणी गुणवंतकी याद कर ॥ श्रीभगवतकी याद कर ॥ जोग जुगतका बांधा तोडा, शम दमका संबला सिरपर छोडा ॥ समता सोहि सुहावे तुरा ॥ गुरु गारुडी बीर पुरा ॥ नैन चीरके पैन्ही मुद्रा ॥ कान फाडके खाये निद्रा ॥ अनुहात धुनुकूं मुख बजावें ॥ नागसुर धनु गर्जे ॥ चल चल निरंजन चल जंगलके जिवडा ॥ खेलना होयसा उलट दृष्टीसे खेल ॥ आबी करूंगा खेल तरी मुंडी काटुंगा ॥ सापसे भुले बिच्छु कीडेपर पंचकोटि परमो आनकर पडे ॥ बडे बडे जनावर पालेहारे ॥ लाले, जरदे, उजले, काले, पीले ॥ भला बे भला ॥ अभिगान चिकडे झुठपुठ विण चुलटे नहीं ॥ कहुंतो ब्रह्मांड काटने दोरे देखो मियां ॥ हाय हाय डंख मारा बे डंख मारा ॥ सो बडे बडेसे नहीं उतारा ॥ सद्गुरू ग्यानका लगाया मोहरा ॥ जहर उतारा ॥ मीया बाजीगारी विद्या खेल ॥ हंडीबाग बडा अलबेला ॥ हात हलावे पाय हलावे ॥ भाले भौंले लोक भुलावे ॥ आवे हंडी बाग ॥ बाप बडा क्या बेटा बडा ॥ बेटे आगे बाप खडा ॥ गुरु बडा क्या चेला बडा ॥ चले आगे गुरु खडा ॥ चेला तो प्रेम महेलपर

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

चढा ॥ धनी बडा क्या चाकर बडा ॥ चाकर आगे धनी खडा ॥ सास बडी क्या बहु बडी ॥ बहु आगे सास खडी ॥ बिबी बडी क्या बांदी बडी ॥ बांदी आगे बिबी खडी ॥ निराधारकी लेके कडी ॥ बिबी खसमके छातीपर चढी ॥ तैं बड्या क्या मैं बडा ॥ मेरे आगे तैं खडा ॥ तैं नहीं अमल छायहि ॥ ग्यानीकुं ग्यान लगाऊं ॥ लोभेकुं अंधेकुं उजाऊं ॥ फूक मारू ती जा जा जा ॥ बोधके पहाडपर जा बे जा ॥ जहां आना नहीं जहां जा ॥ मेरे सद्गुरु दाताकी इत्तिसी लकरी ॥ मुल मतर हातमो पकीरी ॥ जिधर दवरा उदर दवरीं ॥ हेर देखी तो मेरी मेरे सात ॥ अंबी करूंगा खबुतरका तमासा ॥ बिनपर उडता है खासा ॥ देखे तो अविद्येके खलीनेमें घुसा ॥ तो बाहेर आवेगा ॥ आव बे आव बाहेर आव ॥ जिसे नही गांव ना ठाव ॥ जिसे नहीं रूप रेखा ना भाव ॥ ना कुछ नहीं ॥ धीरे धीरे तेरेबी मंतर खोल ॥ लिंगदेहीं गांठ खोल ॥ एक बार ऐसा खेल खेलूं ॥ सो मैं बडे बडे खेल खेले थे ॥ हा तो एक, एक के दो, दो के तीन, तीन के चार, चारके पांच, पांचके पचीस, पचीस के छत्तीस; छत्तीस का एक एक भी न हो तहां एका ज० ॥१॥

१७ गारुडी २ रा

संकासुरानें तप करून ॥ केलें ब्रह्म्याचें आराधान ॥ तेथें वेद मूर्तिमंत जाण ॥ संकासुरास नव्हतें मरण ॥ आकाशीं जळीं काष्ठी जाण ॥ असा वर दिधला होता महान् परमेष्ठीनें ॥१॥ अरेरे वेद नेले चोरून ॥ शंखासुराचा वध करून ॥ चारी वेद आला घेऊन ॥ गरगर चक्राकार भवंडी ॥२॥ अघोर दैत्य मातले जाण ॥ धरा रसातळास नेऊन ॥ कूर्मरूप घेतले विष्णूनें ॥ मेरु मांदार टाकिले घुसळून ॥ वासुकीची पराडी करून ॥ चवदा रत्नें काढीलीं कोण कोण ॥ आललल त्यांचीं नांवें भिन्न भिन्न ॥३॥ वराहरूप घेऊन हरी ॥ क्षिती घेतली दाढेवरी ॥ महाबलाढ्य वराह हरी ॥ दैत्यदानवांचा संहार करी ॥४॥ गुर गुर धरा तारीली की

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitization by eGangotri

यानें ।। हिरण्यकश्यप मातले जाणे ।। देश बांधून त्रिविध तापानें ।। त्याचें नाहीं जन्म मरण ।। धरी मृत्यु नाहीं म्हणून ।। जळीं काष्ठीं पाषाणीं जाण ।। प्रल्हाद पोटीं आला जाण ।। भूभार हरावया कारण ।। स्तंभीं प्रकटला नारायण ।। अरे ! रे! रे! रे! उदर टाकिलें चिरोन ।।५।। पांचवा अवतार जाण ब्रह्मचारी ।। उभा राहिला बळीच्या द्वारीं ।। दान, मागे श्रीहरी ।। बळी पाताळीं घातला द्वापारीं ।। बाण मारून वाम नेत्र छेदिला ।। तर तर रर रा माझा गारूडी वीर पुर ।।६।। साहवा अवतार झाला परशुराम ।। एकवीस वेळां निक्षत्री धरा जाण ।। केली माझ्या स्वामीनें ।। शीर मातेचे उडवून ।। साच केलें पितृवचन ।। काम धेनू आला घेऊन ।। पहा पहा कीर्तिनें त्रिभुवन ।।७।। सातवा अवतार अजनंदन ।। त्याचा पुत्र रघुपति जाण ।। केलें अहिल्येचें उद्धरण उदकावरि पाषाण तारून ।। कुंभकर्ण इंदजित जाण ।। अ त त त त घेतला रावणाचा प्राण ।। ८।। आठवा वसुदेवाचा नन्दन ।। त्याला कंसाचा बंधन ।। सात गर्भवधिले त्यानें ।। महामाया आठवी जाण ।। यशोदेच्या उदरीं घालून ।। बंदी उपजले आपण जाण ।। द्वादशकला छेदून ।। केला नन्दाचें मोचन गोकुळीं घातला नेऊन ।। तेथील माया आणिलीं उचलून अष्ट वर्ष निवांत जाण ।। तुम्ही आतां सुखी रहाणे ।। कंस चाणूर मारीन ।। शिशुपाळाचा घेईल प्राण ।। मग ठेवीन धनुष्य बाण ।। देवकी तुझ्या गळ्याची आण ।। आजपासून पांच वर्षांनीं ।। एकदां भेटी देईन जाण ।। तोंवरी स्थिर करा मन ।। आतां करतों तुमचें ध्यान ।।९।। नवव्या उभा विटेवरी ।। काय वर्णावी त्याची थोरी ।। मौनरूप धरून हरी ।। दोन्ही कर कटावरी ।। दृष्टी नासाग्रीं ठेविली सारी ।। भक्तजनांस कृपा करी ।।१०।। दहावा कलंकी होणार ।। अश्वगमन करील सार ।। चंद्र सूर्य बुडेल आकार ।। मग कैचें चराचर ।। जनार्दन म्हणे कोण पाहाणार ।।११।।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

१८ गारुडी ३ रा

अभक्तिचा जिव्हाळा ॥ पाहा किती आंगी भरला ॥ अभक्तांशी बोलतो ॥ विंचू जैसा झोंबतो ॥ पाहाओ त, त, तता, बडी बडी बात करतो ॥ दांत विचकून पाठी लागतो ॥ आल्या गेल्याशीं उत्तर करीतो ॥ आलथा घालून तुला तुडवितो ॥१॥ अब ब ब बा ॥ कर्म तुझें ओढवलें ॥ विषयसुखांत लंपट झालें ॥ आरशांत तोंड पाहिलें ॥ धर धर कीं आला रगडा ॥ तोंडावर मारतो घुसडा ॥ गती मागतां दांत खाय करकरां ॥ अंगीं नाहीं भक्तीचा वारा ॥२॥ अव. च च चा धर बे धर महा हुन्नर ॥ कशीं उड्या मारती ॥ हो, हो, हो, हो, चिपू बैठे बे चिपू बैठे ॥ वादिकूं वाद, छातिपर बैठे ॥ दुस्मानकूं रगडा ॥ कैक मारितो ॥ चल, चल, चल, चल, त्याचें तोंड झालें काळें ॥ गती गारुडी अवधान बोले ॥३॥ शेंडी धरून वांकवितों करकरा ॥ हा पंचभूतांचा मारा ॥ सोडितो अवधन दांत विचकून चढतो फार ॥ यारे यारे विषय खेळ ॥ हा फार दोड किं रे ॥ त्यानें विश्वामित्राची मोडली खोड किरे ॥ तुमची आमची कोण गती ॥ विश्वामित्र रंभेच्या मागें ॥ कुत्रा होऊन लागलासे ॥ हुलु, लु, लु, लु, अशा मोठमोठ्यांच्या गती ॥ किमर्थ तूझा पाड किती ॥ तुका म्हणे जन भुलले ॥ नरकवासी प्रवेशले ॥ मारुड्यांचा खेळ केला ॥ तुका विमानारूढ झाला ॥४॥

१९ दिवटा

जागे या जागे वाढियामध्यें जागे ॥ या वाडिया बाहेर जागे ॥ किती एक तळमळ करीत गेले ॥ हेंचि खिंडाराचें खिंडार ॥ कोण्या गृहस्थाच्या पेठांत ॥ कोणास दैवांच्या वाड्यांत, लवकरी काढा बैसावया घोडा ॥ करी या शब्दाचा आडामोडा ॥ बरीच लेंकुरांचा खेळ कीं राया ॥१॥ पैल लंकेचा चौहाटा ॥ तेथें मी एक बोलिलों दिवटा ॥ तो रांडेचा रावण म्हणे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

हा दिवटा खोटा ॥ राक्षसावानीच बोले तेव्हां राम अवतरला ॥ त्यांच्या एकची खांडें ॥ दहा शिरांचीं मुंडें ॥ वीस भुजांची खांडें ॥ त्या लंकेपुं घोष मांडिले ॥२॥ आणखी त्या बायकोच्या छंदे ॥ त्या हिरण्यकशिपाचे फुटला फांटा ॥ तो म्हणे हा दिवटा खोटा ॥ मी म्हणे मरण नाहीं मला ॥ तो म्हणे जिवेंच मारीन तुला ॥ इतक्यामध्यें नरसोबा म्हा अवतरला ॥ डोळे फिरवी गरगरां ॥ दांत खाय करकरां ॥ कोंप चकचकावला ॥ हळु गांढ्याळीचे द्वारी ॥ दे दान मज दिवट्याला ॥ नाहीं तरी नागवसी या बोलिला ॥ आणखी वान दे गांवच्या जोराला ॥३॥ तें विघ्न टळेल तुझें ॥ मण पांच कणकीचा दिवा ॥ मध्यें मण पांच घृत । सोळा हात पासोडा ॥ दीड तोळा सोन्याचा मोकडा ॥ ऐसा द्यावयाचें दान ॥ एक दाता जनार्दन ॥ इतर लंडी काय देऊं जाणे ॥ ज्याला आ कृपण विषयाचे ॥ एका जनार्दनाचा दिवटा ॥ भक्तिच्या वसविल्या पेठा । सायुज्याची नरदेहीं ॥४॥

२० डौर (पंचनाद)

पांच नाद चटपट चटपट चटपट चटपट ॥ खटपट खटपट खटप खटपट ॥ फटफट फटफट फटफट फटफट ॥ लटपट लटपट लटप लटपट ॥ तळमळ तळमळ तळमळ तळमळ ॥

१ ला नाद - चटपट चटपट चटपट चटपट शिखा सूत्र सपाट ॥ वी जाहो मीला दुष्ट परी अफुट तैसाची ॥ वायां केली ताड तोडी वृथ । त्यजिली सूतशेंडी विषयवासना ॥ नसंधी उपाधी गाढी श्रीपदा ॥ संन्या घेतला काचा ॥ जिव्हा शिश्न वेचिलें लाचा ॥ विटंबु केला कायाचा । यालागीं चटपट म्हणतात ॥१॥

२ रा नाद - खटपट खटपट खटपट खटपट ॥शास्त्रपरदना अलो बांधोनि विपत्ती मोट ॥ सेना सुनाट धावनी वाद तर्का लावा लावी । भरलाविषयांचे नि नादीं ॥ वरि वरि वृंदावना दिसे बरवें ॥ परि अंत

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कडवटगा दादानो ॥ या लागीं खटपट म्हणतात ॥२॥

३ रा नाद - फटफट फटफट फटफट फटफट ॥ या नादाची वाट नीट ॥ ओलंघुनी औटपीठ ऊर्ध्व पाप भेदती ॥ मग पवन समरसेनी ॥ ब्रह्मरंध्री लीन होऊनी ॥ हा अभिमान वाटोनी ॥ झालेंपणें कुंजती ॥ तें ओखटें गा डौराकर करूनी देहाचा मातेरा ॥ भरूं पाहातां सुषुम्नाद्वारा ॥ परी असाध्य खरा तो मार्ग ॥ या लागीं फटफट म्हणतात ॥३॥

४ था नाद - लटपट लटपट लटपट लटपट ॥ मिळवूनि शिष्यांचा थाट ॥ अद्वैत ज्ञानाचा बोभाट ॥ भरला हाट जीवीं कैसा ॥ गुरू लाभें धनमान ॥ शिष्य लोभें अती लीन ॥ दोघांसी लटपट लागली पूर्ण कोणी कोणासी आवरेना ॥ या लागीं लटपट म्हणतात ॥४॥

५ वा नाद - तळमळ तळमळ तळमळ तळमळ ॥ धरणेंपारण निर्मळ ॥ तीर्थयात्रालागीं चपळ ॥ घेतला पळ जीविकेशी नानावृत्ति आरंभिली ॥ नाना दैवतें पूजिलीं ॥ शेखीं काळें नरडी चेपिली ॥ दुःखे तळमळे गा दादानों ॥ यालागीं तळमळ म्हणतात ॥५॥

ऐसें पांच भेद नादाचे ॥ मनीं धरा विवेकाचे ॥ ज्ञानदेव म्हणे निवृत्तींचे ॥ बोला वाचे ॥ हरिनाम दादानों ॥

२१ डुगडुग्या

डुग डुग डुग डुग डुग ॥ डुग डुगोनि गेले चार युग ॥ कामक्रोधाचेनी लागवेग ॥ मनामागें धांवत ॥ डुग० ॥१॥ हीत नोहे गा सर्वथा ॥ गेले हरपोनी पाहतां भुलले मायेनें सर्वथा ॥ यमपंथासी जाती ॥ डुग० ॥२॥ जातां यमपुरीच्या वाटे ॥ जीवांसी आघात आहेत मोठे ॥ संचितक्रिया नामाचे सांठे ॥ तया वाटेसी जाउं पाहे ॥ डुग० ॥३॥ जे भले सात्त्विक संत ॥ आहेत निशिदिनीं गुरूचे भक्त ॥ त्यांसि माझा नमस्कार येत ॥ गुरूसी शरण जा वेगीं ॥ डुग० ॥४॥ गुरूसी गेलिया शरण ॥ काय करील जन्ममरण ॥ स्वरूपीं लागेल अनुसंधान ॥ निज निधान प्रकट

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

होय ॥ डुग ० ॥५॥ आणिक एक सांगतों शकुन मोठा ॥ तुज लाग एक्या बायकोचा चपेटा ॥ तिच्या चांगुलपणाला सुभटा ॥ भुलुं न सर्वथा ॥ डुग० ॥६॥ आणिक एक तिची करणी ॥ विष्णुस लाहि वृंदेच्या स्मशानीं ॥ नारदाची नारदी करूनी ॥ साठ पुत्र जन्माविले डुग० ॥७॥ यालागी तिचा पदरू नाहीं बरा ॥ अंतीं दगा देईल सारा अजुन तरी हित विचारा ॥ दान करा पीडा टळे ॥ डुग० ॥८॥ बहुतांशीं दिधला दगा ॥ ईश्वरासारखा भुलविला ॥ ब्राह्मणासीं लाविला ॥ रत झाला कन्येसी ॥ डुग० ॥९॥ नवाठायीं फाटला झगा तो नये तुझे उपयोगा ॥ विषय भोगीत आंगा ॥ तो मज पिंगळिया ॥ डुग० ॥१०॥ कळा मीच काळीं चिरगुटें ॥ पदीं बांधून तूंपणाचें मीठ ॥ त्रिवर्ग करोनि रोकडे नीट ॥ ओवाळून टाकी आतां डुग० ॥११॥ तेणें टळेल तुझी पीडा ॥ चुकेल मी तूंपणाचा झडका स्वरूपीं होईल आनंद गाढा ॥ श्रीजनार्दनप्रसादें ॥ डुग० ॥१२॥ एक जनार्दनीं प्रेमबोध ॥ प्रगट होय संबंध ॥ पिंगळा भाकीतसे प्रबोध परोपकार जाणेगा राया ॥ डुग० ॥१३॥

२२ वैदू

श्रीकृष्ण माय जी पाहे ॥ तें मीं झालें कइ काय ॥ कई काय देव अंग ॥ कई काय झालें जग ॥ कर्म ब्रह्म रे विभाग ॥ त्यापासोनी क आम्या ॥ १॥ गौरी आई वो आम्या ॥ सांवळाई वो आम्या ॥ ब नामाची वो आम्या ॥ बरव्या रूपाची वो आम्या ॥२॥ शूळ शुळाई आम्या ॥ मत्साई वो, कत्साई वो, वाराई वो, नरसाई वो, ॥ वामनाई वो, ठेंगणाई वो, परसाई वो, रमाई वो ॥३॥ कृष्णाई वो, बोधाई काळकाई वो आम्या ॥ भागाई वो, रेणुकाई वो, गडबडाई वो चांगुणाई वो, तुकाई वो आम्या ॥४॥ काय तुझ्या भ्याचें साद पाहे सांगणे बोलणें न चले वो माये ॥ तुझ्या जोवींचें सांगेन ॥ तूं जें पुसशी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सांगेन ।। तुझ्या मनींचें सांगेन ।। जें सप्तपाताळाखालीं तें तूंच जमाजीं ।। तेंच मजमाजी ।। काय धमक घेऊन बसली सग धमकटी ।। झ्या धन्याची आस करीन ।। कीं कांकणाची चाड धरीन ।। थुः तुझ्या ोंडावरी ।। थुः तुझ्या लोभावरी ।। शकुन सांगेन तें एक ।। काळबाई वो ाम्या ।। ५।। मागूं त्या बुरगुंडा ।। नीट केल्या बहुत रांडा ।। तैसा नव्हे ी कई काये ।। निजज्ञान करंडा ।। काळीकाई वो आम्या ।।६।। नम ानडी भाषा ।। केळ वशीव विघ्नेशा ।। शकुन केळी शकुन केळोसा इयो मो आर ।। सीड वीड आशा ।। विड ह्याळ्याचा गन्मोड होऊंगे ाम्या ।।७।। गंदीनें धन्नानें तमिन्नें गबीनें हाढव्याना ।। आड व्याठ मोहो ाई तुडा ।। काळा आई वो आम्या ।।८।। नमो तैलंगदिशा ।। मच्छ मच्छ ाषा ।। सराबे मुसल ल्लोपे आम्या ।।९।। मिचित उनाळु ।। कडयाळु ।। निया‍ळु ।। खखठाये ।। काळी आईओ आम्या ।।१०।। कई काय कई काय ।। शकुन सांगेन ते ऐक कइकाये कइकाये ।। नकळे ब्रह्मादिकां ।। कई काय वृत्ति खोटी ।। कई काय कई काय ।। सत्य सांगेन गोष्टी ।। ीवा शिवा पडली मिठी ।। एक जनार्दनाच्या कोटीं ।। काइ भाई वो ाम्या ।।११।।

२३ जोशी १ ला

मी परात्पर जोशी ।। होरा सांगेन संतसभेसी ।। माझें वचन मानाल ानसीं ।। तरी दृढ निश्चयेसीं ।। परिसावें नाना ।।१।। ऐका ऐका ाजेश्री ।। प्रजा मोकदम कारभारी ।। शेटे महाजन चौधरी ।। बरवी नगरी सविली नाना ।।२।। राहाट काटाचे दिवस आले ।। जागे सांडोनी फेरे केले ।। मागें कष्ट बहुत भोंगिले ।। शेवटीं फळ आले नरदेहासी ाना ।।३।। या पंढरीस मागे बहुत आले ।। जोशी भविष्य सांगोन ोले ।। त्यांचे तुम्हीं नाहीं ऐकिलें ।। दगे झाले थोर थोर नाना ।।४।। काळाचे फेरे होऊन गेले ।। नगराचे संहार झाले ।। साच बोले माझ्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

बोले ॥ जोडी केली आत्मयुक्ति नाना ॥५॥ घेडा मांगाच्या मानत
झाल्या ॥ उत्तम योगी भिक्षेस लागल्या ॥ तें ऐका मज जोशाच
बोला ॥ उत्तम ते पडले अधम घरीं नाना ॥६॥ नांव का
पाटीलबुवांचे ॥ पुढील भविष्य सांगेन साचे ॥ वचने ऐका मज जोशाचें ।
तेणें तुझें समाधान होईल नाना ॥७॥ एका बायकोची संगत घडली ।
तेणें तुझी महिमा बुडाली ॥ जुनी भाकर सरोनि गेली ॥ गांठ पडे
दारिद्र्याची नाना ॥८॥ तिचा संग टाकी दादा ॥ बरवा चालेल तुझ
धंदा ॥ सांच मानी माझ्या शब्दा ॥ सदा सर्वदा सुखी होसी नाना ॥९॥
नांव काय आबाजीचें ॥ कल्याण होईल बयाचे ॥ पुढील भविष्य सांगे
साचें ॥ तरी तुझें तेणें समाधान होईल बये ॥१०॥ बया आणिक ए
सांगतो मात ॥ टाक कुबुद्धि पाहुं दे हात ॥ फार बरेपणा दोघांत ।
स्त्रीपुरुषांत बहु गोडी बये ॥११॥ विघ्न दिसतें वरले आळीं ॥ ना
पाहती थोर थोर बळी ॥ पूर्वपुण्यें जाहली होळीं ॥ फेर पाळी चुकेना
बये ॥१२॥ दहा लेंकुरे जाहलीं जाई ॥ परि तूं एकाचें सुख देखं
नाहीं ॥ आतां येथून पुढें पाहीं ॥ सुख होईल तें ऐक बये ॥१३॥ एक
लेकीची सासुरवाडी ॥ अपार सुख खाशीलपुढीं ॥ माझें वचन नको मा
लबाडी ॥ सत्य तुज पुढें बोलतो बये ॥१४॥ कुबुद्धीची कांचोळी ॥ ले
नको काळी चोळी ॥ दुष्टगत झाली सगळी ॥ ऐक नाम तु
बये ॥१५॥ विकल्प उडदांचा मेळावा ॥ द्वैत तांब्याचा पाऊड द्यावा ।
मन जोशा कारणें बये ॥१६॥ विषम बुद्धीचें नाणें ॥ ओवाळून द्यावें म
जोशा कारणें ॥ आपलें निःशेष बरें करणें ॥ तरी दान करी वेगे
बये ॥१७॥ साच मानीं माझ्या बोला ॥ येथून तुझा शनिश्वर गेला ।
जन्मगुरूचा पालट झाला ॥ संग घडला साधुसंताचा बये ॥१८॥ पू
जोशी जनार्दन ॥ सूर्यवंशी रघुनंदन ॥ तयासी अनन्य जातां शरण ।
उद्धरण तयाचें बये ॥१९॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

२४ जोशी २ रा

येथून पुढें बरें होईल ॥ भक्ति सुखें दोंद वाढेल ॥ फेरा चौऱ्याशींचा चुकेल ॥ धनमोकारी ॥१॥ मी आलों रायाचा जोशी ॥ होरा ऐका दादांनों ॥धृ०॥ मनाजी पाटील देहगांवचा ॥ विश्वास नका धरूं त्याचा ॥ घात करील नेमाचा ॥ पाडील फांशी ॥ मी०॥ वासना बायको शेजारीण ॥ झगडा करील मोठी दारुण ॥ तिच्या पायीं नागवण, घर बुडविशीं ॥ मी० ॥३॥ एका जनार्दन कंगाळ जोशी ॥ होरा सांगतों लोकांशीं ॥ जा शरण सद्गुरूसी ॥ फेरा चुकवा चौऱ्याशीचा ॥ मी आलों रायाचा जोशी ॥ होरा ऐका दादांनो ॥ होरा ऐका दादांनों ॥४॥

२५ जोशी ३ रा

ऐका ऐका राजश्री ॥धृ०॥ आम्ही परात्पर जोशी ॥ सांगो आलों संतसभेसी ॥ माझें वचन ऐकारे मानसीं ॥ दृढ वचनेंसी परिसावें ॥१॥ प्रजा सन्मुख पटवाडा ॥ शेठ्ये महाजन चौधरी ॥ बरी नगरी बसविला ॥२॥ या या पंढरींत जोशी आलों ॥ होरा सांगोनियां गेलों ॥ माझें नाहीं कोणी ऐकलें ॥ दगे पावले थोर थोर ॥३॥ सत्य मानीं माझिया बोला ॥ येथून तुझा शनैश्वर संपला ॥ जन्मगुरूचा पालट झाला ॥ संग घडला साधुचा ॥४॥ एका बायकोची संगत घडली ॥ त्यांने तुझी महती बुडाली ॥ शिळी भाकर सरोनि गेली ॥ गांठ पडली दरिद्राची ॥५॥ तिचा संग सोडिरे दादा ॥ बरवा चालेल तुझ धंदा ॥ साच मानी माझिया शब्दा ॥ जेणें सर्वदा सुखी होशी ॥६॥ विवेक उडदांचा मेळ मिळवावा ॥ संदेह बेलाचा घाट भरावा ॥ हृदयीं तांब्याचा पाउड द्यावा ॥ ओवाळून मज जोशाशीं ॥७॥ जोशी सांगोन जातो होरा ॥ भोळ्या भाविकां लहान थोरां ॥ एका जनार्दनीं दृढ धरा ॥ जोशी परत गेलियावरी ॥८॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitization by eGangotri

२६ शकुन

निर्गुण निराकार दादा माहूर माझें गांव ।। शकुन सांगावया आलें यमाई माझें नांव ।। तये नगरीं वस्ती केली मी तरी आलें एक भावें ।। ऐसा माझा शकुन दादा चित्त देऊन ऐकावें ।।१।। कै काये कै काय बाबा ।। दुरील माझा देश ।। शकुन सांगावया मी आलें कलियुगास ।। ब्रह्मा विष्णु महेश पुसतो शकुन आम्हां ।। ऐसें निदान आम्हीं सांगितलें त्यास ।।२।। धरीत्री आकाश मज देखतां उत्पत्ती ।। चंद्र सूर्य मज देखतां दादा होती ।। ब्रह्मा विष्णु महेश मज देखतां उपजती ।। जेथें आहे शिव तेथें आदिशक्ती ।।३।। दाही अवतार मज देखतां झाले ।। अकराही रुद्र दादा होउनियां गेले ।। ऋषि मुनि गंधर्व मज देखतांचि झाले ।। ब्रह्मा विष्णु महेश मज देखतां निमाले ।।४।। अठ्ठावीस युगें झालीं चक्रवर्ती ।। कौरवपांडव गेले दादा बहु नेंणों किती ।। छपन्न कोटी यादव गेले कोणें पंथी ।। तुम्हीं आम्हीं जाऊं मागें कोणी न राहती ।।५।। पृथ्वीमध्यें दादा एक विपरीत होईल ।। बहीण भावां दोघाजणांचा विवाह लागेल ।। पांचा वरुषांची बाळा भ्रतार मागेल ।। सहा वरूषांची नारी गर्भीण होईल ।।६।। आणिक एक दादा माझा ऐकावा बोल ।। पृथ्वी वरुता वारा थोर झुंजाट सुटेल ।। थोर थोर दादा पर्वत उडोनि जातील ।। अठराही जाती एके ठिकाणीं जेवतील ।।७।। कलियुगाची दादा ऐकावी थोरी ।। पुत्र होईल पित्याचा वैरी ।। भ्रतारा सोडोनि घरोघरी फिरतील नारी ।। ऐसा माझा शकुन दादा आइक निर्धारीं ।।८।। आणिक एक दादा माझें आइका उत्तर ।। आकार जाईल अवघा होईल निराकार ।। जाती चंद्र सूर्य पडेल अंधकार ।। धरित्री आकाश जाईल मग कैचा दिनकर ।।९।। आणिक एक शकुन माझा ऐकावा संतीं ।। तुम्हीं मूळपीठीं राहणें नांव माझें आदिशक्ती ।। अंबेचा व्यवहार त्राहे त्राहे आदिमूर्ती ।। एका जनार्दनीं प्रसन्न झाली आदिशक्ति ।।१०।।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

२७ सरोदा १ ला

डुग डुग डुग डुगोनि जाणें ब्रह्मयुग ॥ अहो त्या अहंममतेच्या पोटीं ॥ नका कीजे जाऊं ॥१॥ अहो त्या अहंममममतेच्या पोटीं ॥ संभवल्या ब्रह्मांड कोटी ॥ त्याची समुळ सांगेन गोष्टी ॥ माझें सरवद्याचे वचन ॥ ऐका कीजी राजांनों ॥२॥ मी निजानंदपुरीचा रहिवासी ॥ धांवोनि आलो तुम्हां संतांपाशीं ॥ शकुन सांगावया परियेशीं ॥ ऐका श्रवणेसी सावध राजांनों ॥३॥ मी जे बोलणें ते बोल ॥ तें समुद्रापरीस खोल ॥ धरी अबोलणें ते बोल ॥ इंद्रिया बोल असूं द्या ॥४॥ आतां सांगतो एक शकुन ॥ सर्वांगाचें करूनि कान ॥ श्रोतीं व्हावें सावधान ॥ निजात्म खूण पावोनि ॥५॥ मुळींची जे स्फुरली अहंता ॥ ब्रह्मींची सांगेन समुळ वार्ता ॥ अव्यक्ती झाली तत्त्वतां ॥ माया नित्य तया नांव ॥६॥ अहो त्या मायेचिया कुशीं ॥ उत्पत्ती झाली त्रिगुणाची ॥ तेविं ये आकार उकार मकारासी ॥ अर्धमात्रेसी ओंकार ॥७॥ अकार भूमिका विक्षेपता ॥ उकारीं जाणा गती याता ॥ मकारीं सलीनता ॥ सुलीन अर्धमात्रीं ॥८॥ अकारी रजोगुणाची वस्ती ॥ उकारीं तैजस म्हणती ॥ मकारी प्रज्ञा अभिमानी बोलती ॥ प्रत्यामात्म्याची वस्ती ॥ अर्ध मात्राची ॥९॥ अकार तो ऋग्वेद जाण ॥ उकार यजुर्वेद प्रमाण ॥ मकारीं सामवेद ओळखण ॥ अथवर्ण जाण अर्धमात्री ॥१०॥ ऐसा हा आकार ॥ विस्तार सांगितला सविस्तर ॥ जाणोनि अर्थसार ॥ सुखी सुखरूप असावें ॥११॥ आतां सांगतों एक शकुन बरा ॥ कांहीं मज सरवद्यास दान करा ॥ दान कराल तरी सोय धरा ॥ चौऱ्याशीं लक्ष फेरा ॥ न याल कीं जीं राजांनों ॥१२॥ कल्पनेचें काळे चिरगुट ॥ मीपणाची बांधोनि मोट ॥ विषयवासनेची सोडोनि गांठ ॥ कांहीं दान श्रेष्ठ मज करा ॥१३॥ आकाशाची घेऊन वाटी ॥ त्रिगुण तेल भरूनि तातीं ॥ दान करितां उठाउठी ॥ ओखटी पीडा टळेल कींजी राजानों ॥१४॥ म्यां शकुन सांगितला जनक

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitization by eGangotri

रायाप्रती ॥ त्याची कैसी झाली देहस्थिती ॥ देहींच असोनीं विदेही प्राप्ती ॥ या शकुनाचे कींजे राजानों ॥१५॥ आणखी ऋषीश्वर थोर थोर ॥ वसिष्ठादि विश्वामित्र ॥ सनकादिक पराशर ॥ याच विचारें नांदले कीं राजानों ॥१६॥ आणखी संतमहंतादिपती ॥ याच विचारें नांदलें किती ॥ अल्पही करतां त्यांचीं संगती ॥ पावे जन्ममृत्यूची गती कीं राजानों ॥ १७॥ निवृत्ति सोपान ज्ञानदेव ॥ ते नांदले याचि वैभवें ॥ खेचर विसोबा नामदेव ॥ चांगा वटेश्वर कीं जी राजानों ॥१८॥ परिसा भागवत गोरा कुंभार ॥ चोखामेळा महार ॥ रोहिदास चांभार ॥ जुव्हाई कबीर करिती विचार ॥ शकुनाचेनी राजानों ॥१९॥ आजि एक बायकोचा संग खोटा ॥ इने भुलविलें श्रेष्ठ श्रेष्ठा ॥ थोर पडिले आव्हाटा ॥ भुलले वाटा स्वहिताच्या कीं राजानों ॥२०॥ जो कां सृष्टिकर्ता चतुरानन ॥ इचा पदर लागतांचि जाण ॥ स्वकन्येसी देखुनी आपण ॥ तोही जाण वेडावला ॥२१॥ जो कां विष्णु सृष्टिपाळिता ॥ त्याची कैशी झाली अवस्था ॥ तोही झाला लोळता ॥ वृंदेच्या स्मशानी कीं जी राजानों ॥२२॥ जो कां श्रेष्ठ ईश्वर ॥ तोही झाला मोहनीचा किंकर ॥ या बायकोचा पदर ॥ लागतां हरिहर ब्रह्मा वेडे झाले ॥२३॥ याकरितां संग नका करूं इचा ॥ बोल ऐका मज सरवद्याचा ॥ माझिया बोला विश्वासाचा ॥ तो परब्रह्मींचा रहिवासी कीं राजानों ॥२४॥ डाकुलता झाला चालता ॥ परंतु नये बोलावतां ॥ निर्मळपदीं वास्तव्यता ॥ झाला डाकुलताकीं राजानों ॥२५॥ एका जनार्दनाचा एकुलता एक ॥ शकुन गांठी बांधिले देखा ॥ तेव्हा साधिली सत्वभूमिका ॥ परमार्थ फुका हाता आला ॥२६॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

२८ सरोदा २ रा

ऐका गा ए भाई ॥ सरवदा सांगतो काई ॥ येथें नाडेल माई दोघा पुत्रांची ॥ तें करिती तिची विटंबना ॥ अवघ्या प्रसिद्ध जनां ॥ एक न मारितां शाहणा ॥ तो जाणा सुख न पावे ॥१॥ धृ०॥ आणिक ऐका गा ए ॥ सरवदा सांगतो काय ॥ खरेंचि बोले तो जाय ॥ नरकामध्यें अधोगती ॥ हें चौघांच्या मुखे मना आणावेंलें सुखे ॥ अवघीं चुकती दुःखें ॥ खोटें बोला नरनारी ॥ आणिक नाडेल एक जाण ॥ सरवदा बोलतो वचन ॥ जागे माझें म्हणोन ॥ पडिलें स्वान तया घरीं ॥ म्हणोन न म्हणा माझें कांहीं ॥ निजी निजा सुखें ठायीं ॥ यत्न होईल तई ॥ चोराठायीं विश्वास ॥२॥ आणिक एकी परी ॥ सरवदा सांगतो थोरी ॥ दुःख पावेल नारी ॥ पतिव्रता यामधी ॥ पांचांनीं दिधली हातीं ॥ म्हणोनि न मानावी निश्चितीं ॥ परपुरुषा होय रती ॥ सुखगती ते पावे ॥३॥ आणिक एकी परी ॥ सरवदा सांगतो तें करीं ॥ दान देता जो न वारी ॥ नव्हे भला भला तो ॥ तुका म्हणिजे आई ॥ येथें नांव काई सांगसी ते ठायीं ॥ मरो रांडेचे ॥४॥

२९ डांका

चौक भरियेला आसनीं ॥ पाचारिलि कुलस्वामिनी ॥ वैकुंठवासिनी ये धांवोनीं झडकरी ॥ धृ०॥ रंगा येई वो विठाई सांवळिये डोळसे ॥ तुझें श्रीमुख साजिरें ॥ तें मीं केधवां देखेन ॥१॥ रज तम धुपारती ॥ पंच प्राणांची आरती ॥ अवधी सारोन आइती ॥ ये धांवोन झडकरी ॥२॥ मन मारोनियां मेढी ॥ आशा मनशा तृष्णा सुटी ॥ भक्ति भाव नैवेद्य ताटी ॥ भरोनि केला हाकार ॥३॥ डांका अनुहात गजरे ॥ येऊनि अंगांसी संचरे ॥ आपुला घेउनी पुरस्कार ॥ आरोग्य करी तुकयासी ॥४॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

३० बहिरव

रंगी नाचे क्षेत्रफळ ।। आग्या चैतन्य वेताळ ।। ब्रह्मानंदा गोंधळ ।। सुख सुकाळ माजिवला ।।१।। शिधा जागरे जगजोगी ।।धृ०।। अनुहाताची हुंबरी ।। बोध त्रिशुळ घेउनी करी ।। नाचे चैतन्य शिखरीं ।। सुख साहाकारी बहिरव ।।२।। चित्त चैतन्य योगिनी ।। मोह महिषासुर मर्दिनी ।। एका जनार्दनाचे चरणीं ।। भाव भवानी नाचती ।।३।।

३१ गोंधळ १ ला

त्रिभुवनामाझारी ।। एक विठाबाई सुंदरी वो ।।१।। उदो बोला उदो विठाबाई माउलीचा वो ।।धृ०।। गोंधळीया माझारी ।। एक पुंडलीक नेटका वो ।। घातला गोंधळ विठाबाई ।। दाविली तिही लोका वो ।।२।। गोंधळ घालित गेली कैसी ।। रावणाच्या घरा वो ।। शरणांगता रक्षिलें वधिलें दशशिरा वो ।।३।। वधूनि सहस्रार्जुना ।। सर्वे आणिली कामधेनु वो ।। कीर्ति चराचरी तुजला ध्याती ।। ब्रह्मा विष्णु वो ।।४।। करूनि गोपाळकाला गोंधळ ।। घाली वेणुनादी वो ।। गोपिकांसहित सर्व गोपाळांची मांदी वो ।।५।। आषाढी कार्तिकी तुझा गोंधळ वाळुवंटी वो ।। सनकादिक येती गरुडटकी ।। याची दांटी वो ।।६।। नामयाचा विठा कैसा गोंधळी नेटका वो ।। वडिलांचे दैवत कुळस्वामिनी अंबिके वो ।।७।।

३२ गोंधळ २ रा

आम्ही गोंधळी गोंधळी ।। गोविंद गोपाळांचे मेळी ।। धृ०।। आमचा घालवा गोंधळ व वासुदेव हरिनाम संभाळा ।।१।। दहा पांच घाला जेऊ ।। तुमच्या गोंधळाला येऊं ।।२।। काम क्रोध बकरा मारा ।। पूजा रखूमाईच्या वरा ।।३।। जेथें विठुचें देऊळ ।। तेथें तुकयाचा गोंधळ ।।४।।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

३३ गोंधळ ३ रा

सुदीन सुवेळ तुझा मांडिला गोंधळ हो ।। पंचप्राण दिवट्या दोन्ही नेत्रांचे हिल्लाळ हो ।। पंढरपुरवासिनी तुझे रंगणी नाचत असें हो ।।१।। नवस पुरवी माझा मनींची जाणुनिया इच्छा हो ।। पंढरपुर वा० ।।धृ०।। मांडिला देव्हारा तुझा त्रिभुवन माझारी हो ।। चौक साधियला नामी कळस ठेविला धरी हो ।। पंढरपुर वा० ।।२।। बैसली देवता पुढें वैष्णवाचें गाणें हो ।। जयघोषें गर्जती कंठी भूषण हो ।। पंढरपुर वा० ।।३।। स्वानंदाचे ताटी धूपदीप पंचारती हो ।। ओंवाळिली माता विठाबाई पंचमुर्ती हो ।। पंढरपुर वा० ।।४।। तुझें तुज पावलें माझा नवस पुरवी आतां हो ।। तुका म्हणे राखीं आपुलिया शरणागतां हो ।। पंढरपुरवासिनी तुझे रंगणीं नाचत असे हो ।। नवस पुरवीं माझा मनींची जाणुनियां इच्छा हो ।।५।।

३४ आंधळा १ ला

सहज मी आंधळा गा ।। निज निराकारपंथ ।। वृत्ति हे निवृत्ति झाली ।। जनन दिलें तेथें ।। मीपण माझें हरपलें ।। ठायीं जेथीच्या तेथें ।। अदृश्य तेंचि झालें ।। कांहीं दृश्य जें होतें ।।१।। सुखें मी निजलों गा ।। श्रुत सरोनि तेथें ।। त्रिकूटशिखरीं ना ।। दान मिळे आईतें ।।२।। टाकिली पात्र झोळी ।। धर्म अधर्म आशा ।। कोहळा चुकविला ।। त्रिगुणाचा वोजसा ।। न मागें भीक आतां ।। हाची झाला भरंवसा ।। बोलली सत्रावीगा ।। तिणें पुरविली इच्छा ।।३।। ऊर्ध्वमुखें आळविला ।। सोहं शब्दाचा नाद ।। अरूप जागविला ।। दाता देऊनी छंद ।। घेऊनि आला दान ।। निजतत्वीं निजबोध ।। स्वरूपीं मिळविलें ।। नांव ठेविलें भेद ।।४।। शब्द हा बहुसार ।। उपकाराची राशी ।। म्हणोनि चालविला ।। मागों येतील त्यासी ।। मागोनि आली वाटा ।। सिद्ध ओळीचि तैसी ।। तरले तरले गा ।। आणिक हे विश्वासी ।।५।। वर्म तें एक आहे ।। धरावा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

दृढ भाव ॥ जाणीव नागवण ॥ लागों नेदी तो ठाव ॥ म्हणोनि संग टाकीं ॥ सेवी आहेत भाव ॥ तुका म्हणे हाची संतीं ॥ मार्गें केला उपाव ॥६॥

३५ आंधळा २ रा

देव तुज चुकलें गा ॥ तेणें दृष्टि आलें पडळ ॥ विषयग्रंथी गुंतलीसें ॥ तेणें होतसे विव्हळ ॥ अंध मंद दृष्टि झाली ॥ गिळूं पाहे हा काळ ॥ अवचित दैवयोगें ॥ निवृत्ति भेटला कृपाळ ॥१॥ धर्म जागें निवृत्तीचा ॥ तेणें पडिलें पडळ ॥ ज्ञानाचा निजबोध ॥ विज्ञानरूप सकळ ॥ धृ० ॥ तिहीं लोकीं विश्वरूप ॥ दिव्य दृष्टि दिधली ॥ द्वैत हें हरपले ॥ अद्वैतपणें माऊली ॥ उपदेशुनी ब्रह्म ॥ ज्ञानांजन साऊली ॥ चिद्रुप पाहे तेथें तन मन निवाली ॥२॥ दान हेंची आम्हां गोड ॥ देहदृष्टि निमाली ॥ विज्ञानही प्रगटलें ॥ विदेह वृत्ती स्फुरली ॥ देह हे हरपले ॥ ज्ञेय ज्ञाता निमाली ॥ दृश्य ते तदाकार ॥ ममता तेथें बुडाली ॥३॥ प्रपंच हा नादीं जाण ॥ वृत्ति एकाकार झाली ॥ मी माझें हरपलें ॥ विषय अंधया बोली ॥ उपरती सद्गुरु बोध तेथें प्रकृती संचरली ॥ मार्ग शुद्ध पंथें ॥ हातीं काठी दिधली ॥४॥ वेदमार्गें मुनी गेले ॥ त्याची मार्गें चालिलों ॥ नकळेचि विषय अंधा ॥ म्हणोनि उघड बोलिलों चालता धर्मधुरा ॥ तरंगाकारीं हरपलों ॥ ज्ञानदेव निवृत्तीचें ॥ द्वैत अवघें निरसलें ॥५॥

३६ पांगुळा १ ला

मृत्युलोकीं एक नगर ॥ त्याचें नांव पंढरपूर ॥ तेथील मोकाशी तो हा उभा विटेवर ॥ पुंडलीक भक्तराज ॥ शोभे चंद्रभागे तीरं ॥ बोलती साधुसंत ॥ जिवा वाटे हुरहुर ॥१॥ तुम्हा संत माय बाप ॥ येवढे उपकार करा न्या मज तेथवरी ॥ दाखवा दिनाचा सोयरा ॥२॥ धृ० ॥ मज नाहीं

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

हातपाय ॥ डोळा पडली झांपड ॥ कर्ण बधीर झाले ॥ वाचा बोलें बोबड ॥ नाक मुख गळूं लागलें ॥ लाळ आलें शेंबूड ॥ श्वानापरी गती झाली ॥ अवघे करिती हडहड ॥ तुम्ही संत ॥३॥ साधुसंत मायबाप जे कां दयेचे सागर ॥ भावाचें मुख्य स्थान ॥ भक्तीचें माहेर ॥ त्यानें मज दिलें कृपादान ॥ मस्तकीं ठेविला कर ॥ मायामोह निरसली ॥ शुद्ध झालें कलेवर ॥ तुम्ही संत० ॥४॥ भाव दिला मज संगें ॥ मार्ग दाविला नीट ॥ भ्रांतिही निरसली दिसूं लागली वाट ॥ नाचत प्रेमछंदे चालूं लागलों सपाट ॥ एका जनार्दनीं ॥ पावलो पंढरीपेढी तुम्ही संत० ॥५॥

३७ पांगुळ २ रा

पांगुळ झालों देवा ॥ नाहीं हात ना पाय ॥ बैसलों जयावरी सैराट तें जाय ॥ खेटता कुप काढी ॥ खुट दरडी नाना पाहे ॥ आधार नाहीं कोणी ॥ मज मायबाप ॥१॥ दाते हो दान करा ॥ जातो पंढरपुरा ॥ न्यावें मज तेथवरी ॥ दाखवा दीनाचा सोईरा ॥धृ०॥ हिंडतां गव्हाणे गा ॥ शिरलों येरझारीं ॥ जन्म दुःख निवारी कीर्ति हे संतमुखीं ॥ तो मज दावा हरी ॥ पांगुळ्या पारू देतो ॥ नांदे पंढरपुरीं ॥२॥ या पोटोकारणें गा ॥ झालों पांगिला जना ॥ न सरेची मायबाप ॥ भिके नाहीं खंडना ॥ पुढारा म्हणती एक ॥ तया नाहीं करुणा ॥ श्वान हा लागे पाठीं ॥ आशा मनाशा तृणा ॥३॥ काय मी चुकलों गा ॥ मार्गे नेणवेची कांहीं ॥ नकळेची पापपुण्य ॥ तेथें आठवची नाहीं ॥ मी माझें भुलालों गा ॥ दीप पतंगा सोई ॥ मज जीवदान ॥ संत महा अनुभव कांहीं ॥४॥ दुरोनी आलों मी गा ॥ दुःख झालें दारुण ॥ यावया येथवरी ॥ होतें हेंचि कारण ॥ दुर्लभ भेटी तुम्हां ॥ पायीं झालें दर्शन ॥ विनवितो तुका संतां ॥ दोन्ही कर जोडुन ॥५॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

३८ बहिरा

बहिरा झालों या जग ।। देवा बहिरा मी झालों ।।धृ०।। नाहीं ऐकिलें हरिकीर्तन ।। नाहीं केलें पुराण श्रवण ।। नाहीं वेदशास्त्र शब्दगुण ।। गर्मी बहिरा झालों या गुणें ।।१।। नाहीं सत्कीर्ति श्रवण आली ।। नाहीं संत वचनें ऐकिलीं ।। पितृवचना पाठ दिला ।। तीर्थव्रतें असोनि त्यागिलीं ।।२।। माया माउली पाचारितां ।। नाहीं शब्द दिला मागुता ।। बहिरा नरदेहीं येतां ।। एका जनार्दनीं स्मरेन आतां ।।३।।

३९ मुका

मुका झालों वाचा गेली ।।धृ०।। होतों पंडित महाज्ञानी ।। दशग्रंथ षड्शास्त्रपुराणीं ।। चारि वेदमुखोद्गत वाणी ।। गर्वामध्यें झालीं सर्व हानी ।।१।। जिव्हा लांचावली भोजना ।। दुग्ध घृत शर्करा पक्वाना ।। निंदिलें उपान्ना ।। तेणें पावलों मुखबंधना ।।२।। साधुसंतांचीं निंदा केली ।। हरिभक्तांची स्तुति नाहीं केली ।। तेणें वाचा पंगु झाली ।। एका जनार्दनीं कृपा लाधली ।।३।।

४० वासुदेव १ ला

रामकृष्ण गीतीं गात टाळ चिपळ्या ।। वाजती छंदें आपुल्या नाचत ।। निज घेऊनियां फिरत गा ।।१।। जनीं वनीं अवघा देव ।। ऐसा मनीं असों द्यावा भाव गा ।।२।। निज दानाची थोर आवडी ।। वासुदेवासी लागली गोडी ।। मुखी नाम उच्चारी घडोघडी ।। ऐसी करा हे वासुदेव जोडी गा ।।३।। अवघा सारोनी शेवट झाला ।। प्रयत्न न चले कांहीं केला ।। जागा होईल सोडोनि झोंपेला ।। दान देई वासुदेवाला गा ।।४।। तुका म्हणे धन्य त्याचें जिणें ।। जिहीं घातलें वासुदेवा दान ।। त्या लागलें येणें जाणें ।। जाहलें वासुदेवीं गा ।।५।।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

४१ वासुदेव २ रा

धुळधुळां वाजती टाळ ।। कैसा वासुदेव बोलतो बोल ।। झण झणा नाद रसाळ ।। उदय झला फार वेळ ।। उठा वाचे वदा गोपाळ गा ।।१।। वासुदेव बोलतो बोल ।। कैसा वा० ।।धृ० ।। बाळासाठीं माय रिघाली ।। गेलें माणुस जितें उठविलें ।। वेळ काळासी ग्रासिलें गा ।। वासुदेव० ।।२।। आतां ऐसेंच अवघे जन ।। येती जाती जयापासून ।। जगीं जग झालें जनार्दन ।। उठा प्रगटले बिंबले भानु गा ।। वासुदेव० ।।३।। टाळोटाळीं लोपला नाद ।। आंगोंआंगीं मुरला छंद ।। भोग भोगितांची आटला भोग ।। ज्ञान गिळुनी गातो गोविंद गा ।। वासुदेव० ।।४।। गांवाबाहेर हिंडे आळी ।। देवदेवीची केली चिपोळी ।। चरण नसतां वाजे धुमाळी ।। ज्ञानदेवाची कांती सांवळी गा ।। वासुदेव बोलतो बोल कैसा ।। बा० ।।५।।

४२ बाळसंतोष १ ला

बाळसंतोष बाबा बाळसंतोष ।।धृ०।। तुझे अंगींचा उतारा ।। तो मज देईं गा दातारा ।। फिरोनि नये बा संसारा ।। बाळसंतोष ।।१।। तुझे मस्तकी ओप ।। देतां होईल प्रताप ।। तेणें हरती त्रिविधताप ।। बा० ।।२।। शालु पीतांबर सखलाद ।। ज्ञान कंचुकी मी शुद्ध ।। तुका म्हणे मी प्रसिद्ध ।। दान मागतों ।।३।।

४३ बाळसंतोष २ रा

बाळसंतोष बाबा बाळसंतोष ।। धृ० ।। आम्हीं परात्परदेशी ।। बाळसंतोष नोळखती आम्हांसी ।। बा० ।। टाकून आलो संतापाशी बा० ।।१।। जीर्ण स्वरूपाचा शेला ।। बा० ।। विषय भोगितां विटला ।। बा०।। तो मज द्यावा दाते वहिला ।। बा० ।।२।। ऐक्यत्वाचें बिरडे जोडी ।। बा० ।। त्रिगुणाची कसणी फेडी ।। बा० ।। जुनी कांचोळी रोकडी ।। बा० ।।३।। पूर्णत्वाची पुरणपोळी ।। बा० ।। स्नेहावरील तेल वरी ।।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

बा०॥ प्रबोण लाडु तयावरी ॥ बा० ॥४॥ एका जनार्दनीं मागतां दान ॥ बा०॥ जिताची जाणे जीवपण ॥ बा० ॥ शेखी दिले शिवपण ॥ बा० ॥५॥

४४ बाळसंतोष ३ रा

बाळसंतोष बाबा बाळसंतोष ॥धृ०॥ मी तो परात्परभिकारी ॥ बाबा ॥ बा० ॥ म्हणुनी आलों संतद्वारी ॥ बा० ॥ द्या मज भक्ती भाकरी ॥ बाबा ॥ बा० ॥१॥ किती युगांचा मी जोगी ॥ बा० ॥ विभूत चर्चुनिया अंगीं ॥ बा० ॥ गळां वाजवी नादशिंगी ॥ बा० ॥२॥ त्राही त्राही त्राही त्राही ॥ बा० ॥ हें तो न मागे न मागें कांहीं ॥ बाळ० ॥ नामा म्हणे सुखदायी ॥ बाबा बाळ० ॥

४५ मानभाव १ ला

मानभाव बाई ॥ आम्हां भिक्षा वाढा कांहीं ॥धृ०॥ काम आणि क्रोध आतां दंभूनिया पाई ॥ लोभ अहंकार आम्ही अन वरिला बाई ॥१॥ आशा मनाशा तृष्णा केली सर्व पायमोडी ॥ कल्पना आणि भ्रांतीच्या पाई घातलीस बेडी ॥२॥ महादेवाच्या खुणा आम्हीं सांगुनिया देऊं ॥ सोन्या रुप्याचे देव आम्हीं ठेचुनियां खाऊं ॥३॥ भक्ती आणि भावार्थाचा गडबडगुंडा केला ॥ एकाजनार्दनीं बाई मानभाव झाला ॥४॥

४६ मानभाव २ रा

आतां मानभाव झालों भिक्षा वाढा बाई ॥ भिक्षा वाढा बाई ॥ धृ० ॥ सुळींचाच मानभाव वस्त्रें केली काळीं ॥ उलटी काठी धरली ॥ भरली कोरके मागुन झोळी ॥१॥ सोन्या रुप्याचें देव आम्हीं मोडुनियां खाऊं ॥ शेंद्राचें देव आम्ही दृष्टीनियां पाहूं ॥२॥ एका जनार्दनी बाई मानभाव झाला ॥ झोळीवरती झोळी ठेवुन गडबडगुंडां केला ॥३॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

४७ फकीर

मला संतनकी संग, खावे निजबोधनकी भंग ।। सदानंद मो दंग, ऐसे मलंग फकीर है ।।१।। लिया संतनका दुमाला ।। मेरा तुटे भव जंजाला ।। कहे जनार्दन कंगाला ।। फकीर हो रहा है ।।२।।

४८ सफेत कलंदर फकीर

सफेद कलंदर फकीर ।। बाबा सफेद कलंदर फकीर ।।धृ०।। काम क्रोध मदमत्सर ।। काटो बैठो उन्मनी ज्या घर ।। मारो आसन बैठो त्रिकुटपर ।। करनारकी जीकरी ।।१।। अंदर भगवा कियोरी बाबा ।। जोग जुगूत भरपाई ।। अल्लाको नामपर लगन लगाई ।। चुकी कमलपर लिखित ।।२।। ऐसी फकीरकी थोरी ।। बाबा जात कुल सब तारी ।। कहत कबीरा सुन भाई साधू ।। सीता राम गुरु पीर ।।३।।

४९ मंगल फकीर १ ला

संतनके संग ।। खावे निजबोधकी संग ।। सदा आनंद में दंग ।। ऐसा मलंग फकीर ।।धृ०।। ग्यानके मैदान खडे ।। समदमसें आन लढे ।। बहोतांके तखत चढे ।। ऐसा मलंग फकीर ।।२।। किया सतनका धुमाल ।। तेरा पिता बहु जंजाला ।। ऐसा एकनाथ कंगाल ।। ऐसा मलंग फकीर ।।३।।

५० मंगल फकीर २ रा

नजर करे साईजीके बाबा ।। दुर थी तमासा देख ।। लकरी फासा लेके बैठे ।। आगल ठेकण भेक ।। कायमुलायेक देख ।। आखो यारत डांगो बाजा ।। दमरी चमरी जो नर भुला ।। सोत आधो ही लत खावे ।। नहीं बुलावत किसे बुवा ।। आपही मत जाय ।। कहे तुका उस आशके संग ।। फीर गोते खाय ।।१।।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitization by eGangotri

५१ जोगी

जग जोगी ।। जाग जग बोलती ।।धृ०।। जागता जागदेव ।। राखा नाहीं भाव ।।१।। जग जोगी० ।। अवघा ही क्षेत्रापाल ।। पूजा हे सकळ ।।२।। जग जोगी० ।। पूजा पत्री कांहीं ।। फळ पुष्प तोही ।।३।। जग जोगी० ।। बहुत दिवसा फेरा ।। आला या नगरा ।।४।। जग जोगी० ।। नको घेऊं भार ।। धर्मा हाची सार ।।५।। जग जोगी० ।। तुका म्हणे दान द्यावें जी अनन्य ।।६।। जग जोगी० ।।

५२ चोपदार

चोपदार आला चोपदार आला ।।धृ०।। माझें चोपदाराचें रहाणें ।। आकाश स्वर पाहणें ।। चतुर्मुख ब्रह्मा चकित होऊन ।। निराकारांची वस्ती दिपली विष्णुनें ।।१।। शंख चक्र गदा घेऊन ।। महादेवी शून्य द्वारपाळ जाण ।। हा कळिकाळ टाकीन छेदून ।। रंडी चंडी शक्ती टाकीन भेदून ।। चोपदार आहे मी जाण ।।२।। आम्हांस नाहीं उपाय ।। आम्हांस नाहीं बाप ना माय ।। खरी चाकरी कोठें करावी ।। एका जनार्दनी दृढ धरावीं ।।३।।

५३ छडीदार

सुनसुन बेहय्या बेहय्या ।। छडीदार मे पाया ।। धृ०।। रामनामकी छडी ।। ये तो तीन लोक में बडी सु०।।१।। रामनाम का घोडा ।। ये तो तीन लोकमें बडा ।। सु० ।।२।। त्रिगुणशिखरपुर जाना ।। वहां रामनाम जप जपना ।। सु० ।।३।। कहे कबीर सुन प्यारा ।। चुकेल जन्ममरन का फेरा ।। सुन सुन बेहय्या० ।। छडीदार मे पाया ।।४।।

५४ भालदार

सुन सुन हो भैया हो भैया ।। भालदार में पाया ।।धृ०।। लिया रामनामका भाला ।। काम क्रोध मार डाला ।। सु० ।।१।। रामनामका

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

घोडा ॥ ये तो तीन लोकमें बडा ॥ सु० ॥२॥ त्रिगुण शिखरपर जाना ॥ वहां रामनाम जप जपना ॥ सु० ॥३॥ कहत कबीर सुन प्यारा ॥ चुकेल जन्ममरनका फेरा ॥४॥

५५ कांडण

विवेक कांडणी ॥ कांडितें साजणी ॥ निजबोधस्मरणीं फिरतसे ॥१॥ देह हें उखळ ॥ मन हें मुसळ ॥ कांडिले तांदूळ ॥ विवेकाचे ॥२॥ एका जनार्दनीं ॥ कांडण कांडिता ॥ ब्रह्म सायुज्यता ॥ प्राप्त झाली ॥३॥

५६ दळण

येई हो कानाई ॥ मी दळीन एकली ॥ एकली दळीतां शितले ॥ हात लावीं वहिली ॥ धृ० ॥ वैराग्य जाते मांडुनीं ॥ विवेक खुंट थापटोनी ॥ अनुहात दळण मांडुनी ॥ त्रिगुण वैरण घातलें ॥ येई० ॥१॥ स्थूळ सूक्ष्म दळियेलें ॥ हरिकारणासहित ॥ महा कारण दळियेलें ॥ ओट मात्रे सहित ॥ येई० ॥ दशा दोनी दळियेल्या ॥ द्वैत द्वैता सहित ॥ याही व्यापक दळियेलें ॥ ओं सोहं सहित ॥ येई० ॥३॥ एकवीस स्वर्ग दळियेले ॥ चवदा भुवना सहित ॥ सप्तपाताळ दळियेलें ॥ सप्तसागरां सहित ॥ येई० ॥४॥ बारा सोळा दळियेल्या ॥ सत्रावी सहित ॥ चंद्र सूर्य दळियेले गणांसहित॥ येई० ॥५॥ नक्षत्र वैरण घालुनी ॥ नवग्रहांसहित ॥ तेहतीस कोटी देव दळियेलें ॥ ब्रह्माविष्णु सहित ॥ येई० ॥६॥ ज्ञान अज्ञान दळियेलें ॥ विज्ञानासहित मी तूं पण दळियेलें ॥ जन्ममरणा सहित ॥ येई० ॥७॥ ऐसें दळण दळियेलें ॥ दोनी तळ्यांसहित ॥ एका जनार्दनीं दळियेलें ॥ कांहीं नाहीं उरलें ॥ येई० ॥८॥

५७ वैद्यगोळी

अल्ला देवे अल्ला दिलावे ॥ अल्ला दारू अल्ला खिलावे ॥ अल्ला

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitization by eGangotri

बगर नहो कोय ॥ अल्ला करे सो होय ॥१॥ मरद होय आखडफीर ॥ ना मरदकु नहीं धीर ॥ आपने दिलाकुं करना खुषी ॥ तीन दामकी क्या खुमासी ॥२॥ कबर सोका किया मार ॥ भजन गोळी एक सार ॥ इनाम तोडा सबही सजा ॥ थोडी तोबी लेकर जा ॥३॥ जीनोपास नित्य सोवे ॥ बोई लसकरतीरावे ॥ सातो पांच मरद लावे ॥ उतार तो पीछे खावे ॥४॥ समाल ज्यांनी निकाल जावे ॥ पीछे नही गदडा मधी खावे ॥ गावढालसो क्या लेवे ॥ हागवनी भरी नही धोवे ॥५॥ मेरी दारू जाने खाया ॥ दिदार दीगी सोही पाया ॥ तलें मुंडी घाल जवि ॥ बैरागीसो क्या लेवे ॥६॥ बाजार बजेभाव ॥ नाहीं पुछता आवे ठाव ॥ फुकट थाट कहे तुका ॥ लेवे सोही लेवे सखा ॥७॥

५८ यात्रा

वाराणसी यात्रे जाईन ॥ प्रयागतीर्थ पाहीन ॥ त्रिवेणीचें स्नान करीन ॥ परि मी वीट नव्हेन ॥ विठाबाईची वाट मी कै होईन ॥ धृ०॥ गोदावरी यात्रे जाईन ॥ वाराणसीचें फळ लाहीन ॥ आब्रजक तीर्थी स्नान करीन ॥ परी मी वीट नव्हेन ॥१॥ मल्लिकार्जुन यात्रे जाईन ॥ शैलेश्वर पाहीन ॥ पाताळ गंगेस्नान करीन ॥ परि मी वीट नव्हेन ॥२॥ एका अंगुष्ठी तप करीन ॥ पृथ्वी पात्रचि लाहीन ॥ देह करवती देईन ॥ परि मी वीट नव्हेन ॥३॥ बहुतां पुण्या सायासीं ॥ चरण जोडिले विटेसी ॥ निवृत्ति दास म्हणे परियेसीं ॥ परि मी वीट नव्हेन ॥४॥

५९ वासना

वासना ओढाळ गाय ॥ गड्यानों वा० ॥धृ०॥ जितकें खाऊं नये तितकें जाय ॥ जें जें खाऊं नये तें खाय ॥ तिचा म्हणून मोडावा पाय, गड्यानों० ॥१॥ तिनें मोहिले महासुरजन ॥ ब्रह्मादिकां लाविलें ध्यान ॥ तिनें मारिलासे बाण ॥ गड्यानों० ॥२॥ ज्ञानदेवें चुचकारिली ॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सोपानदेवें पायपीट केली ।। मुक्ताबाईनें धार काढिली ।। वासना ओढाळ गाय ।। गड्यानों वासना ओढाळ ।।३।।

६० थट्टा

अशी ही थट्टा ।। भल्याभल्यासि लाविली बट्टा ।।धृ०।। ब्रह्मदेव त्रैलोक्याला शोधी ।। थट्टाने हारविली बुद्धी ।। केली नारदाची नारदी ।। अशी ही थट्टा ।।१।। थट्टा दुर्योधनाने केली ।। पांचाळी सभेमाजी गांजिली ।। गदाघायें मांडी फोडिली ।। अशी थट्टा ।।धृ०।।२।। थट्टा गेली शंभूपाशीं ।। कलंक लागला चंद्रासी ।। भगें पाडिलें इंद्रासी ।। बरी नव्हे थट्टा ।। भल्याभल्यासि लाविला बट्टा ।।३।। थट्टेनें मेला दुर्योधन ।। भस्मासुर गेला भस्म होऊन ।। वालीही मुकला आपल्या प्राणा ।। अशी ही थट्टा ।।भ० ।।४।। थट्टा रावणानें केली ।। नगरी सोन्याची बुडविली ।। थट्टा ज्याची त्यास भोंवली ।। बरीं नव्हे थट्टा ।।भ० ।।५।। अरण्यांत होता भृगुऋषी ।। थट्टा गेली त्याचें पाशीं ।। भुलवुनी आणिला अयोध्येसी ।। बरी नव्हे थट्टा ।। भ० ।।६।। विराटराजाचा मेहुणा ।। नाम तयाचें कीचक जाणा ।। त्यानें घेतलें बहुतांचे प्राणा ।। बरी नव्हे थट्टा ।। भ० ।।७।। थट्टेपासून सुटले चौघेजण ।। शुक भीष्म आणि हनुमान ।। चौथा कार्तिकस्वामी जाण ।। त्याला नाहीं बट्टा ।। अशी ही थट्टा ।।भ० ।।८।। एका जनार्दन म्हणे सर्वाला ।। थट्टेला भिऊन तुम्हीं चाला ।। नाहींतर नेईल नरककुंडाला ।। अशी ही थट्टा ।। भ० ।।९।।

६१ रहाट

हुंडगी निकाली संसारा ।। बारीक माझा जुना ।।धृ०।। दारची गोधन कां तोडाना ।। मजला रहाट करून कां द्याना ।। माझे रहाटाकडे कां पाहाना ।।१।। तुमचा बैल कां माराना ।। मजला तात करून कां द्याना ।। माझे ताताकडे कां पहाना ।।२।। तुमची तलवार कां मोडाना ।। मजला

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitization by eGangotri

चात करून कां द्याना ॥ माझ्या चाताकडे कां पहाना ॥३॥ तुमचा टाळ कां मोडाना ॥ मजला भिंगरी करून कां द्याना ॥ माझ्या भिंगरीकडे का पहाना ॥४॥ तुमची वस्त्रे कां फेडाना ॥ मजला पिंजुन पिंजुन का द्याना ॥ माझ्या पिंजण्याकडे कां पहाना ॥५॥ पिंजुन पिंजुन केला पिळू ॥ नव इंद्रिया खेळूं ॥ एका जनार्दना पिळूं ॥६॥

६२ लेक

मी सद्गुरुची लेक ॥ भाव एक ॥धृ०॥ बाई मी निसंग गधडी ॥ फेडीली प्रपंच लुगडीं ॥ नाकीं नाहीं नथ काडी ॥ माझें नांव म्हणती आवडी ॥ जग भूलवी ॥ मी० ॥१॥ सद्गुरू माझे चंद्रमौळी ॥ माझ्या कांखे देऊन झोळी ॥ मजला हिंडव आळोआळीं ॥ जन म्हणती मज सुकाळीं ॥ बहु सुख ॥ मी० ॥२॥ गुरुनें मज पाजिली भांग ॥ मग घडला संत संग ॥ गुरू गुह्य मजला सांगे ॥ मारूनी हांक ॥ मी० ॥३॥ ऐसी म्हणे मुक्ताबाई ॥ जा हो शरण गुरूचे पायीं ॥ पुनः जन्म मरण नाहीं ॥ ऐसी भाक ॥ मी सद्गुरूची लेक ॥ भाव एक ॥४॥

६३ दरवेश १ ला

अल्ला तुही तुहीरे ॥ मौला तुही तुही रे ॥धृ०॥ बाग म्याने तबला बाजे घर में नहीं कोई ॥ खालीं हंडी चुवा बजावे नाचन लगे डोई ॥१॥ नारद तेरी घडी भरी बे अवतर मागे दान ॥ साठ सहस्र पौंड बजावे बचे दानोदान ॥२॥ ब्रह्मा तेरी घडी भरी बे पढ गये चारी वेद ॥ सरस्वती का खेल भया जब ब्रह्मा बेटीचोद ॥३॥ कहत कबीरा सुन भाई साधु ॥ ये पद है निर्बानी ॥ ये पदकी कोई करेगा निंदा ॥ उसकुं नरक निशानी ॥४॥

६४ दरवेश २ रा

अल्ला तुही तुही रे ॥ नबी तुही तुही रे ॥धृ०॥ हमही मुंडा तुमही

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitization by eGangotri

मुंडा मुंडा तेरा बाप ॥ तेरे बापनें गद्धा भोग्यो ॥ हमकूं लागे पाप ॥१॥ बगल म्यानें तबला बाजे घरमे नहीं कोई ॥ खाली हंडी चुवा बजावे ॥ नाचन लागे डोई ॥२॥ सब देवन में ब्रह्मा बडा पढता चारी वेद ॥ सरस्वतीसे हाल हुवा जब ब्रह्मा बेटीचोद ॥३॥ ढवळागिरी पर्वत म्याने शंभु करता तप ॥ भिल्लीणीकी गाठ पडी जब तप हूआ गप सप ॥४॥ पराशरको मुनिको ढिवरण लगी मीठी ॥ जमुनाका संग भयो जब व्यास कर उठी ॥५॥ नारद बडा जगद भारी औरत मागे दान ॥ साठ संवत्सर लडके हुये हो गई दानादान ॥६॥ गाकुळ म्याने राज करता है नाम राख गिरधारी ॥ सोळा सहस्र लौंड्या भोगे हो गये ब्रह्मचारी ॥७॥ मेरे साहेब उंच माडी कापड धुवा न जाय ॥ हस्तक सावज गिर गया तो फिर फिर गोते खाय ॥८॥ कपडा फाटे चमडा टुटे हो गये सब सायास ॥ एका जनार्दन का बंदा दलिका दरवेश ॥९॥

६५ दरवेश ३ रा

अल्ला करे सो होये बाबा ॥ कारताका सिरताज ॥ गऊ बछरे तिस चलायें यारी वधोन साज ॥१॥ ख्याल मेरा साहेब का बाबा ॥ आप हुवा करतात ॥ व्हाके आगे चढे पाछे आप हुवा आसवार ॥२॥ जीकर करो अल्लाकी बाबा सब लाया आंदर ॥ बसो कहे तुका जो नर बुझे सो भया दरवेश ॥३॥

६६ नानकशा १ ला

अल्ला करेगा वैसाभी रहना ॥ मौला रखेगा वैसा रहेना ॥धृ०॥ कोई दिन सिरपर छतर उडावे ॥ कोई दिन सिरपर घडा चढावे ॥ कोई दिन तुरुंग उपर चढावे ॥ कोई दिन पाव चलावे ॥ अल्ला० ॥१॥ कोई दिन शक्कर दूध मलीदा ॥ कोई दिन अल्ला मागत गदा ॥ कोई दिन सेवक हात जोड खडे ॥ कोई दिन नजीक न आवे धेडे ॥ अल्ला० ॥२॥ कोई

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitization by eGangotri

दिन राजा बडा अधिकारी ॥ एक दिन राजा कंगाल भिकारी ॥ कहत कबीर कहत करतारी ॥ गाफल क्यंव करता मगरूरी ॥३॥

६७ नानकशा २ रा

जो कोई वसुधा दान दे आवे ॥ पूर्व यज्ञ करे करे कसवे ॥ तीरथ वरथके स्नान ॥ नहीं नहीं हरिनाम समान ॥२॥ जो कोई जावे हील गये ॥ कासी करवत लेकर मेरे ॥ दसद्वारके कोंढे प्राण ॥ नहीं नहीं हरिनाम समान ॥२॥ काया कटवे कलेवर जीवे ॥ ना कुछ खावे ना कुछ पीवे ॥ गगनमंडलमों जोरे ध्यान ॥ नहीं हरिनाम समान ॥३॥ अगली पिछली बात बनावे ॥ नेम धरमसे तन छपावे ॥ चारों वेद पढे पुरान ॥ नहीं नहीं हरिनाम समान ॥४॥ एका जनार्दनीं जब कृपा भई ॥ प्रेम भगवत हरदे घर लाई ॥ कहे निसदिन भजन भगवान ॥ नहीं नहीं हरिनाम समान ॥५॥

६८ नानकशा ३ रा

समज उमजकर पग रख नहीं तो आगे मुष्कील हैं ॥ गुजरान करो गरीबसे बाबा मगरुरीसें धोका है ॥१॥ नरतन गये तो पस्तावेगा फेर सुंदरना लबाड है ॥ कोई एक पडे पापकर्मको बहुत जन्मका फेरा है ॥२॥ ही तनु अच्छी सबसे दिखावे आरामसें ॥ शाल दुशाले जोरू बच्चे भुलना नहीं गजबजसें ॥३॥ भूल जावे तो नजीक ना मिले लंगोट कंबल की ॥ यमदूत का शिरपर सोटा बरी बात नहिं होनेकी ॥४॥ चर खूट है नगरी हमारी खानेकूं कुच तोटा नहिं ॥ कहना हुषार तुमकूं कर कर घर घर फेरी करता नहिं ॥५॥ कहत कबीरा सुन भाई सात हुषार होना अच्छा है ॥ ना सुने तो सोटा मारे हमकूं गरब क्या तेरी है ॥६॥

६९ हपसी सिद्धा

ख्याल किया मछलीवाले वल्ले ॥ धुंडीदर्या व गोविंद महंमद

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

वल्ले ॥धृ०॥ शंखासुर दैत्य मारिया वल्ले ॥ सायो चारी वेद महंमद ॥१॥ खेल खेलावे आवे गोविंद महंमद ॥ गोविंद महंमद ॥२॥ सातो दर्याव एक वजुदा ॥ भेद निकाले लाय गोविंद महंमद ॥३॥ जप तप जमीन दलतले वल्ले ॥ तब दिया पीठ महंमद ॥४॥ जब तब जमीन डलमले वल्ले ॥ तब दिया उसें दाद महंमद ॥५॥ कच्छप ऋषी भगवान् वल्ले ॥ चीप चीप करी मीठी महंमद ॥६॥ सब देव म्याने नरसिंह बढाया वल्ले ॥ भेद मृगजस्तंभ महंमद ॥७॥ हिरण्य कछप दैत्य माराया वल्ले ॥ रखा भक्त प्रल्हाद महंमद ॥८॥ बाळाराम सत्वा आगळ वल्ले ॥ उसे दिया पाताळ राज्य महंमद ॥९॥ खुजी सुरत ठेंगणी वल्ले ॥ फिर फकिरा हाल महंमद ॥१०॥ परशुराम माको मारीया वल्ले ॥ फत्ते किया बापका बोल महंमद ॥११॥ दशरथका रामराणा वल्ले ॥ राज्य दिया बिभीषण खान वल्ले महंमद ॥१२॥ नंदजीके किसन सांवळे वल्ले ॥ खेळ जमुनातीर महंमद ॥ १३॥ बौद्ध सुतर लिथा है खानी वल्ले ॥ पाणी फत्तर हुवे महंमद ॥१४॥ मेरा माघोडा चढीये वल्ले ॥ उसे कहे कलंकी गोविंद महंमद ॥१५॥ एका जनार्दनी यंवकर बोले ॥ तेरे दिदारके भक्त भजे महंमद ॥१६॥ गोविंद महंमद ॥

७० भांड

माया छांड सुनो जी ॥ अच्छा भांड बनो जी ॥धृ०॥ ब्रह्मदेवनें वेद पढाया ॥ माया मीठी लगी ॥ सरस्वतीके गले पडा ॥ उसकी करित भगी ॥ माया० ॥१॥ विष्णुके पीछे लगा है ॥ मायाका धंदा ॥ खेळ करते फसल बडी ॥ मीठी लगी वृंदा ॥ माया० ॥२॥ महादेव बडा देव ॥ सब देवन का बाबा ॥ भिल्लिनीके पीछे लगा ॥ करता तोबा तोबा ॥ मा० ॥३॥ अहिल्याके देखनकूं ॥ इंद्रझुका मद ॥ गौतमनें खोड तोडी ॥ आंगपर हुवे फोड ॥ माया० ॥४॥ सीताकी चोरी करी ॥ रावणकूं धका ॥ हनुमाकूं नंगा करके ॥ जला दियी लंका ॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. Dr. Urmila Sharma Collection, Varanasi. Digitized by eGangotri

माया० ॥५॥ हनुमान तो ब्रह्मचारी ॥ जपे रामनाम ॥ स्त्री राजमो औरत गाना ॥ करता है बेफाम ॥ माया० ॥६॥ विश्वामित्र तप करते करे ॥ भये अनुष्ठानी ॥ मेनकासे वश भये ॥ हुबी घूलघानी ॥ माया० ॥७॥ नारदनें किसनजीसें ॥ एक औरत मांगी ॥ नारदकी भई ॥ पोंगडे जनन लागी ॥ माया० ॥८॥ सोळा सहस्त्र नारी कान्हा गोकुळमें खेळे ॥ राधीकाकूं छोड करके ॥ रीसनीकूं भुले ॥ मा० ॥९॥ जनार्दन साई मेरा ॥ सब खेल खेला ॥ एकनाथ भांड होके ॥ चरणोंसे मिला ॥ माया छांड सुनोजी ॥ अच्छा भांड बनो जी ॥१०॥

७१ मुंडा

सलाम यारो उपर तले ॥ दो मारोकी जूट ॥ नजर करे सारी राखे सब जावे लुट ॥ प्यार खुदाई प्यार सुदाई प्यार खुदाई रे ॥ बाबाजीकी रसु दुबाहिरे ॥ वाहाके घुंडु गण नचावे ॥ आगल मुक्त न प्यारे ॥ लडमड खडबडका धोका ॥ खाक चलावत मार ॥ कहे तुका सुनो लोका ॥ हम जिनोंके सात ॥ उसें कहीता उसे देना ॥ तोहि चडावे हात ॥१॥

७२ जागल्या

जागारे जागल्या नों ॥ शेत पिकलें नवखंड रोही ॥ पहांट झाली तूं निजला काई ॥धृ०॥ मळा रोउनी मेंढी चारी ॥ कानो गाळ क्रीडा करी ॥ मज धारोनि पैलथडो ॥ जागारे० ॥१॥ जा० ॥ चारी कोनी दाही दिशा ॥ शेत पिकलें आलें ब्रह्मरसा ॥ काळ झोडील तूं निजलास कसा ॥ जागारे० ॥२॥ तुका म्हणे आमहीं जागलों ॥ एका सद्गुरु शरण गेलों ॥ जन्मोजन्मींचें दुःख विसरलों ॥ जागारे जागल्यानों ॥३॥

७३ कापडी

पहालें रे आजी पहालें रे ॥ संतसंगें सूख आजी जहालें ॥१॥ आम्ही कापडी रे कापडी रे ॥ विघ्नें पळती बारावाटे बापुडी रे ॥२॥ समता

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कापडी रे कापडी रे ।। विघ्नें पळती बारावाटे बापुडी रे ।।२।। समता कावडी रे कावडी रे ।। मार्जी नामामृत भरले आवडी रे ।।३।। येणें ना घडे रे जाणें ना घडे रे ।। तें रूप पाहतां कोंदाटलें चहूंकडे ।।४।। नलगे दंडणें रे नलगे मुंडणें रे ।। नाम म्हणतां कर्माकर्म खंडणें रे ।।५।। सूख फीटलें दुःख मिटलें रे ।। बापरखुमादेवीवरु विटलें रे ।।६।।

७४ खेळया १ ला

भीमातिरीं एक वसविलें नगर ।। त्याचे नांव पंढरपुर रे ।। तेथिल मोकाशी चार भुजा, त्यासी बायका सोळा हजार रे ।।१।। नाचत जाऊं त्याचें गांवा, खेळया सुख देईल विसावा रे ।। पुढें गेलें ते निधाय झाले वीषातीं त्यांची सीमा रे ।।२।। बळी आनळा पाळी लोकपाळा रीघ नाहीं कळिकाळा रे ।। पुंडलिकानें केली पाटिलकी तो झाला दुःखा वेगळा रे ।।३।। दोनी चंहाट भरली घनदाट अपार मिळाले वारकरी रे ।। ना जाऊं म्हणती आम्ही वैकुंठीं जेणें देखिली पंढरी रे ।।४।। संत सज्जनीं मांडिलें दुकान ज्याला जें पाहिजे ते आहे रे ।। भक्ति मुक्तिसाठीं कोणी न पाहती तिजकडे रे ।।५।। बहुत दिवस होती मज आस आजि घडले मायास रे ।। तुका म्हणे होय तुमचेनि पुण्यें भेटुं तया पायांपाशीं रे ।।६।।

७५ खेळया २ रा

देव छिनालका छिनालका ।। खेळ खेळाडी बांका ।। छंद बेडा सुखरका बेटा ।। जाके झुरकेमें बैठा ।।१।। बडा धरमका दाता ।। नाहीं जातपात कुच नाता ।।२।। एकनाथका वाली ।। उस कोण देवे गाली ।।३।। देव छिनालका छिनालका ।। खेळ० ।।

७६ खेळया ३ रा

जनीं वनीं एक जनार्दन दाता ।। त्यासीं नमन करूं आतां रे ।। मन उन्मन जयास पाहतां ।। त्याच्या चरणावरी माथारे ।।१।। टाळ मृदंग मेळवुनि मेळा ।। गुरू वचनीं खेळ खेळारे ।।२।। भक्ति वैराग्य कुंडल श्रवणीं ।। ज्ञानांकुश मुगुटमणीरे ।। सप्रेम उटी आंगीं चंदनाची ।। सत्त्वाची

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. Prof. Satya Vrat Shastri Collection. Digitized by eGangotri

कास निर्धारीरे ॥३॥ अष्ट भावें खेळिये खेळतातीं ठांई ॥ घागऱ्या वाजती पायींरे ॥४॥ दया क्षमा दोन्ही चवऱ्या ढळती ॥ शांति सत्रावी छाईरे ॥५॥ नाद निमाला शब्द खुंटला ॥ त्रिभुवनीं आनंद झाला रे ॥६॥ एका जनार्दन शरण आला ॥ एकपण विसरला रे ॥७॥

७७ पोर

आता येरे धाकुट्या मुला ॥ कशानें आलें थोरपण तुला ॥ उलीसेंच किरे दिसतें पोर ॥ ब्रह्मीं नाहीं लहान थोर ॥ तुला ब्रह्म ठाउकें आहे ॥ सर्वांघटीं तेंचि पाहें ॥ ब्रह्मीं नादीं भेदाभेद ॥ ऐसें बोलती चारी वेद ॥ तुझा भेद गळाला ॥ सद्गुरूनें बोध केला ॥ भेद म्हणले कायरे गड्या ॥ आत्मस्वरूप पाहिरे वेड्या ॥ उलीसेंच पोर चावट नोठें ॥ थोरपण असून चहाडे खोटे ॥ माझें मन काय चहाड झालें ॥ ज्ञानामुळें गर्वासि आलें ॥ गर्व जाईल कैशापरी ॥ सद्गुरूचें दास्य करीं ॥ सद्गुरू कृपा तुलाच झाली ॥ भूत मात्रीं भरून उरली ॥ तरी काय एक एक नेलें ॥ अविश्वासीं बुडूनि मेले ॥ विश्वास कैसारे केला ॥ हा तो निश्चय पुराणीं झाला ॥ सद्गुरुविना तरेना प्राणी ॥ सांगे तरला आहे कोणी ॥ भजन तरी करावें केव्हां ॥ सोहमंत्री नाहीं गोंवा ॥ जावें तरी कोणें दिवशीं ॥ नेम नाहीं दिवसानिशीं ॥ सद्गुरुसी शरण जाईल तरी ॥ चौऱ्यांशींचे पडशील फेरी ॥ म्हातारपणीं भक्तीं करूं ॥ आयुष्य काय तुझें आज्ञाधारू ॥ धाकुटेपणीं भक्तीं केली ॥ सद्गुरुसी संगत जाहली ॥ संगतीनें कोण कोण तरले ॥ महापातकी उद्धरिले ॥ पाहीलें तें कोळ्याचें पोर ॥ अजामेळा चोखामहार ॥ ऐसे तरले कितीएक पोर ॥ भिती नाही रे गव्हार ॥ जाबास जाब फार देतोस ॥ बोलूं नये तें बोलतोस ॥ उगाच रहा नाहीं तर देईन दोन काठ्या ॥ अहंकाराच्या होशील खोट्या ॥ तुझा माझा झाला कीरे वाद फार ॥ पांच पोरांनी घेतलें घर ॥ पांच पोरे कोणाचीं ॥ आत्माराम गड्याचीं ॥ सारा खेळ त्याचाच काय रे ॥ खेळ खेळून निराळाच कीं रे ॥ हा खेळ तुला कशानें कळला ॥ निवृत्तिस्थें फळाशीं आला ॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

७८ डोईफोड्या

तम भयाय ते बुराजिकीरत करो ॥ सीरकुटि ऊरखुटे तुम्हा सब उरे ॥१॥ धृ०॥ तूंही एक तूंही ताहां एक तूंही ॥ ताहां एक रे वाचां ॥ हमे तुम्हे नहीं ॥ दिदार देखो भूले नहीं ॥ किसे पछाने कोये सच्चा नहीं पकडुं सके झुठा झुठे रोये ॥२॥ किसे कहे मेरा किं हे सात लिया भास ॥ नहीं मेलोमिले जावन झूठा किया नास ॥३॥ सुनो भाई कैसा तोही ॥ नहीं होय तैसा होय ॥ बाटखाना आल्ला कहना एकमारा तोही ॥४॥ भला लिया भेक मुढे अपता तफा देख ॥ कहे तुका सोई संका हाक अल्ला एक ॥५॥

७९ गावगुंड

आम्हीं आलों गावगुंड ॥ अवघ्या पुंड मुतासी ॥१॥ धृ०॥ दुसरें तें खेळों आलें ॥ एका बोले तो मिया ॥ अवघियांचा येऊं लाग ॥ न दे आंगा शिवाया ॥२॥ तुका म्हणे खुंटू नाद ॥ जितू वाद सरतीनें ॥३॥

८० वाघ्या

अनंत युगाचा देव्हारा ॥ निजबोधाचा धुमारा ॥ अवचित भरला वारा ॥ मल्लारी देवाचा ॥१॥ शुद्ध सत्त्वाचा कवडा मोठा ॥ बोधबिरडे बांधला गांठा ॥ गळां वैराग्याचा पट्टा ॥ वाटा दावूं या भक्तीच्या ॥२॥ हृदयीं कोटंबा सांगतो ढोल वाजवूं अनुहातें ॥ ज्ञानभांडाराचें पोतें ॥ रितें नव्हे कल्पांतीं ॥३॥ लक्षचौऱ्यांशीं घरें चारीं ॥ या जन्माचीं केली वारी ॥ प्रसन्न झाला देव मल्लारी ॥ सोहंभारी राहिला ॥४॥ या देवाचें भरतां वारें ॥ अंगीं प्रेमाचें फेंपरें ॥ गुरगुर करी वेडें चारें ॥ पाहा तुके भुलविलें ॥५॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitization by eGangotri

८१ कावडी

आहारे भाई प्रथम नमूं तो विनायक ॥ ठेवूनी गुरुचरणीं मस्तक ॥ वदेल प्रासादिक वाणी ॥ हरिहरांचें पवाडे ॥१॥ माझी ऐसी ब्रीदावळी ॥ दासे दासत्वें आगळी ॥ पान्हेरी मार्ग मळी ॥ जीवन घ्यारे कापडे हो ॥२॥ जया सीतळाहूनी सीतळ ॥ पाताळाहुनी जें पातळ ॥ प्रेमामृत रसाळ तें हें सेवा अहो भाग्याचे ॥३॥ जिंकाल तरी जिंका अभिमाना ॥ दवडाल तरी दवडा लज्जा आणि माना ॥ धराल तरी धरा संभूचे चरणा ॥ दाबला पण ऐसा दावा तो ॥४॥ काळा घेऊं नेंदी राव ॥ आला तो राखें घाव डाव ॥ शुद्ध सत्वी राखोनि भाव ॥ म्हण महादेवा हरीहर वाणी गर्जों द्या ॥५॥ परावीया नारी माउली समान ॥ परधनी वाढों नेंदीं मन ॥ जीवित्व तें तृणासमान ॥ स्वामीकाजीं जाण शरण म्हणों तया ॥६॥ शक्ति वेंचाविया पर उपकारा ॥ खोटे खोट्यांचे पसारा ॥ सत्य तें भवनदिचा तारा ॥ आळस तो न करा येथें अहो सांगतो ॥७॥ व्रत करा एकादशी सोमवार ॥ कथा करा हरिपूजन जागार ॥ पुण्य तें असें गाता नाचतां बहु फार ॥ पुन्हां बोलिला संसार ॥ नाहीं नाहीं सत्यत्वें ॥८॥ संग संतांचा करितां बरवा ॥ उत्तमोत्तम कीर्तीचा ठेवा ॥ पंथ तो सुपंथें चालावा ॥ उगवा वासना लिगाड ॥९॥ तुका चालवितो कावडी ॥ प्रवृत्ति निवृत्ति चोखडी ॥ पुढती पुढती अधिक थोडी ॥ भरूनि सळस भजन आवडी ॥ केशवदास नटतसे ॥१०॥

८२ महार

कारे महारा मदमस्ता ॥ कांहो ब्राह्मण बाबा भल भलतेंच बोलतां ॥ तुझे बापाचें भय काय ॥ मायबाप तुमचेन आमचे एकच है ॥ एक ऐसे बोलूं नको ॥ निर्गुणापासून अवघे झालों ॥ निर्बुण तुला काय ठावें ॥ आत्मस्वरूपीं शोधून पहावें ॥ आत्मस्वरूप आम्हां कळेना ॥ नाहीं तरी संतांशीं शरण जाना ॥ संताशीं शरण गेल्यानें काय होतें ॥ चौऱ्याशींचा फेरा चुकतो ॥ हें ज्ञान तुला कोठपासून प्राप्त झालें ॥ ज्ञानदेव म्हणे निवृत्ति प्रसादें कळूं आलें ॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitization by eGangotri

८३ महारीण

पायां पडत्यें महारीण आलें ।।धृ०।। महारणीचे बोल ऐका ।। गांव वसाड पाडूं नका ।। हकनाक बसेल धक्का ।। इतुकें तुम्हीं मनीं तर्का ।। पायां० ।।१।। ब्रह्मा विष्णु दोन्ही बाळ ।। महाकाळाचे हे काळ ।। मन देखतां गोपाळ ।। ते मज महारीण पासोंती ।।पायां० ।।२।। एका जनार्दनीं महारीण झालें ।। सद्गुरूला शरण गेलें ।। त्याणें आपलें स्वहित केलें ।। जन्ममरण विसरलें ।। पाया० ।।३।।

८४ महारीण २ री

जोहार मायबाप जोहार धनी ।। मी निराकाराची महारिणी ।। माझ्या धन्याशीं निद्रा लागली म्हणुनी ।। मी संत सभेसी आलें कीं जी मायबाप ।।१।। माझे धनी एकुलते एक होते ।। त्यांसीं मजवाचोनी कर्मत नव्हतें ।। मीं रात्रंदिवस फिरत असतें ।। परी सत्ता त्यांचीच कीं जीं मायबाप ।।२।। मग मला मागें टाकुन ।। मी आल्यें धन्याचे मोह करून ।। थोर थोर टांगीं धरून ।। ओढोनि आणिले कीं जी मायबाप ।।३।। ओढोनि आणिले कोण कोण सबळ ।। त्यांचीं नांवें तुम्हीं ऐका सकळ ।। विश्वामित्रासारिखे ढिसाळ ।। ओढोनि आणिले कीं जी मायबाप ।।४।। ऋषींमध्ये पराशर ।। तो मजसवें गुरगुर करी फार फार ।। मग म्यां करून दिवसांचा अंधकार ।। म्यां ढिवरीसीं रतविला कीं जी मायबाप ।।५।। ऋषींमध्यें मुनि एक नारदू ।। तो मसीं कधीं नव्हता मरदू ।। त्याचा द्वारकेमधीं उतरला मदू ।। साठ पोरें व्याला कीं जी मायबाप ।।६।। सर्वांमाजी ब्रह्मा परवड ।। त्यानें मांडली मजसंगें होड ।। त्याजवर घालोनि कन्येचें लिंगाड ।। तो म्यां पस्तावीं पाडिला कीं जी मायबाप ।।७।। म्यां छळिलें व्यासपुत्र शुकदेव थोर ।। त्यानें माझी निर्भत्सना केली फार ।। मग काढोन पांईची पैंजार ।। माझे तोंडावर हाणिलीं कीं जी मायबाप ।।८।।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitization by eGangotri

अशा अशांच्या अशा केल्या गती ॥ येरेचि वाया गेले नेणो किती ॥ मज नागवें उघडें करोनि जिंकू पाहती ॥ त्यांचें तोंडीं माती पडो कीं जी मायबाप ॥९॥ एका जनार्दनीं विनंती करी ॥ जो करी पंढरीची वारी ॥ तेथें बळ न चाले निर्धारीं ॥ येरवीं तरी झाडे दिलें कीं जी मायबाप ॥१०॥

८५ महारीण ३ री

पायां पडतें महारीण आली ॥ महारीण गेली वरच्या आळी ॥ महारणीनें दिली आरळी ॥ जवळ आली काळाची फेरी ॥१॥ माझें महारणीचे ऐका ॥ जागे असा निजूं नका ॥ काळ करीतसे खेपा गा ॥२॥ एका जनार्दनीं महारीण ॥ करा चंद्रभागे स्नान ॥ घ्या तें पुंडलीकदर्शन ॥ पहावें विठ्ठल चरण ॥ पायां पडतें महारीण ॥३॥

८६ कंजारीण

होहोरी होहोरी हो ॥ लेवरे रसी ॥ हो होरी हो लेनेवाला है पर ॥ घेणेंवाला नहीं ॥ हो०॥ घेणेंवाला है पर ॥ लेणेंवाला नही ॥ हो० ॥धृ०॥ निसंग आडती ॥ केतनतोडा ॥ आपकारी पाडवा ॥ आतां सान जोडा ॥ हो० ॥१॥ तेलंगी वाढवा ॥ फाल्गुना फुलवा ॥ साधन करवा ॥ मन अशा फेडवा ॥ हो० ॥२॥ फुलवान नवरा ॥ अघतीन तंगी ॥ नीतंगीं कोडता ॥ डंगीन अडी ॥ हो० ॥३॥ जनार्दन पडावा ॥ कंजारी लडवा ॥ कोंकणी करावा ॥ दातारु बरवा ॥ हो० ॥४॥

८७ कोल्हाटीण

अनादी निर्गुण पूर्ण परात्पर अभेद नमियेला ॥ काया वाचा मनें शरण गेलें मीं त्याला ॥ मूळचा संबंध ठाव तेणें मजला दाखविला ॥ ज्ञान अंजन घालून प्रवृत्तिमार्ग खुंटविला ॥ पूर्ण बोध घोटविला ॥१॥ कोल्हाटीण झालें बाई मी कोल्हाटीण झालें ॥ वेळु वेगळें बाई मी को०

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

॥धृ०॥ प्रवृत्तीचें वस्त्र फेडूनी सुखासुखी रिझलें ॥ परात्पर परपुरुष पाहुन त्या पाशीं गेलें ॥ अंग संगती करून त्याचें सुख म्यां हरविलें ॥ अजरामृत म्यां सेविलें कोल्हाटीण झालें ॥२॥ आशा मनाशा तृष्णा ह्या तिन्ही मेळविल्या रांडा ॥ भाग चौटा करून येथें लावियला झेंडा ॥ करूनी उटणें प्राणाचा क्रोध तो मारिला मेंढा ॥ मग तो हंकार मेंढा त्यांनीं या भुलविलें सोंगा ॥ को० ॥३॥ मागें सारून पाये मारलिस उफराटी उडी ॥ भ्रांती लुगडें फेडुनि गेलें काया झालि उघडी ॥ दुरूनि अनुभव मिळुनि येथें मांडिली फुगडी ॥ झाली द्वैतपणाची घडी ॥ को० ॥४॥ परद्वार म्यां केलें जन्मसार्थक झालें ॥ पंचवीस दादलें हातीं म्या धरून उठवीलें ॥ अंतरगृह सावलींत येऊन निश्चल बैसलें ॥ एका जनार्दनीं एकीं एकपण मुरलें ॥ जन्म जरा मरण हरलें ॥ को० ॥५॥

८८ बैरागीण

हरिसंग लागू बैरागन होऊंगी ॥धृ०॥ दंडकमंलू कटिमृग छाला ॥ राम भजन गलां तुलसीके माला ॥ हरि० ॥१॥ काया मोरी कंथा ॥ मन मोरी जोगी ॥ शाम सुंदर जनावारस धोगी ॥हरि० ॥२॥ कहत कबीर अंतकी बारी ॥ रामबिना दुःख कोण निवारी ॥ हरि० ॥३॥

८९ भटीण

मी भटीण आलें रे भटा ॥ नको करूं रिकाम्या चेष्टा ॥ काय बोलतोसि चावटा ॥ उगीच कां करतोसी थट्टा ॥ मी भटीण ० ॥धृ०॥ म्यां भटणीनें तुज पाळिले ॥ पाळिल्याचे बरेच उपकार फेडिले ॥ माझें मज आणून देतां ॥ त्यांत तुझें काय गेलें रे भटा ॥ मी० ॥१॥ मजपासूनि वेदकीरे झालें ॥ ते म्यां तुझ्या हातीं दीलें ॥ संकासुरानें चोरून नेले ॥ माझ्या भयानें ते परत आणिल रे भटा ॥ मी० ॥२॥ त्याच्याच आधारानें मी बोलत आहें ॥ बहु मस्ती आली तुला मला ठाउक आहे ॥ आपलें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अंतर शोधून पाहे रे भटा ।। मी भटीण० ।।३।। लहानाचा थोर तुला मीं किंरे केला ।। नव अवताराच्या हाती भला ।। दहावा कलंकी राहिला । तोहि जाईल विलया रे भटा ।। मी भटी० ।।४।। एका जर्नादनीं शरण ।। भटाचें हरपलें मीपण ।। उगाच गेला मौन धरून ।। चैतन्यस पाहिलें रे भटा ।। मी भटीण० ।।५।।

९० पंचभाषेची गौळण

गौळणी ठकविल्या ।। ठकविल्या ।। एक एक संगतिनें ।। मराठ कानडीया ।। एक मुसलमानी ।। कोंकणी गुजरणी ।। अशा पांचिजणी । गौळणी ठकविल्या ।।धृ०।। गौळणी सुंदरी ।। गेल्या यमुनेतिरीं ।। वस्त्र फेडुनियां ।। स्नान करीती नारी ।। गोविंदानें वस्त्रें नेली कळंबावरी । स्नान करोनिया त्या आल्या बाहेरी ।। गौळणी ठकविल्या ।। गौ० ।।१।। लडोबा गोविंदा ।।लडो०।। नौखाणी आज।। अडच्याल्लों पडच्याल्लों ।। शीं फोड्यान फोडी ।। मारी कन्हैया पानी खेळ्यान खेळो ।। गौ० ।।२।। देव रे कन्हैया ।। दे० ।। मै इज्ञतकी बोबडी ।। कदम पकडूंगीं ।। मैंयाकुड जडी ।। मेरी चुनरी दे ।। मेरी ले दुल्लडी ।। गौळणी ठ० ।।३।। देवकी नंदना ।। दे० ।। तूं एक श्रीपती ।। हिंवाची ।। तुज विनवूं किती ।। पायीं पडतें बा ।। मी येतें काकुळती ।। माझी साडी दे ।। घे नाकाचें मोती । गौळणी० ।।४।। पावगा दातारा ।। पावगा दातारा ।। तूं नदाचा झीलो । माकां फडको दी मी हिंवान मेलेय ।। घे माझो कोयतो ।। देवा पाय पडतंय ।। गौळणी० ।।५।। ज्योरे माधवजी ।।ज्योरे०।। मी शरण थई । तनका पैकी ।। बाप दयाळ तूंही ।। मारी साडी आपो ।। हातणीं ते कंगणी ।। गौळणी ठ० ।।६।। इतुकें ऐकुनी ।। इतुकें ऐ०।। देव बोले हांसोनि सूर्या दंडवत ।। करा कर जोडुनी ।। नामा विनवितो ।। म्हणे सारंगपाणी ।। गौळ्या ऐक तूं ।। धन्य तुझी करणीं ।। गौळणी ठक० ।।७।।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

९१ गौळण पंचरंगीं १ ली

आल्या पांच गौळणी ।। पांच रंगाचे शृंगार करूनी ।।धृ०।। पहिली गौळणी सफेद ।। जशी चंद्राची ज्योत ।। गगनीं चांदणी लखलखीत ।। ऐका तिची मात ।। मंथन करीत होती दारांत ।। धरून कृष्णाचा हात ।। ऐशा नटून आल्या पांच गौळणी ।।१।। दुसरी गौळण भाळीभोळीं ।। रंग हळदीहून पिंवळी ।। पिंवळा पितांबर नेसून आली ।। अंगीं बुट्टेदार चोळी ।। एक लहान तनु उमर कवळी ।। जशीं चाफ्यांची कळी ।। ऐशा आल्या पांच गौळणी ।।२।। तिसरी गौळण रंग काळा ।। नेसून चंद्रकळा ।। काळें काजळ लेउन डोळा ।। रंग तिचा सांवळा ।। काळी गरसोळी लेउन गळां आली राजस बाळ ।। ऐशा नटू ।।३।। चवथी गवळण रंग लाल ।। लाल लाल हिलाल कपाळीं कुंकुंमचिरीं लाल ।। भाळीं भरून गुलाल ।। मुखी विडा रंग लाल ।। जसें डाळिंबाचें फूल ।। ऐशा ।। आ०।।४।। पांचवी गौळण हिरवा रंग ।। अवघ्या झाल्या दंग ।। हिरव्या कांकणाचा पहा रंग ।। जैसें आरशींत जडलें भिंग ।। फुगडी खेळती कृष्णासंग ।। एकनाथ अभंग ऐशा आल्या त्या नटूनी ।। आल्या आल्या पांच गौळणी० ।।५।।

९२ गौळण बोबडी

जात होतें पानीयां तेथें भेतला सांवला ।। दोईवर तोपि मळलपिच्छांची ।। खांद्यावली कांबला ।।१।। काय थांगू तुतें बाई ।। काय थांगू तुतें ।।धृ०।। घुलगे माझे फुतले गे ।। मग मी ललत बैसलें ।। कुनिकुन आला सालंगपाणी ।। मला पोतासीं धलिलें ।। काय थांगू तुतें ।।२।। मला पोतासीं धलिलें ।। सुख मोतें वातलें ।। निवृत्तीचे किलपें कलून ज्ञानदेव लाधले ।। काय थांगू तुतें ।।३।।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitizagtion by eGangotri

९३ गौळण ४ थी

दुडिपर दुडि गौळणीसाते निघाली ॥ गौळण गोरस म्हणो विसरली ॥१॥ गोविंद घ्या कोणी दामोदर घ्या गे ॥ तव हासती मथुरेच्या गे ॥धृ०॥ दुडिया माझारी कान्होबा झाला बारी ॥ उचंबळे गोरस सांडे बाहेरी ॥२॥ एका जनार्दनीं समरस गौळणी ॥ ब्रह्मानंद न समाये मनीं ॥३॥

९४ गौळण ५ वी

येश्वदेसी गौळणी सांगती गाऱ्हाणीं ॥ नट नाटक कपटी सांभाळ आपुलीं तान्हीं ॥ किती याच्या खोडी सांगु साजणी ॥ सहस्रमुख भागला निवांत ठेला ॥ नेति नेति शब्द वेधू लाविला ॥ गोविंद ॥ परमानंदे ॥ आनंदकंदें ॥ वेधु लाविला ॥धृ०॥१॥ ऐके दिवशीं मी गेलें यमुनातीरीं जीवना ॥ सवें गोप सांगातें घेऊनी आला कान्हा ॥ करीं धरी पदरा न सोडी जाणा ॥ एकांत घाली मिठी ॥ न सुटे गांठी ॥ पाहिली दृष्टी ॥ नित्य आनंदू ॥ वेधु लाविला गोविंदें ॥२॥ एके दिवशीं घराशीं आले सारंगपाणी ॥ दहीं दूध भक्षिलें रिती केलीं दुधाणी ॥ अज्ञान मडकें टाकिलें निपटोनी ॥ पाहिला हरी ॥ घराभितरी ॥ पळाला दुरी ॥ बाई यश्वदेचा ॥ वेधू लाविला० ॥३॥ कितीं खोडी याच्या सांगूं साजणी ॥ गुण लिहिता न पुरे मेदिनी ॥ रूप सुंदर पाहतां न पुरें नयनीं ॥ एका जनार्दनीं ॥ वेधल्या जनीं ॥ गवळण तान्ही ॥ सारंगपाणी वेधू लावि० ॥४॥

९५ गौळण ६ वी

कशी जाऊं मी वृंदावना ॥ मुरली वाजवितो कान्हा ॥धृ०॥ पहिले तिरीं हरी वाजवी मुरली ॥ नदी भरली जमुना ॥१॥ कांसे पीतांबर केशरी टीळक ॥ कुंडल शोभे काना क० ॥२॥ काय करूं बाई कोणाला सांगु

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नामाचीं सांगड आणा ।। क० ।।३।। नंदाच्या हरीनें कौतुक केलें ।। जाणे अंतरिच्या खुणा ।। क० ।।४।। एकाजनार्दनीं मनिं म्हणा ।। देव माहात्म्य कळेना कोणा ।। कशी जाऊं मी वृंदावना ।।५।।

९६ गौळण ७ वी

वारियानें कुंडल हाले ।। डोळे मुरडीत राधा चाले ।।धृ०।। राधेला पाहुन भुलले हरी ।। बैल दोहिता आपुले घरीं ।।१।। फणस गंभिरी कर्दळि दाट ।। हातीं घेऊनी नारंगी पाट ।।२।। हरिला पाहूनी भुलली चित्तां ।। मंदिरीं घुसळी खडबडी डेरा रिता ।।३।। मन मिळालेंसे मना ।। एका भुललें जनार्दना ।। वारियानें कुं० ।।४।।

९७ गौळण ८ वी

अनंत लीला रूप सांवळा तो बाळब्रह्मचारी पातकें लोळतीं चरणावरी ।।धृ०।। म्हणे येश्वदा बा गोविंदा नको जाऊं परद्वाराला कीं गवळण मुखरण जपली तुला ।। होती एक गवळण घरची धनीन गेली होती बाहेरी ।। जाऊन चढला माळ्यावरी ।। वर पाहातो शिंकीं लोंबती हात चालविले चारी ।। सर्व हातांनी दहीं खाई हरी ।। खाऊन पिऊन दिले ढेकर शिकीं आणिलीं बाहेरीं ।। टाकिलीं शेजारणीचे द्वारीं ।।१।। होती एक गवळण घरची धनीन पाहों आली मंदिरीं ।। दह्या दुधाच फोडिल्या हारी ।। गेली पुसाया तियेपासीं शेजारणीचे द्वारीं ।। माझीं शिंकीं कांगे तुझे परद्वारीं ।। त्या रांडेनें केलें भांडण आली माझे आंगावरी ।। दांत खाऊन गाल कुसकरी ।।२।। स्त्री पुरुष निजले होते समया लावून चारी ।। कृष्णदेव गेले पलंगावरी ।। दाढी वेणीची गांठ मारिली या दोघां समोरी ।। आपण मग पळून आला बाहेरी ।। डचकुन उठली वेणी गुंतली झाली गौळण घाबरी ।। आतां माझी गांठ सोडा लौकरी ।। त्या दोघांला गांठ सुटेना बोलविला शेजारी ।। त्यांने गडे ओढित आणिली द्वारीं ।।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अवघे नगरचे लोक मिळाले तमाशा पाहती सारीं ।। गवळण गरगर गिरक्या मारी ।। गवळी म्हणे अगं गवळणीं दाढी तुटली सारी ।। कीं गवळी वरवर दाढी धरी ।।३।। गागर घेऊन गेली पाण्याला यमुनेचें तिरीं ।। कीं घागर फोडी डोईवरी ।। गवळण म्हणे येश्वदा माते पाहीं तुझा श्रीहरी ।। माझे सुनेस मारी मंदिरी ।। येश्वदामाता झाली जागृत लावुन शुभ्र दोरी ।। पाळणा हलविते लौकरी ।। रांगत रांगत गेला कौंसारीं ।। देव होते देव्हारीं ।। त्याणें गडे देव गिळले सारे ।। तुका म्हणे आडवावा श्रीहरी ।।४।।

९८ गौळण ९ वी

गवळण म्हणती यशोदेला ।। कोठें गे सांवळा कां रथ शृंगारिला ।। सांगा हो मजला ।। अक्रुर उभा असे गे बाई साजणी ।।१।। ह्या नंदाच्या आंगणी ।। मिळाल्या गौळणी ।। बोले नंदाची पट्टराणी ।। सद्गदित होऊनी ।। मथुरेसी चक्रपाणी जातो गे साजणी ।। निवळ झाले मन हें वचन ऐकोनि ।।२।। अक्रुरा रे चांडाळा तुज कोणी धाडिला ।। कां घात करूं आलासी वधिसीं सर्वांला ।। अक्रूरा तूझी नामा ऐसींच करणी ।।३।। रथीं चढला वनमाळी आकांत गोकुळीं ।। भूमी पडल्या व्रजबाळीं कोण त्यां सांभाळी ।। नयनींच्या उदकानें भिजली धरणी ।।४।। देव बोले अक्रूरासी वेगें हांकीं रथासी ।। ह्या गोपिकांच्या लोकांसी न पाहवे मजसी ।। एका जनार्दनीं म्हणे रथ गेला निघोनी ।। ह्या नंदाच्या आंगणीं ।।५।।

९९ सौरी १ ली

सौरी झालें बाई ।। आतां नाहीं येथें कांहीं ।। आता नाहीं येथे काहीं ।।धृ०।। होऊन वेडी घाली फुगडी ।। गल्लोगल्लीं नाचे ।। मागें पुढें रुंदावलें ।। झालें गणोबाचें ।।१।। होउनी उघडी घाली फुगडी जाऊनी राउळांत ।। संतसंग जाहल्यावरी पुरेल तुझा हेत ।।२।। तुका म्हणे सौरी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

झालें दादला मेला भ्याला ॥ संग नसतां पोरें झालीं काय सांगू तुला ॥३॥

१०० सौरी २ री

मी सुखाची कन्यका झालें वाढविली घरीं वाढविली घरीं ॥ देखतां पाहतां उचलून उचलून नेली चोरी ॥ उचलून० सौरी झालें बाई आतां करूं तरी काई, करूं तरी काई ॥धृ॥१॥ निमुकाचा पुत्र झाला जांवा नणदा घरीं, जावा नणदा घरीं ॥ पाहतां देखतां उचलून नेली चोरी, उचलून नेली चोरी ॥२॥ बारा सोळा मुलें झालीं आले सुना नातू कंबरेवरी हातू ॥३॥ कैंची बहीण कैंची माय अंतकाळीं देखा अंतकाळीं देखा ॥ निदानीचे वेळीं तुज देव मारी हांका ॥४॥ लेंकुरवाळी बाईला म्हणे तोंड याचें झाका तोंड याचें झाका ॥ एकाजनार्दनीं दास विनवितो तुका ॥ विनवितो तुका ॥५॥

१०१ सौरी ३ री

सौरी झालें बाई आतां करू गत काई, करूं गत काई ॥ बसवी झालें वाई आतां भिन्न भेद नाहीं, भिन्न भेद नाहीं ॥१॥ कासरा लाउन सासरा मारला दादला टाकून आलें ॥ आत्मलिंग पाहूनियां मगरमस्त झालें, मगरमस्त झालें ॥२॥ बांधुन बुचडा उघडा माथा विभूतीचा पट्टा ॥ आला गेला म्हटला नाहीं, धरल्या चारी वाटा ॥ ३॥ उभा शिंदळ घाली गोंधळ हाचि लाभ मोठा, हाच लाभ मोठा ॥ मागें पुढें पाहूं नका वेगें काम लाटा, वेगें काम लाटा ॥४॥ लहान थोर म्हटला नाहीं जहालेंशी वेडी, जहालेंशी वेडी ॥ तुका म्हणे, बसवी झालें परद्वारा गोडी ॥ पर० ॥५॥

१०२ सौरी ४ थी

सहा दादुले केले परी म्यां ऐसा नाहीं देखिला दादुला ॥ काया वाचा रमलें त्यासीं परि ऐसा नाहीं देखिला दादुला ॥ सौरी झालें सौरी सखे बाई

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

झालें त्याची नवरी ।।धृ०।। १।। नग्न होऊनी भोगिला पुरुष म्यां ऐसा नाहीं देखिला दादुला ।। देतो गोड गोड खाया परि म्या ऐसा नाहीं देखिला दादुला ।। सौरी झालें सौरी सखे ग बाई त्याची नवरी ।।२।। केला संसार गोड परि म्यां ऐसा नाहीं देखिला दादुला ।। याचे मनाची पुरविली खोड, परि म्यां ऐसा नाहीं देखिला दादुला ।। सौरी झालें सौरी सखे बाई झालें त्याची नवरी ।।३।। ऐसी नवरी झाले परि म्यां ऐसा नाहीं देखिला दादुला ।। एकाजनार्दनी नमिलें पायीं ऐसा नाहीं देखिला दादुला ।। सौरी झालें सौरी सखे बाई झालें त्याची नवरी ।।४।।

१०३ अंबाबाई

तूं विटेवरी सखये बाई हो करी कृपा ।। माझें मन लागो तुझ्या पाई हो करिं कृपा ।। तूं सांवळे सुंदरी हो करीं कृपा ।। लावण्य मनोहरी हो करीं कृपा ।। निजभक्ताकरुणाकरीहो करीं कृपा ।। चाल ।। पंढरपुरीं राहिली ।। डोळां पाहिली ।। संतें देखिली ।। वरून विठाबाई ।। सच्चिदानंदें अंबाबाई हो करीं कृपा ।। करी कृपा उजळी कुळदीपा ।। बोध करीं सोपा ।। येऊनी लवलाहीं येऊनी लवलाहीं ।। सच्चिदानंदें अंबाबाई हो करीं कृपा ।।१।। तुझा देव्हारा मांडिला हो करीं कृपा ।। चौक आसनी कळस ठेविला हो करीं कृपा ।। प्रेम चांदवा वरि दिधला हो करीं कृपा ।। ज्ञानगादी दिली बैसावया हो करीं कृपा ।। वर बसविली आदि माया हो करीं कृपा ।। चाल ।। काम क्रोध मदमत्सर ।। दंभ अहंकार त्याचें बळ फार ।। सर्व सुख देई, सर्व सु० ।। सच्चिदानदें अं० ।। करि कृपा ।। उजळीं कुळदीपा ।। बोधकरी सोपा ।। येऊनि लवलाहीं ।। येऊनि०।। सच्चिदानंदें अंबाबाई० ।।२।। शुकसनकादिक गोंधळी हो करी कृपा ।। नाचताती प्रेमकल्होळी हो करी कृपा ।। उदे उदे शब्द आरोळी हो करीं कृपा ।। पुढें पुंडलीक दिवटा हो करी कृपा ।। त्याने मार्ग दाविला नीट हो करीं कृपा ।। आइ दाविली मूळ पीठा हो करी कृपा ।। चाल।। बा०।।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

रखुमादेवीवरू सुखसागरू ॥ त्याला नमस्कारू ॥ सर्व सुख देई ॥ सर्व सुख०॥ सच्चिदानंदें अंबाबाई हो करी कृपा ॥ करी० ॥ उजळ कुळदीपा ॥ बोध करि सोपा ॥ येऊनि लवलाहीं ॥ सच्चिदानंदें अंबाबाई हो करी० ॥३॥

१०४ मरी आई

कनगुळी मानगुळी सुपटोपली ॥ आदिमाया नमो भगवती मानवी हो काय करून ठेविलीये ॥ निवांत देखिलिये ॥धृ०॥ मरी आईचा कोरडा वाजतो ॥ सिंवेवरी कोरडा वाजतो ॥ गाड्यावरी कोरडा वाजतो ॥१॥ चारी पुरुषार्थ प्रसंगीं घालुनी ॥ निरंजनीं पुंडलीकाचे द्वारीं बैसोनी ॥ भक्तिपुरस्करोनीं ॥ निवांत देखिलीं ॥२॥ मच्छें, कच्छें, वराहें, नारसिंहें, वामनें, परसें, रामें, कृष्णें, बौद्धें, कलंकियें ॥३॥ सीते जान्हवीये ॥ वैष्णवकुळाचा उद्धार करोनी ॥ चौवर्णाचे मळवट भरोनि ॥४॥ अठरा जनाची रांडोळी करोनी ॥ गाढे दृढ दैत्यांची आहुती घेऊनी ॥ बळी बगाडे तुजला देउनी ॥५॥ अनुहात ब्रह्मांडें तुझा देव्हारा म्हणुन तुला अर्पिला माया तरुवरा ॥ लिंबे घेउनी नारळें मारा ॥६॥ ऐसी पूजियेली नरतनू ॥ भक्तासी करिसी विनवणू ॥ तैसें नव्हे रे ज्ञान अंजनू ॥ प्रसन्न होउनीयें खेळि प्रपंच भानू ॥७॥ अजुन अरसी माय ठेंगणी ॥ त्या तरुवरांचें पानें ॥ आवडे, स्वयंभुकानें ॥ वाने मौनव दुखणें ॥ जनार्दनीं करोनी मन ॥ एकाजनार्दनीं अंबे तुजला पांगिले जन ॥८॥ अंबा अंबिका प्रसन्न होउनी ॥ वैष्णवासीं दर्शन देउनी ॥ सांवळें रूप प्रगटोनी ॥ वैष्णवांमाजी गर्जोनी ॥ सिंहनादें एकाजनार्दनीं भरोनी ॥ अंबा नितांत राहिलीये ॥ मरी आईचा कोरडा वाजतो ॥ गाड्यावरी कोरडा वाजतो ॥ सिंवेवरी कोरडा वाजतो ॥९॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

१०५ ठकडी

शामसुंदर मूर्ति सांवळी ।। उभी जणुं असें राउळीं ।। ती आकाश ब्रह्मांड गिळी ।। दादानों ठकडी बायको आली ।। भल्या भल्यासी ठकवुन गेली ।। दादानों० ।।धृ०।। चारी शून्याचे बरती ।। ज्ञान दृष्टीनें न्याहाळती ।। चारी सूत्रें तिचे हातीं ।। दादानों ।। ठ०।।१।। बायको नव्हे पुरुष नव्हे ।। दावी नाना रंग नटभाव जैसी आकाशीं बिजली लवे ।। दादानों ठकडी० ।।२।। जे जे पाहूं गेले तिसी ।। तिनें झोडपिलें तयांसी ।। तुकाराम शरण तिशी ।। दादानों ठकडी० ।।३।।

१०६ मुलगी

आरते येग धाकटे मुली ।। हीच काग तुमची बोली ।। धरंदाराचे हितकिर्ते ।। फुटक्या मडक्याचें भोंक बुजविते ।। अटक मटक नऊ वाटा ।। येऊन बसे सदा दारवंटा ।। सदा दारवंटा ते कोण ।। तुझ्यांत गेले दोन ।। फटक माझे सवती ।। तुला सहाजण झोंबती ।। पडले षट्विकारांच्या हातीं ।। षट्विकार कशानें जाती ।। सद्गुरुचे पाय धर चित्तीं ।। सद्गुरु काय देईल ग मला ।। तन मन धन अर्पण करीन तुला ।। संसार जाइल सारा ।। उद्यां येईल काळाचा फेरा ।। आम्ही नरनारी पतिव्रता ।। विष्णूवर करूं सत्ता ।। मुक्ताबाईनें केला संग ।। योगी खेळविला पांडुरंग ।।१।।

१०७ वऱ्हाडणी

आलिया वऱ्हाडणी बैसलिया टेंकी ।। कोणता नवरा कोणी नाही ओळखी ।।१।। मी कोणाची मज सांगा कोणी ।। वऱ्हाडा आलिया वऱ्हाडणी ।।२।। कोणती वरमाय कोणता वर बाप ।। कोणता नवरा कोणता मंडप ।।३।। वऱ्हाड नव्हे हें स्वप्न गे माय बाप ।। रखुमादेवीवर धरा विठ्ठलाचे पाय ।।४।।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

१०८ लग्न

हळद वाटूं वाटिला पाटा ॥ अवगुणाचा नवरा हळदीनें उटा ॥१॥ नागवा नवरा नागवी नवरी ॥ दोघे बैसलों चराचरीं ॥२॥ नागव्या नवऱ्यानें नवरी नेंसिली ॥ नागव्या नवरीनें नवरा वेढिला ॥३॥ सेज मंडपी दोघेंचि दोघें ॥ एका जनार्दनीं नाचती दोघें ॥४॥

१०९ टिटवी

टिटवी यमाची तराळीन ॥धृ०॥ एका गांवावर जाऊन ॥ एका नदींत विहीर पाडुन ॥ तेथें टिटवी करी शयन ॥ दोन्ही पायांत खडा धरून गा ॥१॥ मरे चवगुल्याची सून ॥ पाटलाचे चौघे जण ॥ कुळकरण्याची लाडकी सून ॥ आता गांवांत राहिले कोण गा ॥२॥ देशमुख देशपांडे चौधरी ॥ त्यांची गणना कोण करी ॥ शेलकी देशमुखाची पोरी ॥ आतां गांवांत नाहीं थोरी गा ॥३॥ कोणी कोणाचें कोण ॥ शेवटीं नेऊन मारीन ॥ माझे संगें येक कामीन ॥ एकाजनार्दनीं थोरपणा गा ॥४॥

११० पिंगळा

पिंगळा महाद्वारीं बोलि बोलतो देखा ॥ डौर फिरवीतो डुग डुग ऐका ॥धृ०॥ वरल्या आळीला तुम्ही ॥ सावध रहावें ॥ पाटीलबुवाला ॥ मग लावुन सवें ॥ चिठी येईल बा ॥ मग पडेल ठावें ॥१॥ मधल्या आळीला ॥ एक बायको फिरे ॥ तिजला तुम्ही साधा ॥ मग पडेल पुरें ॥ नाहींतर पाटीलबोवा तिची पळतील गुरें ॥२॥ आणिक एक बारे ॥ सुटेल तांतडी पाटीलबुवाची ॥ मग पडेल माडी ॥ तिचीं पांच पोरें ॥ लागतिल देशोधडी ॥३॥ आणिक एक ऐका ॥ कैचें नवल झालें ॥ गांवच्या पांड्यांनीं पाटलास नागविलें ॥ साऱ्या कागदाचें शून्य एकच केलें ॥४॥ हिंडता फिरतांना ॥ एक शकुन सांगे ॥ त्याच्या सत्तेनें ह्या आळीसे वागे ॥ संतां घरचा बा एक तुकडा मागे ॥५॥ हें जरी न ऐकाल ॥ तरी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

दुसरा येईल ।। सरते शेवटीं बा ।। काळ बांधून नेईल ।। काळ म्हणे यांत ।। आमचे काय जाईल ।।६।।

१११ बुलबुल

लख बुलबुल है ।। हवाजे तुम मुबारखा ।।धृ०।। झूटा तेरा जप ।। भातरोटी गप सद्गुरुमे चप ।। तुझे काल करेगा गप ।। लख बुलबुल है ।।१।। लागेसो मेलिया नाम ।। हे जी सदा भरे काम ।। भला वाशा बेफाम ।। तुझे कहा मिलेगा राम ।। लख बुल० ।।२।। मोकु आगकुं लगरय राख ।। आंत्मा होवेगी नापाक ।। भला आशापें डुबलगें ।। एका जनार्दनका बंदा ।। लख बुलबुल० ।।३।।

११२ वटवाघुळ

पूर्वीं पंक्तीस केला भेद ।। नाहीं अंतःकरण शुद्ध ।। झालें वटवाघुळ प्रसिद्ध ।।धृ०।। वटवाघुळी झालें बाई ।। करावें काई ।। उपाय नाहीं ।। वटवाघुळ झालें० ।।१।। वटवाघुळीचा जन्म घेऊन ।। घेतलें उफराटें टांगुन ।। तोंडीं नरक भरला जाण ।। वटवाघुळ० ।।२।। वटवाघुळीची यातना मोठी ।। भोगिल्या लक्ष चौऱ्यांशीं कोटी ।। जन्ममरणाच्या तुटल्या गांठी ।। वटवाघुळ झालें० ।।३।। एकाजनार्दनीं वटवाघुळ झालें ।। सद्गुरुला शरण गेलें ।। जन्ममरण चुकविलें ।। वटवाघुळ झालें बाई ।।४।।

११३ काऊ

पैल तो काऊ कोकतसे ।। शकुन गे माय सांगतसे ।।धृ०।। उड उड रे काऊ ।। तुझे सोन्यानें मढवीन पाऊ ।। पाहुणें पंढरि राऊ ।। घरीं कै येतीं ।।१।। दही-भाताची उंडी ।। लाविन तुझ्या तोंडी ।। जीवा पडे चविची गोडी ।। सांग वेंगीं ।।२।। दूध भरून वाटी ।। लाविन तुझे ओंठीं ।। प्रत्यक्ष सांग गोष्टी ।। विठू येईल कैं ।।३।। आंबिया डाहाळी फळें ।।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

चोखी रस आंवळे ।। आजिचे रे काळीं ।। शकुन सांगे ।।४।। ज्ञानदेव म्हणे ।। जाणिजे ये येणें खुणें ।। भेटूं पंढरीराणे ।। शकुन सांगें ।।५।।

११४ मैना

तोती मैना राधेकृष्ण, तोती मैना राधेकृष्ण ।। राधेकृष्ण बोल तोती राधेकृष्ण बोल ।।धृ०।। येकही तोती धुंडन आई ।। लाकटकी वानी बोल ।। तोती मैना० ।।धृ०।। दाना खाये तोती पानी पीवे ।। पिंजरमें करित कल्लोळ ।। तो० ।।२।। मीराके प्रभु गिरीधर नागर ।। हरिके चरण चित डाल ।। तोती० ।।३।।

११५ पोपट

पढो माझा आत्माराम ।। राधाकृष्णाचें हें ध्यान ।। पिंजऱ्या मध्यें गुंतलासी ।। तुज सोडवी कोण ।। पढो० ।। धृ०।। चौऱ्यांशीं लक्षयोनी ।। वनीं तू तरी हिंडसी ।। प्रमदा विषफळीं अतित्वरें धांव घेसी ।। घेउनिया दोहीं पक्षी ।। पाहती तुज न्यावयासी ।। पढो माझा आत्माराम ० ।।१।। पिंजरा घडविला पंच भूताचा ।। कुसरी नवद्वारें सोळा सांधे ।। प्रभा पडली भीतरीं ।। लाविली प्राचीनाची दोरी ।। बांधिला निजमंदिरीं ।। पढो मा० ।।२।। हिरवा तुझा रंग ।। गुंजवर्ण दोन डोळे ।। चोच आहे तुझी लाल ।। बोल तुझा हा मंजूळ ।। राघवा तूं बोल ।। माझ्या सख्या अमोलिक बोल ।। पढो० ।।३।। अचल तूं माझें चंचल ।। मोठे हिंडे तीनही ताल ।। तुला टपला काळ बोका ।। केव्हां घालिला गळ ।। जरी जाशी उडोनिया ।। पूर्व सुकृताचें फळ ।। पढो ।। पा० ।।४।। सत्य गुरु दत्त दाता ।। तारक मंत्र तूज देई ।। तोचि सोडविल ।। यम करील काई ।। पावशील चितामणी ।। स्वामी तुकोबाचे पाई ।। पढो माझा आत्माराम ।।५।।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

११६ पांखरू

कृष्णा एक पांखरू आहे ।। तें मुखावीण चारा खाय रे ।। डोळे नाहीं परि तें पाहे ।। वाचेवीण सोय गाय रे ।।१।। सख्या त्याचें नांव कान्होबा ।। कृष्णा म्हणती सर्व रे ।। त्याचें वास्तव्य कोठें आहे ।। पर नाहीं परि तें उडे रे ।।२।। तिहीं लोकीं हिंडतें ।। त्रिभुवन त्याला थोडें रे ।। त्याचे नखांत आकाश बुडे ।। तो सन्मुख चहूंकडे रे ।।३।। अहो त्याला मायबाप ।। दोन्हीं नाहीं रे ।। एक पर्णेविण पहाती ।। जनार्दनाचे पाय रे ।।४।।

११७ कुत्रें

येरे कुत्तु ये ।। आम्हा विटाळ करूं नको ।। आपली भाकर घे ।। द रे धन्या दे ।। विटाळ राहिला तुज खालीं ।। आवरून आपला घे ।। आतां हें कुत्रें मातलें ।। मीच म्हणुनी गुंतले ।। फार कस मोठी केली ।। जीवा तुझी खोटी झाली ।। उपाशी मरतों पाहीं बरें ।। अमृताचें अंग सारें ।। घर एक सकाळ काय खाशी ।। तूंच मुद्दल कोठें राहसी ।। एवढें ज्ञान झालें कोठें ।। सद्गुरुचें देणें मोठें ।। सद्गुरु तुला ।। अहेकारे ।। सर्वांघटीं तोच किंरे ।। आम्ही तर म्हणतों कुत्रा तुला ।। अविद्येनें धत्तोरा दिला ।। ब्रह्माशीं अविद्या म्हणशी ।। देहें ब्राह्मण कैसा होशी ।। श्रेष्ठ जन्म वेद बोलती ।। येवढें भलें तरि कां मरती ।। हरिभक्त अमर होती तें कळें कैसे ।। आपण व्हावें तैसें ।। होईना तैसा कां रे ।। जात गोत पाहिनाशी कीं रे ।। हें तुला ज्ञान कशानें झालें ।। ज्ञानदेव म्हणे निवृत्तकृपें कळों आलें ।।१।।

११८ गाई

आम्हां घरीं एक गाय दुभती आहे ।। पान्हा न समाये त्रिभुवनीं ।।धृ।। वान ते सांवळी नांव तें श्रीधरा ।। चरे वसुंधरा ।। चौदा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

भुवनें ॥१॥ वत्स नाहीं माय भलत्या सवें जाय ॥ कुर्वाळितो लाहे भाव भरण ॥२॥ चहूं धारीं क्षीर वोळली अमूप ॥ धाले सनकादिक सिद्धमुनी ॥३॥ तुका म्हणे माझी भुक तेथे जाय ॥ जोगाविते माय तिन्ही लोकां ॥४॥

११९ सर्प

वासुकी सर्प मोठा दारुण ॥ क्रोधें बैसला बिळीं जाऊन ॥ सहज मग तेथें गमन ॥ तमोगुण घातलें सारवण ॥ तेथें नष्ट आला धावुन ॥ त्यानें मजवर झडप घातली जाण ॥ साप चावला चावला ॥ आगा गा गा गा आबा बा बा बा ॥ आतां ता ता ता ॥ अरे रे रे रे ॥ साप चावला ॥१॥ याची जात मोठी कठीण ॥ माया भुली पडली येऊन ॥ गर गर गिरकी आली दारुण ॥ माझें जडावलें मन ॥ साप चावला ॥२॥ या गिरकीचे नाहीं भय ॥ मीं केले सहस्त्र अन्याय ॥ तोचि तडफडत हातहि पाव ॥ आतां कोण वांचवील ठाव ॥ साप चावला ॥३॥ देवावर माझा हवाला ॥ प्राण जाबोनी माघारा आला ॥ एकाजनार्दनीं म्हणे भला ॥ आजिचा दिवस गोड झाला ॥ स० ॥४॥

१२० विंचू

विंचू चावला वृश्चिक चावला ॥ काम क्रोध विंचू चावला ॥ तम घाम आगासीं आला ॥धृ०॥ पंचप्राण व्याकुळ झाला ॥ त्यानें माझा प्राण चालिला ॥ सर्वांगाचा दाह झाला ॥ चा० ॥१॥ मनुष्य इंगळी अति दारूण ॥ मज नांगा मारिला तिनें सर्वांगीं वेदना जाण ॥ त्या इंगळीची ॥२॥ ह्या विंजवाला उतारा ॥ तमोगुण मागें सारा ॥ सत्वगुण लावा आंगारा ॥ विंचू इंगळ उतरे झरझरां ॥ विंचू ॥३॥ सत्य उतारा ॥ येऊन अवघा सारिला तमोगुण ॥ किंचित राहिली फुण फुण ॥ शांत केली जनार्दनें ॥४॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

१२१ येडका

येडका मदन तो केवळ पंचानन ॥ येडका ० ॥धृ०॥ धडक मारिली नारदा ॥ केला रावणाचा चेंदा ॥ दुर्योधना मारिली गदा ॥ घेतला प्राण ॥ तो केवळ पंचानन ॥१॥ धडक मारिली शंकरा ॥ केला ब्रह्म्याचा मातेरा ॥ इंद्रचंद्रासी भेदरा ॥ लाविला जेणें ॥ तो केवळ पंचानन ॥२॥ भस्मासुर मुकला प्राणासी ॥ तेचि गति झाली वालीसी ॥ विश्वामित्रासारखा ऋषि ॥ नाडिला जेणें ॥ तो. के० ॥३॥ शुकदेवानीं ध्यान धरोनी ॥ येडका आणिला आतळोनी ॥ एका जनार्दनाचे चरणीं ॥ लाविला ज्याणें ॥ तो केवळ पंचानन ॥ येडका म० ॥४॥

१२२ भूत

जबर भूत मोठें ग बाई ॥ झाली झडपणां करूं गत काई ॥ भूत० ॥धृ०॥ १॥ सुपचाटुचे केलें देवऋषी ॥ या भूतानें धरिली कशी ॥ भूत मों० ॥२॥ लिंबू नारळ कोंबडा उतारा ॥ त्या भूतान धरिला थारा ॥ भूत मो० ॥३॥ भूत लागलें नारदाला ॥ साठ पोरें झालीं त्याला ॥ भूत० ॥४॥ भूत लागलें ध्रुवबाळाला ॥ उभा अरण्यांत ठेला ॥ भूत मो० ॥५॥ एकाजनार्दनीं भूत ॥ सर्वठायीं सदोदित ॥ भूत० जबरगे ० ॥६॥

१२३ विटीदांडू

हकब दुबक तिबक पोरा, त्रिगुण खेळ मांडू ॥ खेळूं विटीदांडू ॥धृ०॥ सत्वविटी धरुनि हातीं धीर धरीं दांडू ॥ भाव बळें टोला मारी भिऊं नको गांडू ॥१॥ त्रिदबळें खेळ खेळूं, लक्ष लावी तिशीं ॥ मुर्खापाशीं युक्ति नाहीं उडून गेली उशी ॥२॥ ओकड लेंड मुंड नाल पुढें आणि लेका ॥ भक्तीबळ खेळ खेळूं जनार्दनीं ऐका ॥३॥ खेळ विटी० ॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

१२४ विटीदांडू २ रा

सारा विटीदांडू ।। आणिक कांहीं खेळ मांडू ।।धृ०।। बहु अंगा आले डाव ।। स्थिर नाहीं कोठें पाव ।।१।। कोली हाणे टोला ।। झेली तेणें तो गोविला ।।२।। एकमेकां हांका मारी ।। सेलजाळी एक घरी ।।३।। राजी आलें नांव ।। तेरा न चुकेची धांव ।।४।। पुढें एक पाटी ।। एक एक दोधां आटी ।।५।। एक सोस पोटा ।। एक धावे हातिपिटी ।।६।। तुका म्हणे आतां ।। खेळ मोडा परतावा ।।७।।

१२५ चेंडूफळी १ ली

झेला रे भाईयानों झेलारे ।। गुरुवचनें तुम्हीं झेला रे ।।धृ०।। सहज चेंडू समान फळी ।। खेळूं जाणें तो खेळिया बळी ।।१।। झेला रे० ।। अभिमाना चढे तो खालता पडे ।। हातचा चेंडू जाय मग चडफडे ।।२।। झे०।। एकाजनार्दनीं एकचि बोली ।। गुरुपुत्र होयी तोचि झेल ।।३।। झे०।।

१२६ चेंडूफळी २ री

झेला रे झेला वरचेवर झेला ।। हातचे गमवितां पाठी खाई टोला ।।धृ०।। त्रिगुणाचा चेंडू हातीं झुगारी निराळा ।। वहिलिया मन मुख लावी तेथें डोळा ।।१।। आगळा होऊनियां धरि वरचेवरी ।। चपळ तेची जिंकी ड्याग टाकी येरझारी ।।२।। हातीं सांपडल्यावरी ।। बसूं न देती कोणी ।। स्वारी माने स्वारी घेती वणवे करूनि ।।३।। तुका म्हणे सुख पाहें तयाचें आगळें ।। हरिशीं जिंकी तरी कोण एके खेळें ।।४।।

१२७ मृदंगपाटी

मागें पुढें पाहे संभाळूनि दोनी ठय ।। चुकावुनी जाय गडी राखे गडियासी ।।धृ०।। मुरडे दंडा दोन्हीं तोंडें गडियां सावध करी ।। भेटती या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

संगें तया हाल तुजवरी ॥१॥ गडिया गडी वांटून देई ॥ ज्याच्या सोडीं तेची ठाई ॥२॥ आगळ्या बळे करील काय ॥ तुज देणें लागे रोय ॥३॥ नवा घरा पाउलाकारी ॥ सांपडें तो तेथें घरीं ॥४॥ जिंकोनि राव करी ॥ टाहो सत्ता आणिका वीर ॥५॥ सांपडानि राई बहू काळ गुंतलासी ॥६॥ बळिया गडि फळि ॥ फोडोन धरिता त्यासी ॥७॥ चुकांडीं जो साय मिळोनि आंगीं जाय ॥ गुंतलासी काय तुका म्हणे ॥८॥

१२८ हुतुतु १ ला

जीवा शिवाच्या मांडुनि हाला ॥ अहं सोहं दोन्ही भेटती मला ॥धृ०॥ घाली हुतुतु फिरोनि पहा आपणासी पाही ॥ बळिया तों मांडिला तुटी पुढिलासी ॥१॥ खेळियां तो हाल ॥ सांभाळी खेळ ॥ धुम घालीतो पाहे पाताळीं ॥२॥ बळिया गाड्या तोचि खेळे ॥ दम पुरतो वेळो वेळा खेळे ॥३॥ हातीं पडे तोची ढाग ॥ दम पुरे तो खेळिया चांग ॥४॥ मागें पुढें पाहे तो जिंके ॥ हातीं पडे तोचि अधार फीके ॥५॥ आपल्या बळें खेळ रे भाई ॥ गडी याची सांडोनि देई ॥६॥ तुका म्हणे मी खेळिया नव्हे ॥ जिकडे पडे त्याचीं सवे ॥७॥

१२९ हुतुतु २ रा

हुतुतु हुतुतु गड्या ॥ खेळं हुतुतु हुतुतु गड्या ॥धृ०॥ राम कृष्ण गोविंद हरि नारायण ॥ नित्य त्याचें भजन करा रे ॥१॥ हिरण्यकश्यप प्रल्हाद पुत्र खेळतां ॥ आला हात घाईरे ॥ स्तंभ फोडुनी बाहेर निघाला ॥ पित्या दिधली ढाही रे ॥२॥ राम रावणा सन्मुख भिडतां ॥ बरवा खेळ मांडिला रे ॥ कुंभकर्ण इंद्रजित आखिया ॥ त्यानीं दिधली ढाही रे ॥३॥ कौरव पांडव समरांगणीं ॥ खेळिया चक्रपाणीरे ॥ काम क्रोध जीवें मारा ॥ त्यानीं दिधली ढाही रे ॥४॥ एका जनार्दनीं हुतुतु खेळतां ॥ मग रंगणीं पाहीरे ॥ एकसें हुतुतु त्यांनीं बांधिले ॥ पूर्वी दिधली ढाही रे हुतुतु० ॥५॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitizagtion by eGangotri

१३० भोंवरा

खेळ भोंवरा ग बाई भोंवरा ।। राधिकेचा नवरा ।। धृ० ।। माझ्या भोंवऱ्याची अरी ।। सप्त पाताळ त्यावरी ।। फिरे गरगरा ।। राधिकेचा नवरा ।। खेळ भों० ।।१।। भोंवरा बनला निर्गुणी ।। त्यावर चंद्रसूर्य दोनी ।। जाळी शंकरा गवरा ।। राधिकेचा नवरा ।। ।। खेळ० ।।२।। एकाजनार्दनीं खेळिया ।। भोंवरा खेळून पाहे चेलिया ।। नाद देतो हरिहरा ।। राधिकेचा नवरा ।। खेळ भों० ।।३।।

१३१ टिपरी

दोनी टिपरी एकचि नाद ।। सगुण निर्गुण नाहीं भेदरे ।। कुंसरी आंगे मोडतील परी ।। मेळविती एका छंदे रे ।।धृ०।। काहींच नजें वाया रे ।। खेळिया एकची बळवंत अवधीयारे ।। सम विषम तेथें होऊंच नेदी रे ।। तेच जाणऊनि आगळिया रे ।।१।। संतमहंत सिद्ध खेळतील घाई ।। तेच सांभाळी माझ्या भाई रे ।। हात राखोन हाणिती टिपऱ्या ।। टिपऱ्या मिळोन जाय त्याची सोई रे ।।२।। विटाळाचे अवघे जाईल वायां ।। काय ते शृंगारुनि काय रे ।। निवडुनि बाहेर काढिती निराळा ।। जो न मिळे संताच्या घाईरे ।।३।। प्रकारचें काज नाहीं सोडि लाज ।। निःशक होऊनियां खेरी रे ।। नेणती नेणतीच रे एके पावली मान विठ्ठल नामाचिया बळें रे ।।४।। रोमांच गुढिया डोलविती अंगें भावबळें खेळविती सांगें रे ।। तुका म्हणे कंठ सद्गदीत दाटे ।। या विठोबाच्या अंग संगें रे ।।५।।

१३२ एकीबेकी

एकी बेकी पोरा सांग झडकरी ।। एकी म्हणतां जिंकिसी बेकी म्हणतां हारी ।।धृ०।। नव्हे कांई बाई तेंथें झालें एक शून्य ।। त्यासीं फाटा फुटतां गम लेखा आले जाण ।। एकी बेकी० ।।१।। एक दोन तीन पांच विस्तारिला जाण ।। दहा पासुनी सहस्त्रावारी एक झाला पूर्ण ।। एकी बेकी०।।२।। एक ब्रह्म पूर्ण तेथें फाट झाली माया ।। एकाजनार्दनीं नित्या लक्ष लावी पायां ।। एकी बेकी० ।।३।।

Dr. Urmila Sharma Collection, Varahasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

१३३ हमामा १ ला

हमामा पोरा हमामा घुंबरी वाजे घमामा ॥ धृ०॥ हमाम्याचे नादानीं ॥ घुंबरी वांजली रानीं ॥१॥ हमाम्याची सीतळ साई ॥ पोरा मेली तुझी आई ॥२॥ काम क्रोध पोरा नाशी ॥ अहंकार तोंड वासी ॥३॥ बाप रखुमादेवीवरांशीं ॥ पोरा पहिल्या गांवां जासी ॥४॥

१३४ पिंगा

निराकाराचा आकार झाला ॥ त्यांतच माझा पिंगा जन्माला ॥ निराकारासी घेऊन आला ॥ माझा पिंगा घालितो धिंगा ॥धृ०॥ पिंग्यापासून शंकर झाला ॥ ढवळ्या नंदीवर बसून आला ॥ माझ्या पिंग्यानें धक्का दिला ॥ माझा० ॥१॥ पिंग्यापासून मच्छ झाला ॥ शंखासुराचा प्राण घेतला ॥ चारी वेद घेऊनी आला ॥ माझा० ॥२॥ पिंग्या पासून कूर्म झाला ॥ पर्वत पाठीवर घेतला ॥ चौदा रत्नें घेऊन आला ॥ माझा० ॥३॥ पिंग्यापासून वराह झाला ॥ हिरण्याक्षाचा प्राण घेतला ॥ पृथ्वीवरती घेऊन आला ॥ माझा० ॥४॥ पिंग्यापासून नरसिंह झाला ॥ हिरण्यकश्यप दैत्य वधिला ॥ प्रल्हाद भक्त रक्षिला ॥ माझा० ॥५॥ पिंग्यापासून वामन झाला ॥ बलीदान मागूं आला ॥ बळी पाताळीं घातला ॥ माझा०॥६॥ पिंग्यापासून भार्गव झाले ॥ मातेचें शीर छेदियेलें ॥ अवघे राजे नाहींसे केले ॥ मा० ॥७॥ पिंग्यापासून राम झाले ॥ पितृवचन संभाळिलें ॥ रावण कंभकर्ण मारिले ॥ मा० ॥८॥ पिंग्यापासून कृष्ण झाला ॥ कंसाचा प्राण घेतला ॥ गोकुळ सोडून मथुरेसि आला ॥ मा० ॥९॥ पिंग्यापासून बौद्ध झाला ॥ दिलें जगन्नाथ नांव त्याला ॥ भक्तांना दहींभात चारला ॥ मा० ॥१०॥ ऐसा निराकाराचा पिंगा ॥ त्यात माझा श्रीरंगा ॥ एका जनार्दनी पांडुरगा ॥ माझा पिंगा घालितो धिंगा ॥ माझा० ॥११॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

१३५ घोंगडें

वांकडा म्हणें कृष्णाच्या बापा मी एक देखिलें भूतरे ।। त्याचें बीज पहिलें जळोनी गेलें शेषित राहिलें किंचित रे ।। देहेंवीण छळतो येथेंच पिडतो त्या ठायीं असें मलमूत्र रे ।। तेणें जिंकलें कोण कोणतें त्यासीं जिंकणार कोणता रे ।।१।। घोंगडे माझें बोलणें कान्होबा ।।घों० ।।धृ०।। जुनाट जोगडा काळाचा कां कडा डोंगरी राहतो भोळा रे ।। झडपिला हवें नागवाचि धांवे पाठी लागला भिल्ल भौंडा रे ।। कर्दळी खोंपा उघडुनि झेंपा पाहून भुलले तोंडारे ।। जग आंधारी महा भेसुरी आपादियाया चालला लोंढारे० ।।२।। कल्लोळ हाडाचा बाप चाहडाचा अखंड घडतो मलकीरि ।। त्यासी एक बहु संचार झाला हिमालयाचे खडकीं रे ।। बहु वैऱ्याची नवरी पाहून जिवांत भरली धडकी रे ।। कोणें एके वेळीं पाठि लागली भेडसाविलें कडकीं रे ।। घों० ।।३।। नंगाची खादी नंगाची दंडी अती हाडाचा ढेंगा रे ।। त्यासी एक बहु संचार झाला येऊनि जडला अंगा रे ।। सुता आनंदाचा परानंगीचा चीरी फेडतो कांगा रे ।। त्यांसी एक पुढें वृक्ष भेटला डांगांनी मोडल्या डांगा रे ।। घों० ।।४।। गंगा मादारीं सांगली बरीर मला तपोवगरि ।। त्यासी एक पुत्र जळीं जन्मला त्यानें केलीं अठरा वर्षे रे ।। कुरंगिणीचें पाडस धुविलें मिरविलें अयोध्या पुरी रे ।। घों० ।।५।। डोळियाच जवळी द्विज जन्मला तेंचि त्याचें वाहन रे ।। बाप परासी एक तोंडानीं आगळी तारकाई केली हननरे ।। शैल्य आत्मज सौतिच्या तन्या तुझ्या त्या हातीचें मरण रे ।। दिवानदारी जो कां रमला नातवंड त्याचें गमन रे ।। घों० ।।६।। लंगोट बंधन दुगातसे पुढें अंजनी जिस फाळतोंडारे ।। रातीतुन जणें शेपटीशीं बांधून संकटीं आणिला धोंडारे ।। त्रिभुवनासी तो देवऋषी बाप ज्याचा चौतोंडा रे ।। सोळा सहस्त्र नारी भोगुन ब्रह्मचारी म्हणविशी लंडा रे ।। घों० ।।७।। बाकडा याने आणा घातला जाणा उकलील बिरळागुदतुरे ।। आठ पदांची अष्टपदी गाईली तो एकास अद्भुत रणपदा रे ।। पदाचा अर्थ करितो तो एक असे बहुश्रुतरे ।। एका जनार्दनीं विनवितसे भूत नव्हे कान्होबाचें सूत रे ।। घों० ।।८।।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

१३६ फुगडी १ ली

खेळ ग फुगडी नको जाऊं तूं रडी ॥धृ०॥ फुगडी खेळ ग पिंगा ॥ आलीस माझ्या संगा ॥ फुगडी खेळ रे श्रीरंगा ॥ सोडुन धांगडधिंगा ॥ खेळ० ॥१॥ फुगडी खेळ गे फेराची ॥ हो बाईल दीराची ॥ लज्जा सांड गे मनाची ॥ गांवच्या लोकांची ॥ खेळा० ॥२॥ फुगडी खेळ गे लाखोटा ॥ धर माझा आंगोठा ॥ बळकट घालीगे कांसोटा ॥ सोडून चारी वाटा ॥ खेळ० ॥३॥ फुगडी खेळ गे शिवशक्ति॥ हरिनामाची भक्ति तुकया स्वानदें गर्जति ॥ द्रौपदीच्या कीर्ति ॥ खेळ० ॥४॥

१३७ फुगडी २ री

फुगडी फू बाई फुगडी फू ॥ धृ०॥ फुगडी फू ॥ सवती माझे तूं ॥ हगून भरलें धू ॥ तुझे ढुंगणावरी थू ॥१॥ फुगडी घेतां आलें हरि ॥ चल उठ जाऊ लौकरी ॥ हातपांय बम्बाळ जातीं ॥ ढुंगण घोळतां लागे माती ॥२॥ सरला दम पांगले पाय ॥ अजुन तरीं घोळसी जाय ॥ तुका म्हणे अजुन तरी ॥ हरी भजन नित्य करीं ॥३॥

१३८ फुगडी ३ री

फुगडी फू बाई फुगडी फू ॥धृ०॥ फुगडी घालितां उघडीं राहे ॥ लाज सोडोनीं एका एकीकडे पाहे ॥१॥ फुगडीच अवघे मोडी रे ॥ तरीच गोडी संसार तोडी रे ॥२॥ मागें जैसी केलिस होती पोटी ॥ ते उच्चारुनि उच्चाची होटी ॥३॥ त्रिगुणाची वेणी तुझे उडते पाठी ॥ सांवरोनि धरी घाली मूळबंदी गांठी ॥४॥ आगळें पाऊल जिंकी एका एक ॥ पावला मान हे मानवति तिन्ही लोक ॥५॥ तुका म्हणे तुजमध्यें एक भाव ॥ समतुकें भार पाऊं पावो उंच ठाव ॥६॥

१३९ फुगडी ४ थी

फुगडी फू ॥ बाई फुगडी फू ॥धृ०॥ एक नाम मांडिबाई द्वैत नाम सांडी ॥१॥ निजब्रह्म बाई परब्रह्म तूं गे ॥२॥ हरी आला रंगा बाई ॥ वैष्णवाच्या संगा ॥३॥ चित्तमळ धू गे बाई विषयावरी थू गे ॥४॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ज्ञानदेवा फुगडी ॥ बाई संसार उघडी ॥५॥

१४० हमामा २ रा

हमामा रे पोरा हमामा रे ॥ हमामा घालितां थकलें पोर ॥ करी येरझार ॥ चौंऱ्याशींची ॥धृ०॥ पहिले पाहारा रंगासि आलें सोहंसे बार बेतलें ॥ देखोनि गडी ते विसरले ॥ ठाई पडले आपणचीं ॥१॥ दुसऱ्या पाहारा महा आनंद ॥ हमामा घाली छंद छंदें ॥ दिस वाढे तों गोडवाटे ॥ परि पुढें नेणें पोर काय होतें तें ॥२॥ तिसऱ्या पाहारा घेतला बार ॥ अहंपणे पाय न राहे स्थीर ॥ सोस सोस करिता ठाई पडसी ॥ सत्य जाणे हा निर्धार ॥३॥ चौथा पाहारा हमामा ॥ घालिसी कांपविसी हातपाय ॥ सुऱ्या पाटलाचा पोर यम ॥ त्याचे पडशील डाई ॥४॥ हमामा घालितां भ्याला तुका ॥ त्यानें सांडिली गड्यांची सोई ॥ यादवांचा मूल एक विठोबा ॥ त्यासवें चारितो गाई ॥५॥

१४१ हुंबरी

तुझी कोण घाली हुंबरी ॥ साही पांगल्या अठरा चारी ॥ सहस्त्र मुखावरी हरी ॥ शेष शिणविले ॥धृ०॥ चेंडुवासवें ॥ घातली उडी ॥ माथिला काळिया देऊनि बुडी ॥१॥ अशुद्ध पीतां करुणा नाहीं ॥ तुवां मावशीही मारियेली ॥२॥ रावणाचें घर बुडविलें सारें ॥ त्याचीं रांड पोरें मारियेली ॥३॥ जाणों तो ठावा आहेसि आम्हां ॥ तुवां आपला मामा मारियेला ॥४॥ याशीं खेळतां नाश थोरू ॥ तुकयास्वामी सारंगाधरू ॥५॥

१४२ लखोटा

लये लये लखोटा ॥ मूळबंदी कांसोटा ॥ भाव केलें सोहं ॥ आता माझें पाहें ॥१॥ हातोहातीं गुंतली ॥ जीवपणा मुकली ॥ क्षीर माझा निका ॥ सांडि बोल फिका ॥२॥ अंगिकारी हरी ॥ नको पडो फेरी ॥ लाज धरीं भांडे ॥ जगझोडी राडे ॥३॥ बैस भावापाठीं ॥ ऐक माझ्या गोष्टी ॥ केला सांडीं गोहो ॥ येथें धरीं मोहो ॥४॥ पाठमोरा डौल ॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आवरीं तें बोले पांगलीसे बाळा ॥ पुढें अवकळा ॥५॥ आतां उभी ठायीं ॥ उगा उभी पाहीं ॥ नको होऊ डुकरी ॥ पुढें गाढव कुतरी ॥६॥ नाम केलें खरें ॥ आपुलें म्या बरें ॥ तुका म्हणे येरी ॥ पांगविल्या पोरी ॥७॥

१४३ कोडें

कोडें रे कोडें ऐका हें कोडें ॥ उगवूनि फार राहें गुंतोनियां थोडें ॥धृ०॥ पुसतसे सांगा मी हें, माझें ऐसें कोई ॥ रुसूं नका मुगवे तो भोगी आपुली आई ॥१॥ सांगतों हें मूळ कांहीं न धरावी खंती ॥ झालें जीवो मेलें मरो प्रारब्धा हातीं ॥२॥ तुका म्हणे अभिमान सांडावा सकळीं नये अंगावरी वायां येऊं देऊं कळी ॥३॥

१४४ जगझोडी

मी जगझोडी ग जगझोडी ॥ नांव ठेविलें लाडी ॥धृ०॥ पाळ मांडिला वेसीपाशीं ॥ आला गेला भोगितो मशीं ॥ मी जग झोडी० ॥१॥ नाहीं लागती अडका रूका ॥ काम लाटा फुकाचें ॥ मी जग झोडी० ॥२॥ एका जनार्दनीं जोडी ॥ त्याची संगती मी न सोडी ॥ बाई मी जग झोडी० ॥३॥

१४५ झोंप

उठा जी मायबाय कशी लागली झोंप ॥ हुजूर जाउनियां येवढी चुकवा खेप ॥धृ०॥ रात्रंदिवस तुम्ही सावध असा ॥ तुमच्या नगरीचा आम्हां नाहीं भरवंसा ॥ ऊजेड पडतां गळां पडेल फांसा ॥१॥ तुमची नांदणूक आम्हां दिसेना बरी ॥ तुमच्या शेजारीं हो एक मूळ वाद करी ॥२॥ हिंडतां देशांतरीं लक्ष चौऱ्यांशीं जागा ॥ अजून आठवेना आला मूळच्या मार्गा ॥ महाराच्या बोलण्याचा तुम्हां येईल रागा ॥३॥ मागल्या ठेवण्याचा कांहीं ऐवज काढा ॥ त्याचे सत्तेनें आम्हीं बोलूं घडघडा ॥ एकाजनार्दनीं धरा बळकट मेढा ॥४॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

१४६ कृष्णाई कान्हाई

विठाई विठाई माझे कृष्णाई कान्हाई ॥ रंगा येईहो येई ॥धृ०॥ वैकुंठवासिनी विठाई जगत्रयजननी ॥ तुझा वेधु माझे मनीं ॥ रंगा येई हो ॥१॥ कटीं कर विराजित मुकुट रत्नजडित ॥ कांसे कसिला पितांबर ॥ तैसा येई धांवत ॥ रंगा येई हो येई ॥२॥ विश्वरूप विश्वंभर ॥ कमलनयन कमलाकर ॥ तुझें ध्यान लागो बरें ॥ बाप रुक्मादेवीवर रंगा येई हो येई ॥३॥

१४७ मोतीं

धुतांच मोतीं जळीं हरपलें मोठें सखील पाणी ॥ चला पाहूं सहा चार अठराजणीं ॥धृ॥ प्रपंच धोंडा मृगजळ पाणी आपटित होतें चोळी ॥ विसरलें सुख घसरलें तळी ॥ सखे मायेनें मोतीं दडविलें भवसिंधूच्या जळीं ॥ होतीं गडे भ्रांता बहिण चवळी ॥ तिनेंच मजला गोष्टि विनविल्या चित्त गेलें भुलोनी ॥ चला पा० ॥१॥ आठजणीनीं मोती दडविलें वर ठेविला धोंडा ॥ अशाच पाहती अवघ्या रांडा ॥ बारा सोळा तळीं उतरल्या त्यांनीं धरिला दांडा ॥ ठाऊक सतराविला झेडा ॥ त्यामध्यें मी गर्क झाल्यें येकलीच बाई बनीं ॥चला पा० ॥२॥ चवघीजणीं सत्वर मिळोनी डोळीं अंजन घाला ॥ माझ्या मोत्याला प्रेमें न्याहाळा ॥ ज्ञानबोधाची लावून दिवटि वरली वात ऊजळा ॥ माझे मोत्याला सर्व कळा ॥ प्रपंच पडदा फाडुन गुरुपदी लावावे ठिकाणीं ॥ चला पा० ॥३॥ चौघींजणीं मोक्षनाइका मजला धरा हातीं ॥ उतरा सागर पैलपंथीं ॥ या मोत्याच्या साठीं मजला जाणें आहे सती ॥ म्हणुन मीं येतें काकुळती ॥ ज्ञानदेव म्हणे चिन्मयमोतीं ना मिळे गुरु वांचुनी ॥ चला पा० ॥४॥

१४८ जोहार १ ला

जोहार मायबाप जोहार ॥ मी विठोबा पाटलाचा महार ॥ सांगतों सारासार विचार ॥ ऐका कीं जी मायबाप ॥१॥ गांव तो पाचा पाटलाचा ॥ पंचवीस प्रजाचा ॥ येथें सहा जणाचा कारभार ॥ कीं जी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मायबाप ॥२॥ ज्या धन्याचें हे शहर ॥ त्या धन्यासी जोहारा ॥ अवघा ओढिती कारभार ॥ ऐजीकडे कीं जी मायबाप ॥३॥ ऐजीची चाली फार ॥ सारा ओढिताती कारभार ॥ परि सहा जणांसी आधार ॥ ऐसीचाच कीं जी मायबाप ॥४॥ बाप तुम्ही धन्यासी राजी राखा ॥ नाहींतरी शेवटीं होईल वाखा ॥ मग कोणी नाहीं सखा ॥ सोडविता कीं जी मायबाप ॥५॥ कामाजी बाजी हूद्देदार ॥ क्रोधाजी हे सरदार ॥ याचे वेगळाले विचार ॥ ऐका कीं जी मायबाप ॥६॥ मदाजी बाजीचीं वेगळें बंड ॥ त्यासीं मिळाला लोभ भावंड ॥ अवघ्यांनी मिळोनी थोतांड ॥ रचिलें कीं जी मायबाप ॥७॥ गांव तो होता चांगला ॥ परी या सहा जणानींच नाश केला ॥ तुम्हीही त्यासीं मिळालां ॥ हें बरें काय जी मायबाप ॥८॥ परी ते राहतिल एकीकडे ॥ शेवटी गांठ तुम्हासींच पडे ॥ मग इकडे ना तिकडे ॥ होना कीं जी मायबाप ॥९॥ ऐजीनें यांस कारभार दिला ॥ यानींच गांवचा नाश केला ॥ शेवटीं खाईल तुम्हाला ॥ हें बरें की जी मायबाप ॥१०॥ गावांतील तीन पांच थोर ॥ पंचवीस त्याचा विस्तार ॥ घडी घडी त्याचा समाचार ॥ घेत जावा कीं जी मायबाप ॥११॥ रयतेचें फार हित करावें ॥ धन्याचे कामासीं रुजू असावें ॥ लागतें कीं जी मायबाप ॥१२॥ तुम्हास धन्यानें दिला गांव ॥ तुम्ही विसरलां त्याचें नांव ॥ तबल आलिया लपवांया ठाव ॥ मग कैंचा जी मायबाप ॥१३॥ तुम्ही धन्यासी करितां चोरी ॥ एजीकडे करी येरझारी ॥ परी या सहाजणांसी सारी दोरी ॥ तुमचीच कीं जी मायबाप ॥१४॥ परी जेव्हां होईल ठावें ॥ तेव्हा कळों येईल स्वभावें ॥ घडी घडी आपुलें हत करावें ॥ लागलें की जी मायबाप ॥१५॥ जेव्हां तबल होईल धन्याची ॥ तेव्हां तुम्हां मुदत कैंशीं ॥ म्हणोनि दहाजणांची ॥ भीड धरूं नका कीं जी मायबाप ॥१६॥ आतां ऐजीची अस्था सोडा ॥ धन्याची बाकी हळूहळू झाडा ॥ नाहींतरी पायीं पडेल खोडा ॥ प्रपंचाचा कीं जी मायबाप ॥१७॥ आतां असो आधी उपाधी ॥ धन्याची भेट घ्यावी आधीं ॥ तें मी सांगतों सुबुद्धी ॥ ऐका कीं जी मायबाप ॥१८॥ परि मी लहानसा दिसतों

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

महार ॥ मजवरी धन्याचा मुखत्यार ॥ बहुत धन्याचा प्यार ॥ मज नफरावर कीं जी मायबाप ॥१९॥ सद्भाव शांतिसी घ्यावें ॥ मज पाठीशीं तुम्ही असावें ॥ जेथें धणी ये तें घर ठावे ॥ मज नफरास कीं जी मायबाप ॥२०॥ श्रवणासी धरावी वाट ॥ कीर्तनाचा चालवावा घाट ॥ विष्णुस्मरणाचा संघाट ॥ आहे कीं जी मायबाप ॥२१॥ पुढें आहे विश्रांतीचें स्थान ॥ सज्जनाचें पाय सेवन ॥ दास्यत्व अर्चन वंदन ॥ ध्यान मार्ग कीं जी मायबाप ॥२२॥ तेथें आतां नलगे उशीर ॥ समीप जनार्दन दातार ॥ सखया भक्तीचें मंदिर ॥ आहे कीं जो मायबाप ॥२३॥ पुढें आहे धन्याचें घर ॥ तेथें जाऊन करावा जोहार ॥ जवळीचा कीं जी मायबाप ॥२४॥ जेव्हां भेटी होईल धन्याची ॥ तव नित्य दिवाळी सुखाची ॥ मग सर्व सत्ता तुमची ॥ होईल कीं जी मायबाप ॥२५॥ जेथें आहेत धनी तेथें जावें लोटांगणीं ॥ मग स्वतांच होईल मिळणी ॥ अल्पसुखाची कीं जी मायबाप ॥२६॥ या मार्गें गेले थोर थोर नारदादि शुकेश्वर ॥ धन्याचे दरबारीं निरंतर ॥ रहातात कीं जी मायबाप ॥२७॥ जे जे या मार्गीं गेले ॥ धन्यासी रुजूं झाले ॥ जीव मुक्ति पावले ॥ ऐका कीं जी मायबाप ॥२८॥ जोहार मायबाप जोहार ॥ गव्हाची रोटी दुधाची धार ॥ धन्यानी पुरवावी अपार ॥ मज नफरास कीं जी मायबाप ॥२९॥ महार बोलतो म्हणोन नका जाऊ गर्वें ॥ नाहीं तरी शरीर राहील हिरवे ॥ आपुलें स्वहित होईल बरवें ॥ तें करावें कीं जी मायबाप ॥३०॥ बाकीसाठीं आपली मूळ भुई सोडाल ॥ पर मुलखा जरी जाल ॥ तरी बाकीचा निकाल ॥ नाहीं कीं जी मायबाप ॥३१॥ धरा भावभक्तीची कुळवाडी ॥ काढा शेतांतील पेढी ॥ नाहींतर पायीं पडेल बेडी ॥ अविद्येची कीं जी मायबाप ॥३२॥ हे कायापूरनगरी ॥ ब्रह्म्यानें रचिली खरी ॥ म्यां विवेकें जाणूनी बरी ॥ मना मिळाली कीं जी मायबाप ॥३३॥ एका जनार्दनीं कुळवाडी मोठा ॥ त्यानें बाकीस मारिला फांटा ॥ अखंड कैलासींचा दारवंटा ॥ मोकळा गेला कीं जी मायबाप ॥३४॥ अखंड कैलासीं राहणें ॥ गुरुजनार्दनाचें हेंच देणें ॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सुख समाधी असणें ।। ऐका कीं जी मायबाप ।।३५।।

१४९ जोहार २ रा

जोहार मायबाप जोहार ।। पाटील पांढे जोहार ।। देसाई देशमुख जोहार ।। कां जी ये सरदार ।। कोंडून राखिलें कीं जी मायबाप ।।१।। उघडा उघडा नेत्रांची ब्रह्मकवाडें ।। ऐका धर्म रायाचे प्रेमनिवाडे ।। जाणें चुकलें जन्ममरणाचें सांकडें ।। इमारतीचीं लाकडें ।। रानोमाळ होतील कीं जी मायबाप ।।२।। खडी फरज धर्मराज खरा ।। तेणें कुलिशा मारून केला चुरा ।। माझे धन्याचे घरा ।। कधीं कधीं येत जा कीं मायबाप ।।३।। अकाबाई सावकारीण मोठी ।। कायापुर नगरीं केली खोटी ।। तिनें तर पाडिली भल्यासि तुटीं ।। तेथें तुमचें काय चाले कीं जी मायबाप ।।४।। व्याही जांवयासी म्हणे लेकरा ।। त्यासी वाढिताती तुप साखरा ।। मला देखुन लपतां एकसरा ।। अंतकाळीं चाकर मीच कीं जी मायबाप ।।५।। जांवयासी वाढी तूप लई ।। मला म्हणतां उरलें नाहीं ।। घर बुडालें याच पायी ।। प्रत्यक्ष ग्वाही मीच कीं जी मायबाप ।।६।। सकाळ कोणी जांऊ नका ।। मागील बाकी ठेऊं नका ।। नाहक एकदा धका ।। बैसेल कीं जी मायबाप ।।७।। अविद्या खिडकीवाटे गेला ।। तो यमदूतें धरोनि नेला ।। लक्ष चौऱ्याशीं मारथीं मारयिला ।। आईका कीं जी मायबाप ।।८।। झाडाल बाकी तर तुम्हीं व्हाल सुखी ।। हें सत्य सत्य तिन्हीं लोकीं ।। झेंडा नौबत लावा कीं जी मायबाप ।।९।। एकाजनार्दनीं महार बोले ।। नका जाऊं गर्वे ।। मारितां अंग होईल हिरवें ।। सांगतों बरवें कीं जी मायबाप ।।१०।।

१५० जोहार ३ रा

जोहार मायबाप जोहार ।। मी तो एकनाथ महार ।। लहानसा महाराचा पोर ।। माझे बोलण्याचा विचार ।। दुसरा नाहीं कीं जी मायबाप ।।१।। माझ्या बोला ऐकिजे ।। मोठे उमराव राजे ।। तुम्हीं कां जीवाजी न जाणतां ।। वेळे संदेह धरितां कीं जी मायबाप ।।२।। चैतन्य

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

चावडीचा पहारा ॥ कीं मी मिरशी महार ॥ जेव्हां नव्हता गांवचा अवतार ॥ मज ओळख नाहीं कीं जी मायबाप ॥३॥ कायापुरचा अचाट पाया ॥ यां माजी झाले वेहयां ॥ त्यापुढें पाहतो पळाया ॥ मनाजी संगें मिळालें खाया ॥ परित्राहीं दाट कीं जी मायबाप ॥४॥ पेढ्या केल्या शरिराच्या ॥ खोडे गाई चारितां घराच्या ॥ चोप बसतील यमाजीच्या ॥ मग कोण ती सोडवील कीं जी मायबाप ॥५॥ बाराजणे फुगविल गाल ॥ शेवटीं तुम्हींच बांधिले जाल ॥ तुमचे होतील बेहाल ॥ तेव्हां तुम्हास कोण सोडविल कीं जी मायबाप ॥६॥ सारे कडेचे पोहणारे ॥ दहा आणि पांच पोरें ॥ एकनाथ करितो जोहार ॥ अक्कल धरा कीं जी मायबाप ॥७॥

१५१ जोहार ४ था

जोहार मायबाप जोहार ॥ माझें नांव विठनाक महार ॥ सांगतो ऐका एक विचार ॥ तो बळकट धरा जी मायबाप ॥१॥ गांव पाच पंचवीस प्रजेचा ॥ तेथें कारभार सहाजणांचा ॥ तो ऐकिजे मायबाप ॥२॥ ज्या धन्याचे पदरीं शेर ॥ त्यासीं नाहीं कधीं जोहार ॥ अवघा आहे जीचा कारभार ॥ काम करितो कीं जी मायबाप ॥३॥ आबाजीनीं हवालीं केला गाव ॥ धन्याचें विसरला नांव ॥ तलफ आल्यावरी ठाव ॥ पळावया कैचा कीं जी मायबाप ॥४॥ जेव्हां तलफ लागे बाकीची ॥ तेव्हां तुम्हां आम्हां सुखद कैची ॥ म्हणवूनियां सहाजणांची ॥ भीड धरूं नका कीं जी मायबाप ॥५॥ सहाजणें राहतील एकीकडे ॥ गांठ तुम्हा आम्हासीच पडे ॥ मग कोणी इकडे तिकडे ॥ हालों न देती कीं जी मायबाप ॥६॥ करा भक्तिची कुळवाडी ॥ धरा हरिनामाची गोडी ॥ नाहीं तरी चौऱ्यांशींची बेडी ॥ पायीं पडेल कीं जी मायबाप ॥७॥ तेथील मार्ग सपाट ॥ विष्णुलोकीं वाजवा घांट ॥ मग घुडघुडा वाट ॥ धांवाल कीं जी मायबाप ॥८॥ एका जनार्दनीं कुळवाडी मोठा ॥ तेणें बाकीस मारला फांटा ॥ उपडा केला दारवंटा ॥ कैलासींचा कीं जी मायबाप ॥९॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

१५२ जोहार ५ वा

जोहार मायबाप जोहार ॥ तूं कोण गांवींचा महार ॥ पुसाल जरी साचार ॥ तरी सादर परिसा कीं जी मायबाप ॥१॥ माझा निराकार मुळींचा ठिकाण ॥ भक्तांसाठीं सोडिला जाणा ॥ वस्ती करूं कायापुरींच्या खुणा ॥ सांगेन कीं जी मायबाप ॥२॥ आणि जोहार जी मायबाप जोहार ॥ मी पार्वतीचे गळ्यांतील हार ॥ ईश्वराचा पूर्णभार ॥ त्याचा करितों कारभार ॥ मज नफाराचे शिरीं कीं जी मायबाप ॥३॥ अखंड द्वारी पडिला असतों ॥ प्रेमाचा तुकडा मागून खातों ॥ धन्याला दुवा देतों कीं जी मायबाप ॥४॥ तुम्हीं मुळीचा ठाव सोडूं नका ॥ विसरल्या पावाल धका ॥ अंतकाळीं कीं जी मायबाप ॥५॥ वस्ती भरूं आम्ही साचे ॥ समस्त कुळवाडी नगरीचे ॥ पैसे टाका धन्याचे ॥ बाकी थकवूं नका कीं जी मायबाप ॥६॥ असामी बारा दिधली ॥ शेवटीं द्वाही विझाली ॥ ज्ञानदेवीं आज्ञा केली कीं जी मायबाप ॥७॥

१५३ जोहार ६ वा

जोहार पाटीलबाजी ॥ चावडी चलागा कीं जी ॥ ऐसें सांगत आलों आजी ॥ बाकी नका थकवूं कीं जी मायबाप ॥१॥ खोपटा माजी तळपती गाय ॥ हाडाची बेडी पडेल पाय ॥ तोंड चुकवितां जाय ॥ मग वाचूनी काय कीं जी मायबाप ॥२॥ काढीता गांवची गुरें ॥ कां बुजविता गांवचीं द्वारें ॥ गस्त पाठवा वरी स्वरें ॥ कांहीं उणें पुरें करू नका कीं जी मायबाप ॥३॥ अंवदा आली देवाची पाळी ॥ तेव्हांच तोंडें करतां काळीं ॥ चावढी चला हेच वेळीं ॥ शिव्यागाळी कांहीं घेऊन नका कीं जी मायबाप ॥४॥ कुळकर्णी आपले स्वाधीन करा ॥ आड खर्चाचा ताळा धरा ॥ चित्त हरिनामीं धरा ॥ येईल मजुरा असतत्व कीं जी मायबाप ॥५॥ विठू पाटलाचा महार ॥ चोखामेळियाचा जोहार ॥ सकळ संताचा कारभार ॥ मज नफराचे शिरीं कीं जी मायबाप ॥६॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitization by eGangotri

१५४ जोहार ७ वा

जोहार मायबाप जोहार ।। मी अविद्या नगराचा महार ।। साचार माझें नोहे नगर ।। आकारास आलें कीं जी मायबाप ।।१।। या सहा चाकर ठेविले ।। ते माझे बळें वर्तत वहिलें ।। मला गांजिती बळें ।।अन्याय नसतां कीं जी मायबाप ।।२।। तुम्ही अवघे एकत्र झालां ।। माझें घर मोडायाचा मनसुबा केला ।। जरी माझी अगत्य असेल धन्याला ।। तरीच मजला ठेविल कीं जी मायबाप ।।३।। तुम्ही अवघे संत सज्जन ।। रूपीं मिळालां परिपूर्ण ।। म्हणून माझें हेळण ।। करितां कीं जी मायबाप ।।४।। एका जनार्दनीं म्हणे देवा ।। अविद्येचा संग मज नसावा ।। जन्ममरणाचा ठेवा ।। चुकवा कीं जी मायबाप ।।५।।

१५५ जोहार ८ वा

आजि मायबाप करितों मी जोहार ।। आला एकसर सांगावया ।।१।। आजि मायबाप तुम्ही बाकी झाडा ।। नाहींतरी खोडा घालू म्हणती ।।२।। फाकूं नका कोणी रुजू झाल्यावांचुनी ।। सांगा कीं जी चला घरधन्या ।।३।। तुका म्हणे तुम्ही करूं नका बोली ।। अखेरचे सालीं झाडा घेती ।।४।।

१५६ जोहार ९ वा

जोहार मायबाप जोहार ।। तुमच्या महाराचा मी महार ।। भुक भुक्यालों मी घालों ।। तुमच्या उष्ट्यासाठीं आलों ।। तुमच्या उष्ट्याची मज आस ।। तुमच्या दासाचा मी दास ।। चोखा म्हणे मी आणिली पाटी ।। देवा तुझ्या उष्ट्यासाठीं ।।१।।

१५७ मांग

हयात मायबाप हयात ।। गांव असतां वोस पडलें ।। घर असता जळून गेलें ।। जोडे असतां काटे मोडले ।। ते माझ्या जाळींत सांपडले ।। हयात मायबाप हयात ।।१।। गांवचे पाटील मरून गेले ।। त्याच नारीनें चुडे भरिले ।। त्याचे वाड्याचे बुरुज ढांसळले ।। तें पोर पोरीस सांपडलें ।।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

हयात मायबाप हयात ॥२॥ एकाजनार्दनीं मांग ॥ पाहिल आपुलें नारीला सांग ॥ सांगितलें तर काय ॥ नाहीं तर उफराट्या झाडासी टांग ॥ हयात मायबाप हयात ॥३॥

१५८ कृष्णाबाई व रमाबाई

अयोध्येचा ओ देव्हारा ॥ आला अहंकाराचा वारा ॥ डोळे फिरवी गरगरां ॥ मानवी कृष्णाबाई मानवी ॥१॥ रमाबाईचा घरचारू ॥ चौघाजणांचा विचारू ॥ सहा चहूं आठरांचा भडिमारू ॥ मानवी ॥ कृ० ॥२॥ रमाबाईचा शेला ॥ दामाशेटीं विणविला ॥ तिजलानींच पांघरविला ॥ मानवि कृष्णा० ॥३॥ येथून जाहला सोहळा ॥ रमाबाईला वो बाळा ॥ एकाजनार्दनीं ओंवाळा ॥ मावनी कृ० ॥४॥

१५९ दसरा

पवित्र सुदीन दिवस उत्तम दसरा ॥ सांपडेल तो साधा आजि मुहूर्त बरा ॥ गर्जा जयजयकारहरी हृदयीं धरा ॥ आळस नका करूं सांगतों लहान थोरां ॥ याहो बायांनों निघाले हरी ॥ सीलंगणा वेगीं घेऊनि आरत्याकरीं ॥ ओंवाळूं श्रीमुख वंदीं पाउलें शिरीं ॥ आत्मदेव आले घरच्याघरीं ॥धृ० ॥१॥ अक्षयी मुहूर्त आठवा मनीं साथें तेथें ॥ मग येरी गर्जे तैसें होते जाते ॥ म्हणुनि मागें पुढें कोणीं न पहावें येथे ॥ सांडावें तें काम जाऊं हरी सांगातें ॥२॥ बहूतां बहूतां रीतीं चित्तीं धरो हो मनीं ॥ नका गहिंवरूं ऐकावें ज्या कानीं ॥ ऐसिया संशयीं त्याच्या अभाग्यासीपार ॥ नाहीं नाहीं सत्य जाण निरधार ॥ मग वेळ घटका नये अजरामर ॥३॥ कळलें असुंद्या मग पडती विचार ॥ जयासाठीं ब्रह्मादिक पिसे ॥ उच्छिष्टा कारणें देव जळीं झाले मासे ॥ अर्धांगी विश्वमाता लक्ष्मी वसे ॥ तो म्यां तुकयाबंधू म्हणे आनायासें ॥४॥

१६० शिमगा

सत्व गांठी उमगा ॥ तेणें सफळ होईल शिमगा ॥ तुम्हीं हेंच गाणें गा ॥ तुम्हीं हसूं नका हसूं नका ॥धृ०॥ १॥ भूत सभेची कारटीं ॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

विषय गौऱ्या चोरटीं ॥ उतरा कुकर्माची राहाटी ॥ तुम्हीं हसूं नका हसूं नका ॥२॥ जागोजागीं थांबा ॥ अवघ्या मिळोनि मारा बोंबा ॥ नकळे एरंडाच्या कोंबा ॥ तुम्हीं हसूं नका ॥ हसूं० ॥३॥ गांवचा पाटील कोळी ॥ काळोबाची पिकली पोळी ॥ तुमची पाजळूं द्या होळी ॥ तुम्हीं हसूं नका० ॥४॥ ओंटीत घेऊन गुलाल ॥ सख्या मेहूणी संगें भुलाल ॥ तिचा नवरा मोठा जलाल ॥ तुम्हीं हसूं नका हसूं नका ॥५॥ एका जनार्दनीं पोस्त ॥ गाणें गातां झाला मस्त ॥ नाहीं तर भडवे समस्त ॥ तुम्हीं हसूं नका ॥ हसूं नका ॥६॥

१६१ मोगरा

कैवल्य स्वरूप लाविलें द्वारी ॥ त्याचा वेल गेला गगनावरी ॥१॥ मोगरा फुलला, मोगरा फुलला ॥ फुलें वेंचीताती भारू कळियासी आला ॥ मो० ॥२॥ मनाचिये मनीं गुंफियेला झेला ॥ बाप रखुमादेवीवर विठ्ठला अर्पिला ॥मो० ॥३॥

१६२ चौघडा

पंधरा सतराचा हो भेळा ॥ कारखाना झाला गोळा ॥ वाजविती आपुल्या काळा ॥ प्रेमबळा आनंदें ॥१॥ झडतो नामाचा चौघडा ॥ झ० ॥धृ०॥ झडतो नामाचा चौघडा ॥ ब्रह्मीं ब्रह्मरुपींचा हुडा ॥ संत ऐकताती कोडा ॥ प्रेमबळ आनंदें ॥ झ० ॥२॥ जनाबाई घड्याळ मोगरी ॥ घटका भरतां टोला मारी ॥ काळ व्यर्थचि गेला तरी ॥ गजर करीं आनंदें ॥ झ० ॥३॥ नामा दामा दोनी काळू ॥ नारा विठा दमामे फेलू ॥ चौघी सुना चारी हेलु ॥ कडकडा बोल उमटती ॥ झ० ॥ ४ ॥ गोंदा म्हादा करण करी ॥ नामें दुमदुमली पंढरी ॥ आबु बाई तुतारी ॥ मंजूळ स्वर उमटती ॥ झ० ॥५॥ गोणाबाई नौबत पल्ला ॥ नाद अबरी कोंदला ॥ राजाई झांज मंजूळ बोला ॥ स्वर उमटती ॥ झ० ॥६॥ तेयें चौकबारीदार ॥ काटवन विंजन जाळीजे सार ॥ झाडवणी महार ॥ उतरले पार संतासगें ॥ झ० ॥७॥ एका जनार्दनीं ओळखिलें ॥३॥

१६३ कृष्णाचा छंद

येश्वदे घराकडे चाल ॥ मला जेऊं घाल ॥ जेऊं घाल जेऊं घाल ॥धृ०॥ साध्या गव्हाची पोळी लाटी ॥ पुरणपोळी करून दे मोठी ॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नाहीं अडवित गुळासाठीं ॥ मला जेऊं घाल ॥ ये० ॥१॥ तुप लावून भाकर करीं ॥ वांगें भाजून भरीत करी ॥ वर काद्यांची कोशिंबिरी ॥ मला जेऊं घाल ॥ ये० ॥२॥ आई ग खडीसाखरेचे खडे ॥ लवकर मला करून दे वडे ॥ बाळ स्फुंद स्फुंदोनी रडे ॥ मला जेऊं घाल ॥ ये० ३॥ आई लहानच घेग ऊंडा ॥ लवकर भाजून दे मांडा ॥ लांब गेल्या गाईच्या झुंडा ॥ मला जेऊं घाल ये० ॥४॥ आई मी खाईन शिळा घाटा ॥ दह्याचा करून दे मट्ठा ॥ नाहीं माझ्या अंगीं ताठा ॥ मला जेऊं घाल ॥ ये० ॥५॥ भाकरी बरीच गोड झाली ॥ भक्षुनि भूक हरपली ॥ येश्वदेनें कृपा केली ॥ मला जे० ॥६॥ आई मी तुझा एकुलता एक ॥ गाई राखितो नऊ लाख ॥ गाई राखून झिजली नखं ॥ मला जेऊं घाल ॥ ये०॥७॥ नामा विनवी केशवासी ॥ गाई राखितो वनासी ॥ जाऊन सांगा येश्वदेसीं ॥ मला जेऊं०॥ येश्वदे, येश्वदे, येश्वदे घराकडे ॥८॥

१६४ बागुल

अरे नको रे येऊं बागुलबावा ॥ तान्हा माझा निजला रावा ॥ अरे रे निजरे बाळा ॥ मोठा जटाधारी आला ॥धृ०॥ अरेरे नको येऊं कोल्हा लांडग्या अरेरे ॥ नि०॥१॥ हालवितां आला पान्हा ॥ एकाजनार्दनीं लावियेला थाना रे ॥ अरे रे निज० ॥ मोठा जटाधारी आला ॥२॥

१६५ जंगम

भाव तोचि भागवा चिरा ॥ मुळींचा तंतू शिवदोरा ॥ आत्मलिंग पूजी बरा ॥ मी आलों तुझिया द्वारा बापानों ॥१॥ गुरू धर्म कोरान्न भिक्षा ॥ परमहंस आमची दीक्षा रे बापानों ॥२॥ देहदंड काठी हातीं ॥ आशा जाळुनिं लाविल्या विभूती ॥ आम्हीं जंगम ऐसा रीतीरे बापानों ॥ गुरू०॥३॥ हरिनामाच्या घालोनि माळा ॥ साधुसंत जाणती कळा ॥ एकाजनार्दनीं भोळारे बापानों ॥ गुरुधर्म कोरान्न० ॥४॥

१६६ विवेक वैराग्य

विवेक वैराग्य दोघे भांडती ॥ ज्ञान अज्ञान पहातीरे ॥ आपले स्वरूपीं होऊनि एकचित्त ॥ पाहती सकळ सृष्टीरे ॥धृ०॥ हुतुतु तुतुतु गडीया ॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

खेळूं तुतुतु तुतुतुरे ॥ रामकृष्ण गोविंद हरी नारायण निश्चितनें भजन करारे ॥१॥ हिरण्यकश्यप प्रल्हादपुत्र ॥ खेळत आले हातधाईरे ॥ बळेंच गेला फळी फोडुनी ॥ पित्यासी लाविलें डावीरे ॥२॥ रामरावण रणीं भीडती ॥ तो खेळ बरवा मांडीलारे ॥ कुंभकर्ण आखया इंद्राजितासी ॥ तिघांशीं पाडिले धावीरे ॥३॥ कौरव पांडव तुतुतु खेळतीं ॥ खेळिया चक्रपाणीरे ॥ विवेक हुतुतु जिवेंमारिला ॥ उरूं दिल्हा नाहीं कोणीरे ॥४॥ एकाजनार्दनीं हुतुतु खेळतां ॥ मन जडलें हरिपायीरे ॥ कामक्रोध जीवें मारिले ॥ गळून गेले साईरे ॥५॥

१६७ दादला

मोडकेसें घर ॥ तुटकेसें छप्पर ॥ दळावयास जातें नाही ॥१॥ मला दादला नको बाई ॥धृ०॥ फाटकें लुगडें तुटकीसी चोळी ॥ गुंजभर सोनें नाहीं ॥ मला दा० ॥२॥ हरबऱ्याची भाकर आंबाड्याची भाजी ॥ वरती तेलाची धार नाहीं ॥ मला दा० ॥३॥ एकाजनार्दनीं समरस झालें ॥ तो रस येथें नाहीं ॥ मला दादलाच नको बाई ॥४॥

१६८ माळी

आत्माराम आपण वनमाळी ॥ ज्ञानकुदळी घेऊन वाफे चाळी ॥ जाई जुई लाविल्या दोन्हीं वोळीं ॥ निजयोगिनीं शिंपिती वेळोवेळी ॥१॥ पूर्व पश्चिम उत्तर दक्षिण हो ॥ या मळ्याचे सारिखे चारी कोनहो ॥ क्षण तेथें ठेविलें पांच जणहो ॥ प्राणापान व्यान उदान समान हो ॥२॥ बावन्न पायऱ्या हे विहार निर्धारी ॥ सतत उपसा होतसे परोपरी ॥ हो ऐसी विहीर ठोळली क्षीरसागरीं हो ॥३॥ वोडवेचें चाक सत्रावी घडघडाट हो ॥ साहं दोर लाविला त्याला नीट हो ॥ शांती क्षमेची राहतसे मोट हो ॥ निजनयना चालविला पाट हो ॥४॥ हातीं खुरपें घेतले विवेकाचे ॥ समूळ मुळ खुरपिलें वासनेचें ॥ अलक्ष फळ लाधलें आत्मसाचें हो ॥ एका जनार्दनीं माळी तेथें नाचे हो ॥५॥

१६९ कुंटीण

सद्गुरुमाय कुंटीण झाली माझी ॥ व्यभिचारा ठेविले सये आजी ॥ स० ॥ द्वैताचा मज पांघरला शेला ॥ एकांतासी तिणें चालविलें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मुळा ॥१॥ परपुरुषाचे शेजेवरी नेऊनि घातली ॥ मागल्याची साये सोडविती झाली ॥२॥ भांति पदर काढूनी ओढिती झाली ॥ आलिंगन घ्यावया सरसावलीं ॥३॥ वासनेचें कंचुक सोडियेलें ॥ मायामय कुच हे मर्दियेले ॥४॥ जीव शिव मिठी घाल घाली आवळून ॥ करून ऐक्यता माझें चुंबिलें वदन ॥५॥ अलक्ष पदांतील घातलें आसन ॥ देहातीत भोगिला भोग त्याणें ॥६॥ एकाजनार्दनीं नारी ॥ परपुरुष भोगी निरंतर ॥७॥

१७० कृष्णपेंद्याचा संवाद

कृष्ण नवल कैसें परी ॥ तुझीं एक चराचरीं तेथें द्वेषी कोण हरी ॥ कैसें मारीले दैत्य त्वां वैरी ॥ कान्होबा सांग पाहूं माझें कोठें ॥ तुझें पुसतों तुझ्या पुढें ॥ १॥ देह बरवा केंशव अवघे एक ॥ देहा रुततात नखें तीख ॥ त्यांच्या छेदानें आम्हां सूख ॥ पेंदीया सांडे नाथेला छंदू ॥ मी आत्मा एक गोविंदू ॥२॥ तुझे भेद नाहीं नर नारी ॥ सोळासहस्त्र तुझिया घरी ॥ तू म्हणविसी बाळब्रह्मचारी ॥ शेखी झालासी कां परद्वारी ॥ कान्होबा० ॥३॥ जग अवघे तुझिया कुशी ॥ रसना अंकी न हो म्हणविसी ॥ रस स्वादू केंवी जाणसी ॥ शेखी चोरा कां दूध पीसी ॥ कानो० ॥४॥ मी भुललो भक्ति प्रेमासी ॥ चौऱ्या घेतों भक्ति भावासी ॥ रस सदनाचे मंद ऐसी ॥ रस स्वाद जाणें ज्ञानरासी ॥ कान्होबा० ॥५॥ एका जनार्दनीं घेतला थापा ॥ हा संकल्पची आया ॥ सत्य हरपली माझी काया ॥ देह देहेपण गेलें वाया ॥ कान्होबा सांगपां माझें कोडें ॥६॥

१७१ बायला

बाय माझ्या बापाच्या बायला झाला ॥ गोड गोड लिंबच वाटून प्याला ॥ अठा मुलें झालीं त्याला ॥१॥ बाय माझे बापानें पोट फाडिलें ॥ पोट फाडिलें, पोट फाडिलें ॥धृ०॥ माझा बाप करितो चाळे ॥ गरवार झाला तिसरे वेळे ॥ बाळ मांडीवर खेळे ॥ बाय०॥२॥ मामा बापनी गुणेकारी ॥ सहा मुलें झालीसे उदरीं ॥ टाकुनि गेला देशावरी ॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

बाय० ॥३॥ माझा बाप अविनाश ॥ निर्गुण आला आकारास ॥ नामा म्हणे विष्णुदास ॥ बाप मा० ॥४॥

१७२ घोंगडी

खेळत होतों मुरकवाडी ॥ माझी घोंगडी हरपली ॥१॥ धृ०॥ कान्होबाच्या पंडलों गळां ॥ येई गोपाळा देई झाडा ॥ माझी० ॥२॥ मी तो हर्षें घडला झालों ॥ अवघा लोभ आहे रे ॥ मा० ॥३॥ तुका म्हणें बुद्धि सांचे ॥ ठायींच ठायीं मजपाशीं ॥ मा० ॥४॥

१७३ जातें

सुंदर माझें जातें ग फिरे बहुत ॥ ओंव्या गाऊं कौतुकें तूं येरे बा ॥१॥ जीव शिव दोन्ही खुंटे हो ॥ प्रपंचाचे नेटे हो ॥ लावुनी पांचीं बोटें तू येई बा ॥२॥ सासू सासरा दीर तीसरा ॥ ओव्या गाऊं भ्रतारा तूं येरे बा ॥३॥ बारा सोळा गडणी अवघ्या कामिनी ॥ ओव्या गाऊं बसुनी तूं येरे बा० ॥४॥ प्रपंच दळण दळिलें पीठ भरिलें ॥ सासुपुढे ठेविले तूं येरे बा० ॥५॥ सत्वाचे आधण ठेविले पुण्य वैरिले ॥ पाप ते वोतुन नेले तुं येरे बा० ॥६॥ जनीनें जाते गाईले कीर्त राहिली ॥ थोडासा लाभ होईल तूं येरे बा० ॥७॥

१७४ कानोबा

तेरे तेरे कानोबा तेरे तेरे ते ॥धृ०॥ पहिलें कोठेच नव्हते कांहीं ॥ चंद्र सूर्य तारा नाहीं ॥ अवघे शून्यच होते पाहीं ॥ कानोबा तेरे तेरे ते ॥१॥ येथे एक ढालगज निर्माण झाली ॥ तिनें पहा एवढी ख्याती केली ॥ इंद्रादिकांस म्हणे बाहुली ॥ अमरपुरीं तिचा घरकुली ॥ कानोबा० ॥२॥ ती मूळची कर्णकुमारी ॥ तिचा बाप तो ब्रह्मचारी ॥ तो जन्मला तियेचे उदरीं ॥ ऐसी पहतां नवलपरी ॥ कानोबा० ॥३॥ तिनें बापचि दादला केला ॥ कोण वाईट म्हणे या बोला ॥ अवघे तिचेच बोलणें चाला ॥ तरी कैवल्य तुम्हांला ॥ कानोबा० ॥४॥ तो तियेशी शिवला नाहीं ॥ वांझ गर्भिण झाली पाही ॥ व्याली पांचपंचवीस पोरें तेही ॥ ऐसी तियेची नवलपरी ॥ कानोबा० ॥५॥ ऐसी व्याली ती सकळ

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सृष्टी ॥ न पडतां भ्रताराचे दृष्टी ॥ रामदास म्हणे या गोष्टी ॥ विचार सद्गुरुच्या मुखीं ॥ कानोबा० ॥६॥

१७५ गौळण १० वी

माझे अडवे बचडे छकुडे ग राधे रुपडे पांघरुं घालिती कुचडे ॥ धृ०॥ हरि माझा गे सांवळा ॥ पाई पैंजण वाजे खुळखुळा ॥ यानें भुलविल्या गोपी बाळा ॥ माझे० ॥१॥ हरी माझा गे नेणता ॥ करी त्रिभुवनाचा घाणेला ॥ जो कां नांदे त्रिभुवनीं ॥ माझे० ॥२॥ ऐसे देवाजीचे गडी ॥ पेंद्या सुदाम्याची जोडी ॥ बळभद्र त्याचा गडी ॥ माझे० ॥३॥ जनी म्हणे तूं चक्रपाणी ॥ खेळ खेळतो वृंदावनीं ॥ लुब्ध झाल्या त्या गौळणी ॥ माझे ॥४॥

१७६ पांखरूं २ रें

राई येवढें पांखरूं दादा त्रिभुवनीं त्याचा थारा ॥धृ०॥ नर आणि नारी त्या बा पांखराचा चारा ॥ पिंडीं आणि ब्रह्मांडीं त्याचा अनुभव घेतां चुकेल चौऱ्याशींचा फेरा ॥ राई० ॥१॥ एकवीस स्वर्गवरती त्या बा पांखराची उंची ॥ डोळ्यांतील बाहुलें त्या बा पांखराची नीची ॥ सप्तही सागर पांखरूं घेऊन गेलें चुंची ॥ राई० ॥२॥ पिंड आणि ब्रह्मांड मच्छिंद्र नाथानें दाविलें ॥ त्याच्या अनुग्रहें गोरक्षनाथानें ओळखिलें ॥ तयाच्या प्रसादें नाम्याशिंप्यानें गाईले ॥ राई० ॥३॥

१७७ बाहुलें

एक तांब्याचें बाहुलें केलें ॥ पाट मांडुनी वरी ठेविलें ॥ वस्त्र अलंकारें गुडाळलें ॥ मना आलें तें नाम ठेंविलें ॥ या जनासीं लागलें वेड ॥१॥ शुद्ध पाण्यानें पाखाळिलें ॥ गंध फुलानें झाकाळलें ॥ धूप करूनि दीपें उजळिलें ॥ अन्न पुढें ठेवूनी चाळविलें ॥ या ज० ॥२॥ फेरा घालुनी भोवंडीलें ॥ आड पडोनि दंडवत केलें ॥ अंत पार नाहीं देखिलें ॥ एका जनार्दनीं ओळखिलें ॥३॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

१७८ धावा

कृष्णा धांवरे लवकरी ॥ संकट पडलें भारी ॥ हरी तूं आमुचा कैवारी ॥ आलें विघ्न निवारी ॥धृ०॥ पांडव असतां वनवासी ॥ कळलें कौरवांसी ॥ त्यानें पाठविले महाऋषी ॥ सत्व हरावयासी ॥ कृष्णा० ॥१॥ साटि सहस्त्र खंड्या अन्न ॥ दुर्वासा भोजन ॥ सत्व जातील घेऊन ॥ अंतर पडतां जाण ॥ कृ० ॥२॥ रात्र जाहली दोन प्रहर ॥ आले ऋषीश्वर ॥ भोजन मागती सत्वर ॥ कैसा करूं विचार ॥ कृष्णा० ॥३॥ आज कां निष्ठुर जाहलासी ॥ सत्वर हृषीकेश ॥ माझी होईल बा गत कैसी ॥ अनाथ मी परदेशी ॥ कृष्णा० ॥४॥ आतां न लावी उशीर ॥ धर्म चिंतातूर ॥ अनर्थ करील तो फार ॥ एवढा करी उपकार ॥कृष्णा ॥५॥ कंठ शोषला अनंता ॥ प्राण जाईल आतां ॥ पदर पसरितें अच्युता ॥ पावे रुक्मिणिकांता ॥ कृष्णा० ॥६॥ ऐकुनि बहिणीची करुणा ॥ आला यादवराणा ॥ द्रौपदी लोळत हरिचरणा ॥ उद्धव चिद्घन जाणा ॥७॥

आरती श्री विठ्ठलाची

युगें अठ्ठावीस विटेवरी उभा ॥ वामांगीं रखुमाई दिसे दिव्य शोभा ॥ पुंडलिका भेटी परब्रह्म आलेंगा ॥ चरणीं वाहे भीमा उद्धरी जगा ॥१॥ जय देव जय देव जय पांडुरंगा ॥ रखुमाईवल्लभा राहीच्या वल्लभा पावे जिवलगा जय० ॥ धृ० ॥ तुळसीमाळा गळां कर ठेवूनि कटीं ॥ कांसे पीतांबर कस्तुरी ल्लाटीं ॥ देव सुरवर नित्य येती भेटी ॥ गरुड हनूमंत पुढें उभे राहती ॥ जय० ॥२॥ धन्य वेणूनाद अनुक्षेत्रपाळा ॥ सुवर्णाचीं कमळें वनमाळा गळां ॥ राई रखुमाबाई राणीया सकळा ॥ ओंवाळीती राजा विठोबा सांवळा ॥ जय० ॥३॥ ओंवाळूं आरत्या कुरवंड्या येती ॥ चंद्रभागेमध्ये सोडुनियां देती ॥ दिंड्या पताका वैष्णव नाचती ॥ पंढरीचा महिमा वर्णावा किती ॥ जय० ॥४॥ आषाढी कार्तिकी भक्तजन येती ॥ चंद्रभागेमध्ये स्नान जे करिती ॥ दर्शन हेळामात्रें तयां होय मुक्ती ॥ केशवासी नामदेव भावें ओंवाळिती ॥ जय देव० ॥५॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आरती श्री ज्ञानदेवाची

आरती ज्ञानराजा ॥ महाकैवल्यतेजा ॥ सेविती साधुसंत ॥ मनु वेधला माझा ॥ आरती० ॥ धृ० ॥ लोपलें ज्ञान जगीं । हित नेणती कोणी ॥ अवतार पांडुरंग । नाम ठेविलें ज्ञानी ॥ आ० ॥ १ ॥ कनकाचें ताट करीं । उभ्या गोपिका नारी । नारद तुंबरही । सामगायन करीं ॥ आ० ॥ २ ॥ प्रकट गुह्य बोलें । विश्व ब्रह्मचि केलें । रामा जनार्दनी ॥ पायीं मस्तकचि ठेलें ॥ आरती ज्ञानराजा ॥ महाकवैल्य० ॥ ३ ॥

आरती एकनाथाची

आरती एकनाथा ॥ महाराजा समर्था ॥ त्रिभुवनीं तूं [illegible] जगद्गुरू जगन्नाथा ॥धृ०॥ एकनाथ नाम सार ॥ वेदशास्त्रांचे गूज ॥ संसारदुःख नासे ॥ महामंत्रांचे बीज ॥ आरती० ॥१॥ एकनाथ नाम घेतां ॥ सुख वाटलें चित्ता ॥ अनंत गोपाळदासा ॥ धणी न पुरे गातां ॥ आरती एकनाथा ॥ महाराजा समर्था ० ॥२॥

आरती तुकारामाची

आरती तुकारामा ॥ स्वामी सद्गुरुधामा ॥ सच्चिदानंदमूर्ती ॥ पाय दाखवीं आम्हां ॥ आरती० ॥ ध्रु०॥ राघवें सागरांत ॥ पाषाण तारीले ॥ तैसे हे तुकोबाचे ॥ अभंग उदकीं रक्षिले ॥ आरती० ॥१॥ तुकीतां तुलनेसी ॥ ब्रह्म तुकासी आलें ॥ म्हणोनी रामेश्वरें ॥ चरणीं मस्तक ठेविलें ॥ आरती० ॥२॥

समाप्त

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitizagtion by eGangotri





इच्छिताती येव पंढरीचा वास।
न मिळे सौरस तया काही ॥१॥

ऐसे श्रेष्ठ क्षेत्र उत्तमाउत्तम।
याहुनि सुगम आहे कोठें ॥२

जनार्दनाका एका म्हणतसे भावे। तीर्थ ते वंदावे पंढरी सदा ॥३॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi